Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २६१ * * नागपूर * | बुधवार, दिनांक १८ डिसेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

## विधानपरिषद सभापतीपदाची निवडणूक १७ ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
मागील दोन वर्षांपासून रिक्त असलेल्या विधानपरिषदेच्या सभापतीची निवडणूक १९ डिसेंबरला होणार आहे. विधान परिषदेच्या उपसभाती नीलम गोऱ्हे यांनी सभागृहात ही घोषणा केली. सध्या सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनातच सभापती निवडला जाणार असल्याचे आधीच बोलले जात होते. त्यानुसार आता ही निवडणूक होणार आहे.

वास्तविक रामराजे नाईक निंबाळकर यांची मुदत ऑगस्ट २०२२ मध्ये संपल्यापासून विधान परिषदेचे सभापतीपद रिक्त आहे. मात्र, आगामी राजकारणाच्या दृष्टीने हे पद महत्त्वाचे असल्याने ते भरले जाईल, असे सांगितले जात होते. या विधानपरिषदेच्या सभापतीपदासाठी महायुतीत चुरस असणार आहे. हे अपेक्षितच आहे.

अग्राग्रलेख
खरीखरी..

## पवार साहेब प्रकट व्हा !

गेल्या दोन दिवसांपासून ज्यांच्या नावाचा डंका संपूर्ण नागपूरभर वाजत आहे. ते अजित दादा पवार साहेब राष्ट्रवादीचा मेळावा संपल्यावर गेल्या दोन दिवसांपासून नॉट रीचेबल आहेत. काँग्रेसचे महाराष्ट्राचे अध्यक्ष नाना पटोले यांना नॉट रिचेबल राहण्याची सवय आहे. पण आता दादाही अज्ञातवासात कसे काय गेले. हे समजेनासे झालेले आहे. राष्ट्रवादीतील अनेक दिग्गज मंत्रिमंडळाच्या बाहेर आहेत. त्यांना अडीच वर्षांचे गाजर दाखवल्यावरही त्या गाजराला खाऊ की गिळू, अशा शब्दात त्याची टर्र उडवली जात आहे. मुळात राष्ट्रवादी काय किंवा शिवसेना काय, हे दोन पक्ष मूळ प्रवाहापासून विलग का झाले. याचे स्पष्टीकरण खुद्द त्या त्या पक्षातील प्रमुखांपासून इतर सर्वांनी दिलेले आहे. सत्ता असली की कामे होतात. अन्यथा रिकामे राहावे लागते, असे अजित पवार उघडपणे बोलले. सध्या खुद्द अजित पवार यांना अर्थ खाते मिळते की अनर्थ होतो. हेच समजेनासे झालेले आहे. ज्या ज्या वेळी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचे संयुक्त मंत्रिमंडळ बनले. तेव्हा तेव्हा मुख्यमंत्री काँग्रेसचा पण सर्वाधिक मलाईदार खाती राष्ट्रवादीकडे अशी स्थिती होती. काँग्रेसच्या सबगोलंकारी कार्यक्रमात ते खपून गेले आणि पचूनही गेले. पण आता शिस्तबद्ध भारतीय जनता पक्ष आणि त्यात महायुतीमध्ये सर्वाधिक कमी जागा असलेला पक्ष म्हणजे अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. जे जे आमदार निवडून आले किंवा, ज्या ज्या आमदाराने मोठ्या पवारांना वाकूल्या दाखवल्या. त्या सर्वांसाठी एकच मंत्र होता, तो म्हणजे मंत्रीपद. आता नको तेवढे आमदार निवडून आल्याने भाजप काय किंवा शिवसेना काय किंवा राष्ट्रवादी काय. तिघांचीही मोठी पंचाईत झालेली आहे. भाजपचे सरकार आले म्हणजे मुनगुंटीवार यांचे मंत्रिपद पक्के, राष्ट्रवादी सत्तेत असली म्हणजे छगन भुजबळ पक्के, पण आता हेच पक्केपण धक्क्यावर धक्के देत आहे. याचे कारण असे आहे की, मंत्रिमंडळात कोणा कोणाला घ्यावे. याची आखणी मुंबईत न होता दिल्लीत झालेली आहे. दिल्लीतील श्रेष्ठींकडे प्रत्येकाची कुंडली आहे. तसेच कुणाला घ्यावे आणि कोणाला घेऊ नये. याचे गणित पक्के ठरलेले आहे. अजितदादांची राष्ट्रवादी काय किंवा शिंदे यांची शिवसेना काय, कोणालाच सत्ता सोडायची नाही. राष्ट्रवादीतील आपल्या वरिष्ठ सहकार्यांना काय उत्तर द्यावे. हे न समजल्यामुळे कदाचित आपले अजित पवार साहेब नॉट रीचेबल झालेले असतील. आता आलेल्या परिस्थितीचा मुकाबला करणे अत्यंत गरजेचे आहे. मौन साधून, हम आपके है कौन? असे म्हणता येणार नाही. त्यामुळे अजित दादा तुम्हाला तुमच्या सुभेदारांना हे सगळे सांगावेच लागेल. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत, जे काय करता येणे शक्य होते ते केले. मित्रांनो थोडा धीर धरा. यापुढे तुमच्यासाठी जे शक्य आहे ते सर्व करू. असे आश्वासन अजित पवार यांना त्यांच्या सुभेदारांना द्यावेच लागेल. त्यामुळे अजित रावांनी अज्ञातवासातून बाहेर यावे. पांडवांचे शस्त्रे जशी शमीच्या झाडावर लपवून ठेवली होती. तशी अनेक अस्त्रे अजित दादा पवार साहेबांच्याकडे आहेत. त्यांनी आपली अस्त्रे बाहेर काढावीत. त्यातच त्यांचे आणि त्यांच्या पक्षाचे हित आहे. अजित दादा पवार साहेब तुमचे नॉट रिचेबल राहणे आणि राष्ट्रवादीतील सध्याची वादावादी खरोखर परवडणारी नाही. एवढेच आम्हाला अगदी मनःपूर्वक सांगायचे आहे !

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# वन नेशन वन इलेक्शन विधेयक
# लोकसभेत दुसऱ्यांदा सादर

### मतदानात बाजूने २६९, विरोधात १९८ मते



■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १७ :
संसदेच्या हिवाळी अधिवेशनात मंगळवारी केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी एक देश, एक निवडणूक यासाठी १२९ वी घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर केले.

मेघवाल यांनी केंद्रशासित प्रदेशांशी संबंधित तीन कायद्यांमध्ये सुधारणा करणारे विधेयकही मांडले. यामध्ये गव्हर्नमेंट ऑफ युनियन टेरिटरी कायदा- 1963, द गव्हर्नमेंट ऑफ नॅशनल कॅपिटल टेरिटरी ऑफ दिल्ली- 1991 आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायदा- 2019 यांचा समावेश आहे. याद्वारे जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यासाठी दुरुस्तीही करता येईल.

अमित शाह म्हणाले की, जेव्हा हे विधेयक मंत्रिमंडळात आले तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की ते संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवावे. कायदामंत्री तसा प्रस्ताव देऊ शकतात.

याच्या निषेधार्थ सपा खासदार धर्मेंद्र यादव म्हणाले की, वन नेशन, वन इलेक्शन विधेयक हे देशात हुकूमशाही आणण्याचा भाजपचा प्रयत्न आहे.

एक राष्ट्र, एक निवडणूक विधेयक पुन्हा सादर करण्यासाठी प्रथमच इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान झाले. यामध्ये बाजूने 220, तर विरोधात 149 मते पडली. एकही खासदार गैरहजर नव्हता. एकूण 369 सदस्यांनी मतदान केले. यानंतर विरोधी सदस्यांनी आक्षेप घेतला.

त्यांचा आक्षेप असेल तर त्यांना स्लिप द्या, असे शहा म्हणाले. यावर स्पीकर म्हणाले की, आम्ही आधीच सांगितले होते की, जर एखाद्या सदस्याला तसे वाटले तर तो स्लिपच्या माध्यमातून मत बदलू शकतो.

## विधानसभेच्या कामकाजावर काँग्रेसचा बहिष्कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
परभणीत उसळलेला हिंसाचार, या प्रकरणी पोलिसांनी अटक केलेल्या सोमनाथ सूर्यवंशी याची पोलिस कोठडीत झालेली हत्या, आंबेडकरी अनुयायांवरील पोलिसांची कारवाई, बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या आदी मुद्द्यांवरून काँग्रेसने विधानसभेच्या दिवसभराच्या कामकाजावर बहिष्कार घातला.

काँग्रेसचे नितीन राऊत यांनी या मुद्द्यावरून सभागृहात चर्चा घेण्याची मागणी केली. हे विषय अतिशय गंभीर आहेत. राज्यात केव्हाही उद्रेक होवू शकतो. सर्व कामकाज बाजूला ठेवून चर्चा घ्यावी अशी मागणी राऊत यांनी केली. नाना पटोले यांनीही हा मुद्दा लावून धरीत चर्चेची मागणी केली.

यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या विषयावर उद्या बुधवार १८ रोजी सखोल चर्चा ठेवण्यात आल्याचे सांगितले. या विषयावर केवळ विरोधकच नव्हे तर सत्ताधारी सदस्यांनाही बोलायचे आहे. विषयाचे गांभीर्य लक्षात घेता उद्या चर्चा घेण्यात येईल असे अध्यक्षांनी स्पष्ट केले. त्यावर काँग्रेसने बहिष्कार घातला. अखेर विरोधक सभात्याग करत असल्याचे नाना पटोले यांनी सांगितले. त्यानंतर विरोध पक्षातील सर्व आमदारांनी सभात्याग केला.

### पक्षाच्या बैठकीमुळे बहिष्कार?

काँग्रेसच्या राज्यातील आमदारांची एक बैठक नागपुरात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत काँग्रेसच्या गटनेत्याची निवड करण्यात येणार आहे. त्यामुळे काँग्रेसने बहिष्कार घातल्याची चर्चा विधिमंडळ परिसरात पाहायला मिळाली.

## शिंदे, फडणवीसांना गोवण्याचा प्रयत्न
## सरकारने नेमली एसआयटी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना खोट्या गुन्ह्यांत अडकवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एसआयटीमार्फत चौकशी केली जाईल, अशी ग्वाही कॅबिनेटमंत्री शंभूराज देसाई यांनी विधान परिषदेत दिली. भाजपचे परिषदेतील गटनेते प्रविण दरेकर यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करत, चौकशी मागणी केली होती.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना खोट्या गुन्ह्यात गोवण्यासाठी तत्कालीन पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी दबाव टाकला होता.

तत्कालीन पोलीस उपायुक्त लक्ष्मीकांत पाटील यांच्यावर ही जबाबदारी होती, असा जबाब संजय पुनामिया यांनी दिला आहे. या संदर्भातील व्हिडीओ क्लीप प्रसारमाध्यमांद्वारे व्हायरल केली. विधान परिषदेत याचे पडसाद उमटले. दरेकर यांनी ही क्लीप परिषदेच्या उपाध्यक्षा नीलम गोऱ्हे यांना सादर केली. फडणवीस यांनी महाविकास आघाडीचे भ्रष्टाचार काढल्याने सूड भावनेचा प्रकार सुरू होता. प्रकरण गंभीर असून या घटनेची एसआयटी मार्फत चौकशी व्हावी, पोलीस उपायुक्त पाटील यांना तातडीने निलंबित करावे, सरकारी वकील शेखर जगताप यांची पॅनलवरून काढावे, संजय पांडे यांना यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली. गोऱ्हे यांनी याची दखल घेत, सरकारला कारवाई करण्याची सूचना केली.

दरम्यान, कॅबिनेट मंत्री शंभूराज देसाई यांनी जेष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षेखाली एसआयटी चौकशी केली जाईल, असे आश्वासन दिले.

## सीएम फडणवीसांसोबत उद्धव ठाकरेंची बंदद्वार चर्चा

राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सहभागी होण्यासाठी आज नागपूर येथे पोहोचले. यादरम्यान त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली.

यावेळी फडणवीस यांना पुष्पगुच्छ देत उद्धव ठाकरे यांनी त्यांना शुभेच्छा देखील दिल्या. वास्तविक परंपरेप्रमाणेच ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली असल्याचे भाजप नेत्यांनी म्हटले आहे. तथापि, ठाकरे, फडणवीस भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आल्याचे दिसून आले.

उद्धव ठाकरे विधान भवन परिसरामध्ये दाखल झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या दालनात जाऊन भेट घेतली. या वेळी दोन्ही नेत्यांमध्ये पंधरा ते वीस मिनिटे चर्चा झाली. मुख्यमंत्रीपदी तिसऱ्यांदा विराजमान झाल्यानंतर फडणवीस आणि ठाकरे यांची ही पहिलीच भेट आहे. यावेळी आमदार आदित्य ठाकरे, आमदार अनिल परब उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची देखील भेट घेतली. या भेटीत देखील विधानसभेतील विरोधी पक्षनेते पदाबाबत या दोघांमध्ये चर्चा झाल्याची माहिती सूंत्राने दिली आहे. राहुल नार्वेकर आणि उद्धव ठारके यांच्यात तब्बल तीन वषानंतर ही भेट झाली आहे. त्यामुळे या भेटीकडे सर्वांचेच लक्ष लागले होते.

विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांची भेट घेणे ही परंपरा आहे. या परंपरेनुसारच उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी दाखल झाले होते. यामध्ये कोणताही राजकीय अर्थ काढण्याची आवश्यकता नसल्याचे भारतीय जनता पक्षाचे नेते प्रवीण दरेकर यांनी माध्यमंशी बोलताना सांगितले. माझी देखील विधानभवनाच्या पायरांवर उद्धव ठाकरेंसोबत अचानकपणे भेट झाल्याचेही दरेकर म्हणाले.

## अहंकार दूर ठेवा, नाहीतर खड्डूयात...



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :
व्यक्तीने अहंकारापासून दूर राहावे अन्यथा तो खड्डयात पडू शकतो, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले. पुण्यात झालेल्या कार्यक्रमात ते म्हणाले की, देशाच्या विकासासाठी समाजातील सर्व घटकांना बळकट करणे आवश्यक आहे.

सरसंघचालक भागवत म्हणाले की, प्रत्येक व्यक्तीमध्ये एक सर्वशक्तिमान ईश्वर असतो, जो समाजसेवेची प्रेरणा देतो, पण अहंकारही असतो. राष्ट्राची प्रगती ही केवळ सेवेपुरती मर्यादित नाही. नागरिकांना विकासात हातभार लावता यावा, हा सेवेचा उद्देश असावा.

भागवत म्हणाले की, समाजात सर्व काही चुकीचे चालले आहे, असे सर्वांना वाटते. परंतु प्रत्येक नकारात्मक बाबींच्या 40 पट अधिक चांगली आणि अद्भुत सेवा समाजाला दिली जात आहे. याबाबत लोकांना सांगणे गरजेचे आहे.

मणिपूरमधील परिस्थितीवर भागवत म्हणाले, मणिपूर वर्षभरापासून शांततेची वाट पाहत आहे. गेल्या 10 वर्षांपासून राज्यात शांतता होती, मात्र अचानक तेथे बंदूक संस्कृती वाढली. हा प्रश्न प्राधान्याने सोडवणे गरजेचे आहे.

## कसला दादा अन् कसला वादा?

भुजबळ संतापले

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १७ :
राष्ट्रवादी काँग्रेसमधील निर्णय प्रक्रियेत केवळ माझा कोणताही हस्तक्षेप नसतो. आमच्या पक्षात केवळ अजित पवार, प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे हे तिघेच निर्णय घेतात, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री छगन भुजबळ यांनी मंगळवारी केला.

त्यांच्या या आरोपामुळे राष्ट्रवादीच्या गोटात एकच खळबळ माजली आहे. महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये काँग्रेस, उद्धव ठाकरे व शरद पवार मला विश्वासात घेत होते, अशी खंतही त्यांनी यावेळी बोलून दाखवली.

भुजबळ म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार, प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे हे तिघेच निर्णय घेतात. चर्चेत किंवा निर्णय प्रक्रियेत माझा सहभाग शून्य आहे. आमदारकीचे कुणाला तिकीट द्यायचे हे सुद्धा मला माहिती नसते. खासदारकीची उमेदवारी कुणाला द्यायची? हे ही मला माहिती नाही. मंत्री कुणाला करायचे? हे ही आम्हाला ठावूक नाही. हे केवळ त्या तिघांनाच ठावूक असते.

आम्ही या पक्षात आमची सिनिऑरिटी घेऊनच आलो होतो. यापूर्वी शिवसेना असेल, काँग्रेस असेल किंवा राष्ट्रवादी काँग्रेस असेल आम्हाला विश्वासात घेतले जायचे. पण असे काहीच होत नाही. माझी किंमत होत नसेल तर काय उपयोग? दादाचा वादा. वाह रे दादाचा वादा, कसला वादा अन् कसला दादा, अशा शब्दांत भुजबळांनी यावेळी आपला संताप व्यक्त केला.

## विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज अश्रुधुराचा मारा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १७ :
दिल्ली विद्यापीठाच्या कॅम्पस लॉ सेंटरमध्ये विद्यार्थी आणि पोलिसांमध्ये जोरदार हाणामारी झाली होती. परीक्षेची तारीख वाढवावी या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले.

आंदोलक विद्यार्थ्यांना तेथून हटवण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज, मिरची पावडर फवारणी आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी जखमी झाले. मात्र, पोलिसांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत.

अपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करणे आणि प्राध्यापकांमध्ये बदल केल्याच्या निषेधार्थ विद्यार्थी एकत्र आले होते. लॉ कॅम्पस सेंटरच्या सेमिस्टर परीक्षा 26 डिसेंबरपासून सुरू होणार आहेत. त्यांचा अभ्यासक्रम अद्याप अपूर्ण असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. मधल्या काळात विद्याशाखा बदलण्यात आल्या आहेत. नवीन प्राध्यापक आणण्यासही विलंब झाला. अचानक अभ्यासक्रम अपडेट करण्यात आला. त्यामुळे त्यांना आंदोलन करावे लागले.

सकाळपासून शेकडो विद्यार्थी आंदोलनासाठी जमले होते. विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने त्यांनी आपल्या मागण्यांबाबत विद्यापीठाच्या विधी शाखेच्या डीनची भेट घेण्याचा प्रयत्न केल्याचे आंदोलक विद्यार्थ्यांनी सांगितले.

एका विद्यार्थिनीने सांगितले की, 'जेव्हाही डीन आम्हाला सांत्वन देतात तेव्हा त्या 10 दिवसांच्या वैद्यकीय रजेवर जातात. सकाळी दहा वाजल्यापासून आम्ही इथे उभे होतो. डीन मॅडम 2 वाजता आल्या. नवीन डेट शीट येईपर्यंत आम्ही येथून हलणार नाही.

दरम्यान, घटनास्थळी आलेल्या पोलिसांशी बाचाबाची झाली. चिंतेकडे लक्ष देण्याऐवजी विद्यापीठ प्रशासनाने पोलिस कारवाई केली. डीन मॅडमने स्वतः दिल्ली पोलिस आणि सीआरपीएफला येथे बोलावले.

## पक्ष गटनेता नात्याने ठाकरे माझ्या भेटीला

नार्वेकरांची प्रतिक्रिया



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या भेटीबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

उद्धव ठाकरे एका पक्षाच्या गटनेता या नात्याने विधानसभा अध्यक्षांच्या भेटीसाठी आले होते, असे नार्वेकरांनी सांगितले. तसेच विधानसभा विरोधी पक्षनेता पदाबाबत माज्याकडे कोणताही प्रस्ताव आला नसल्याचेही त्यांनी सांगितले.

उद्धव ठाकरे हे शिवसेना उद्धव बाळासाहेब गटाचे विधीमंडळ गटनेता आहेत. त्याच अनुषंगाने ते विधानसभा अध्यक्षांच्या भेटीसाठी आले होते. ही सदिच्छा भेट होती. आपल्याकडे पाहुणे आल्यावर आपण त्यांचा पाहुणचार नेहमीच करतो, त्यामुळे त्यात नवल काहीच नाही, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली.

उद्धव ठाकरे यांच्याकडून विरोधी पक्षनेता पदासाठी काही प्रस्ताव आला का? असा प्रश्न नार्वेकर यांना विचारला असता माझ्याकडे अद्याप कुठलाही प्रस्ताव प्राप्त झाला नाही. यावेळी विरोधी पक्षनेते पदाबाबत चर्चा झाली नाही. माज्याकडे विरोधी पक्षनेता पदाबाबतचा प्रस्ताव आला, तर त्यावर नियमानुसार, प्रथा-परंपरेनुसार निश्चित कारवाई केली जाईल, असे राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

अध्यक्ष दालनामध्ये मॅरेथॉन सुरू आहेत, या बैठकांमध्ये नेमक्या काय चर्चा सुरू आहे असे विचारले असता अधिविशेन सुरू असल्यामुळे सभागृहातील कामकाजासंदर्भात मंत्र्यांसोबत, मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा होत असते. त्याच अनुषंगाने कामकाजासंदर्भात या बैठकांमध्ये चर्चा झाल्याचे विधानसभा अध्यक्षांनी सांगितले.

इतरही धर्मस्थळांवर सरकारचे नियंत्रण नाही, अशी माहिती शासनाकडून मागितली असल्याचे राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

## तालिका सभाध्यक्षांच्या निवडीत काँग्रेस, राष्ट्रवादीला डावलले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभा अध्यक्षांनी तालिका सभाध्यक्षांची नावे जाहीर केली. यातून काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला डावलण्यात आले आहे.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी चार तालिका सभाध्यक्षांची नावे जाहीर केली. हे अधिवेशन सहा दिवसांचे आहे. उर्वरित काळाचे कामकाज नियमित सुरू राहण्यासाठी तालिका सभाध्यक्षांची घोषणा केली. यात भाजपचे विजय रहांगडाले, शिवसेनेचे (शिंदे) रमेश बोरनारे, शिवसेना (ठाकरे) दिलीप सोपल, राष्ट्रवादी (अजित पवार) काँग्रेस शेखर निकम यांचा समावेश आहे. रहांगडाले हे तिरोडा मतदारसंघातून तिसऱ्यांदा निवडून गेले आहेत.

## भारताने फॉलोऑन वाचवला, १९३ धावांनी पिछाडीवर




■ वृत्तसंस्था, ब्रिस्बेन, दि. १७ :
ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या तिसऱ्या कसोटीत फॉलोऑन खेळण्यापासून भारताने स्वतःला वाचवले आहे. गाबा स्टेडियमवर सुरू असलेल्या सामन्यात भारतीय संघ १९३ धावांनी पिछाडीवर आहे. मंगळवारी सामन्याच्या चौथ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारताने 9 विकेट गमावत 252 धावा केल्या आहेत. आकाश दीप २७ आणि जसप्रीत बुमराह १० धावांवर नाबाद परतले.

एकवेळ संघाने 213 धावांवर 9वी विकेट गमावली होती. रवींद्र जडेजा 77 धावा करून बाद झाला. इथून भारताला फॉलोऑन वाचवण्यासाठी 33 धावांची गरज होती. अशा परिस्थितीत आकाश दीप आणि जसप्रीत बुमराह यांनी संयमाने फलंदाजी केली.

भारतीय संघाने दिवसाची सुरुवात ५१/४ अशी केली. केएल राहुलने 33 धावा करत डावाचे नेतृत्व केले आणि तो 84 धावा करून बाद झाला.

ऑस्ट्रेलियाकडून कर्णधार पॅट कमिन्सने 4 बळी घेतले. तर मिचेल स्टार्कने ३ बळी घेतले. मिचेल स्टार्क आणि जोश हेझलवूडला प्रत्येकी एक विकेट मिळाली. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात 445 धावा केल्या होत्या.

महासागर आवृत्त्या ▮ नागपूर ▮ अकोला ▮ अमरावती ▮ खामगांव ▮ यवतमाळ ▮ वर्धा ▮ गडचिरोली ▮ वाशीम ▮ भंडारा ▮ गोंदिया ▮ मुंबई ▮ पालघर (ठाणे) ▮ नाशिक आणि चंद्रपूर महासागर

## संक्षिप्त

### मंत्रिमंडळाचा विस्तार होताच पुण्याबाबत झाला महत्त्वाचा निर्णय

**पुणे, दि. १७ : प्रतिनिधी**

राज्य सरकारचा मंत्रिमंडळाचा विस्तार नुकताच झाला आहे. त्यानंतर लगेचच पुण्याबाबत एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. पुण्यातील एका स्मारकाला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा देण्यात येणार आहे. पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. खडकी कटळ मंडळाच्या परिसरात मुळा नदीच्या काठावर होळकर छत्री ही ऐतिहासिक वास्तू आहे. होळकर छत्री आणि शिवमंदिर ही ऐतिहासिक वास्तू इंदूर येथील देवी अहिल्याबाई होळकर चॅरिटीज ट्रस्ट यांची ही खासगी मालमत्ता आहे. होळकर छत्री येथे मराठा साम्राज्यातील होळकर घराण्यातील दोन स्मारके आणि महादेवाचे मंदिर आहे. तटबंदीयुक्त असलेली ही छत्री, शिवमंदिराचे शिखर १८व्या शतकातील मराठा शैलीतील असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

खडकी येथील होळकर छत्री आणि महादेव मंदिराला आता राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा देण्यासाठीची कार्यपद्धती पूर्ण झाली आहे. त्यामुळे होळकर छत्रीला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा देण्यासंदर्भातील अधिसूचनेचा इंग्रजी आणि मराठीतील अधिसूचनेचा मसुदा तयार करण्यात आला आहे. ही अधिसूचना राजपत्र भाग ४मध्ये प्रसिद्ध करावी. तसेच पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालये विभागाच्या संचालकांनी अधिसूचनेची प्रत या स्मारकाजवळ ठळक ठिकाणी लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. होळकर छत्री ही प्रसिद्ध होळकर पुलाजवळ स्थित आहे. छत्रीलगत असलेल्या नदीच्या काळातवर दगडी घाट बांधलेला आहे.

### 'सहजीवन व्याख्यानमाले'त गुरुवारी सरसंघचालक मोहन भागवत यांचे व्याख्यान

**पुणे, दि. १७ : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याची अमृतमहोत्सव पूर्ती, राष्ट्रीय स्वयंसवेक संघाचे शंभराव्या वर्षात पदार्पण आणि सहजीवन व्याख्यानमालेची रौप्यमहोत्सवाकडे वाटचाल असा त्रिवेणी संगम साधत गुरुवारी (१९ डिसेंबर) राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.



सहकारनगर परिसरातील दशभुजा गणपती मंदिराजवळील फुलोरा मैदान येथे सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या सहजीवन व्याख्यानमालेत 'विश्वगुरु भारत' या विषयावर मोहन भागवत संवाद साधणार आहेत, अशी माहिती सहजीवन व्याख्यानमालेचे अध्यक्ष विनय कुलकर्णी आणि रवींद्र खरे यांनी सोमवारी दिली. यंदाची नियमित व्याख्यानमाला जानेवारीमध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

आणीबाणीनंतर म्हणजे १९७७ मध्ये वसंत व्याख्यानमालेत तत्कालीन सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचे व्याख्यान झाले होते. त्यानंतर ४७ वर्षांनी सहजीवन व्याख्यानमालेत सरसंघचालकांचे व्याख्यान आयोजित करण्याचा योग जुळून आला आहे, असे कुलकर्णी यांनी सांगितले.

### सिंहगड रस्त्यावर कोयत्याच्या धाकाने 50 हजारांची लूट

**पुणे, दि. १७ : प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावर दुचाकीस्वार तरुणाला कोयत्याचा धाक दाखवून चोरट्यांनी त्याच्याकडील ५० हजारांची रोकड लुटल्याची घटना घडली. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका २५ वर्षीय तरूणाने फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, दुचाकीस्वार चोरटा आणि साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी रात्री पावणेदहाच्या सुमारास विठ्ठलवाडी ते वडगाव दरम्यान असलेल्या कॅनॉल रस्त्यावर ही घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, फिर्यादी दुचाकीस्वार तरुण शुक्रवारी रात्रीघरी निघाला होता. त्यावेळी दुचाकीवरुन आलेल्या दोन चोरट्यांनी त्याला अडवले. 'गाडी हळू का चालवतोय',अशी विचारणा करुन चोरट्यांनी त्याला धमकाविण्यास सुरुवात केली. दुचाकीस्वार तरुणाला गाडी रस्त्याच्या कडेला लावण्यास सांगितले. चोरट्यांनी त्याला शिवीगाळ केली. चोरट्याबरोबर असलेल्या एका साथीदाराने तरुणाच्या गळयाला कोयता लावून जिवे मारण्याची धमकी दिली. तरुणाच्या खिशातील ५० हजारांची रोकड लुटून चोरटे दुचाकीवरुन पसार झाले. पसार झालेल्या चोरट्यांचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक संतोष भांडवलकर तपास करत आहेत.

# पुण्याला आता मंत्र्यांच्या खात्याची प्रतीक्षा

## पालकमंत्री हा कळीचा मुद्दा, कोणत्या दादांना मिळणार ?

**पुणे, दि. १७ : प्रतिनिधी**

निकाल लागल्यानंतर १३ दिवसांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्रीपदांचा निर्णय झाला. त्यात जिल्ह्याला उपमुख्यमंत्रीपद मिळाले. त्यानंतर पुन्हा १२ दिवसांनी जिल्ह्याला ३ मंत्रीपदे मिळाली. आता या मंत्र्यांना कोणती खाती मिळणार याची प्रतिक्षा लागली आहे. दोन दादांपैकी पालकमंत्री कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. दरम्यान मंत्रीपद मिळाले नाही अशा नाराज आमदारांना तुम्ही थोडी वाट पहा अशी समजूत काढत, त्यांच्याशी अडीच वर्षांचा वायदा केला असल्याचे समजते. त्यामुळेच त्यांच्यापैकी कोणीही उघडपणे नाराजीचा शब्दही काढायला तयार नाहीत.

मंत्रीपदासाठी नावे निश्चित करताना पिंपरी-चिंचवडवर मोठाच अन्याय झाल्याचे दिसते आहे. तिथून महेश लांडगे मंत्रीपदासाठी इच्छुक होते. मात्र त्यांनाही थांबावे लागणार असेच दिसते आहे. त्याशिवाय पुणे शहरातून कॅन्टोन्मेट मतदारसंघाचे आमदार सुनिल कांबळे यांना सामाजिक समिकरणातून संधी मिळेल असे सांगण्यात येत होते. मात्र त्यांची निराशा झाली आहे. पुरंदरमधून विजयी झालेले माजी मंत्री विजय शिवतारे यांनाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थांबायला सांगितले आहे. त्यांना यावेळी कॅबिनेट मंत्रीपदाची अपेक्षा होती, मात्र त्यांना डावलण्यात आले आहे. दिलीप वळसे यांना अजित पवार डावलतील असे अपेक्षीत होते. त्यामुळे त्यांच्या आंबेगाव मतदारसंघात निराशा पसरली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांची साथ सोडून अजित पवार यांच्याबरोबर आलेल्यांमध्ये वळसे यांचे नाव मोठे होते. मात्र आता त्यांच्यावर मंत्रीपदासाठी थांबण्याची वेळ आली आहे.

**तुम्हालाही संधी मिळेल**

मंत्रीपद न मिळालेल्या जिल्ह्यातील इच्छुक आमदारांना 'तुम्हालाही संधी मिळेल' असे वरिष्ठ नेत्यांकडून सांगण्यात आले आहे. त्यातही भाजपच्या आमदारांना सबूरीचा सल्ला देण्यात आला आहे. आपल्या आमदारांची संख्या बरीच मोठी आहे, त्यामुळेच इच्छुकांची संख्याही जास्त आहे, प्रत्येकाला मंत्री करणे शक्य नाही हे समजून घ्या, पुढील मंत्रीमंडळ विस्तारात किंवा अडीच वर्षांनी तुमचा विचार नक्की केला जाईल अशा शब्दांमध्ये वरिष्ठ नेत्यांनी नाराज आमदारांची समजूत घातली आहे.

**मंत्र्यांना कोणती खाती मिळणार?**

दरम्यान जिल्ह्यात मंत्रीपद मिळालेले चंद्रकांत पाटील व दत्ता भरणे हे अनुभवी मंत्री आहेत, तर पर्वती मतदारसंघातून चौथ्यांदा विजयी झालेल्या माधुरी मिसाळ यांना प्रथमच संधी मिळाली आहे. या मंत्र्यांना खाती कोणती मिळतील याची प्रतिक्षा आता जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात आहे. मिसाळ यांचा समावेश राज्यमंत्री म्हणून झाला आहे. त्यांना महिला बाल कल्याण किंवा महिलाविषयक अन्य खाते दिले जाईल अशी चर्चा आहे. भरणे मागील सरकारच्या काळातही राज्यमंत्रीच होते. यावेळी त्यांना महत्वाचे खाते दिले जाईल अशी चर्चा आहे. चंद्रकांत पाटील मागील सरकारमध्ये उच्च व तंत्रशिक्षण मंत्री होते. ते भाजपतील ज्येष्ठ आहेत. त्यामुळे यंदा त्यांनाही दुसरे महत्वाचे खाते मिळेल असे बोलले जाते. खुद्द अजित पवार हे अर्थमंत्री असतील असे खात्रीलायकपणे त्यांच्याच पक्षातून सांगितले जात आहे.

**पुण्याचा पालकमंत्री कोण होणार?**

जिल्ह्याचे पालकमंत्रीपद कोणाला हा कळीचा प्रश्न आहे. मागील सरकारच्या काळात अजित पवार सहभागी व्हायच्या आधी चंद्रकांत पाटील यांच्याकडेच पालकमंत्रीपद होते. अजित पवार यांनी मात्र सत्तेत सहभागी झाल्यानंतर लगेचच जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वत:कडे घेतले. आताही तेच जिल्ह्याचे पालकमंत्रीपद घेतील असे राजकीय वर्तुळातून खात्रीने सांगण्यात येत आहे. पाटील यांना दुसऱ्या एखाद्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद दिले जाण्याची शक्यता आहे.

# कर्तव्यावर असताना पोलीस उपनिरीक्षकाचा मृत्यू

**जळगाव, दि. १७ : प्रतिनिधी**

शहरातील स्वामी नारायण मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळयात कर्तव्यावर असताना पोलीस उपनिरीक्षक यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र रविवार (दि.15) रोजी दुपारच्या सुमारास त्यांचे निधन झाले असल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले.

भुसावळ रोडवरील स्वामी नारायण मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळयाच्या ठिकाणी कर्तव्यावर तैनात असलेल्या रामानंद नगर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक गौतम सांडू केदार (वय ५६, रा. पोलीस लाईन) यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांच्यावर गेल्या चार दिवसांपासून खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. उपचार घेत असताना रविवारी (दि.15) रोजी दुपारच्या सुमारास त्यांचे निधन झाले.

गौतम केदार यांना एक वर्षांपूर्वी उपनिरीक्षक पदावर पदोन्नती मिळाली होती. त्यानंतर त्यांची नियुक्ती रामानंद नगर पोलीस ठाण्यात झाली. भुसावळ रोडवरील स्वामी नारायण मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळयाच्या ठिकाणी कर्तव्यावर असताना, गुरुवारी (दि.12) रोजी सायंकाळी छातीत दुखू लागल्याने त्यांना तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरु असताना रविवारी (दि.15) त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे.

### ठाणे जिल्ह्यातून बनावट औषधांची रुग्णांना विक्री

#### आंतरराज्यीय टोळीचा सहभाग असण्याची शक्यता

**ठाणे, दि. १७ : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील भिवंडी शहरातून बनावट औषधांची रूग्णांना विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. औषध प्रशासनाने एक कोटी ८५ लाख रुपयांचा साठा जप्त केला असून ही औषधे अँटिबायोटिक (प्रतिजैविक) असल्याचे प्रशासनाने सांगितले. या प्रकरणी औषध प्रशासन विभागाकडून नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. आंतरराज्यीय टोळी यामध्ये सहभागी असून त्यादिशेने औषध प्रशासनाचा तपास सुरू आहे. गेल्या काही महिन्यांपासून बनावट औषधांप्रकरणी आतापर्यंत आठ गुन्हे दाखल झाले आहेत. या बनावट औषधांचा साठा सरकारी रुग्णालयांमध्येही विक्री झाल्याचे उघड झाले होते. भिवंडीमधील एका गोदामामध्येही बनावट औषधांचा साठा असल्याची माहिती औषध प्रशासनाला प्राप्त झाली होती. त्यानुसार औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी या औषधांचा साठा विक्रीस प्रतिबंधित केला होता. या औषधांचे नमुने तपासल्यानंतर ते बनावट आढळून आले. त्यानंतर पथकाने एक कोटी ८५ लाख रुपयांच्या बनावट औषधांचा साठा जप्त केला. याप्रकरणात औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनंतर नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रशियन तरुणींकडून सेक्स रॅकेट; पोलिसांनी केली कारवाई!

**ठाणे, दि. १७ : प्रतिनिधी**

कासार वडवली गावात एका इमारतीमधील खोलीत देहव्यापार सुरू असल्याची धक्कादायक बाब पोलिस कारवाईत निदर्शनास आली. देह व्यापार करणाऱ्या दलाल महिलेला ठाणे शहर पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने अटक केली. दोन महिलांची सुटका करण्यात पोलिसांना यश आले आहे. अन्य एका घटनेत तीन रशियन आणि एक भारतीय अशा चार महिलांची सुटका करण्यात ठाणे शहर पोलिसांना यश आले. ही कारवाई वागळे इस्टेट पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रवीण माने आणि पोलिस निरीक्षक प्रवीण सावंत यांच्या पथकाने केली.

कासार वडवली गावातील एका इमारतीत देहव्यापार सुरू असल्याची माहिती ठाणे शहर पोलिस दलातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या पोलिस निरीक्षक चेतना चौधरी यांना मिळाली. बोगस ग्राहक पाठवून कारवाई करण्यात आली आहे. यावेळी देहव्यापारात ओढल्या गेलेल्या दोन महिलांची पोलिसांनी सुटका करत दलाल महिलेला जेरबंद केले. याप्रकरणी कासार वडवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. दुसऱ्या घटनेत तीन रशियन आणि एक भारतीय अशा चार महिलांची सुटका करण्यात आली. मुंबईतील ७ ते ८ दलालांच्या टोळीचा शोध वागळे इस्टेट पोलिस घेत आहेत.

दरम्यान, ही कारवाई शनिवारी मध्यरात्री वागळे इस्टेट परिसरातील फ्यूजन ढाब्याजवळ केल्याची माहिती ठाणे शहर पोलिसांनी दिली. वागळे इस्टेट रोड नंबर १६ या ठिकाणी असलेल्या फ्यूजन ढाब्याजवळ मुंबईतील जुहू येथील दलाल व्हॉट्स ॲपवर रशियन आणि भारतीय महिलांचे फोटो पाठवून त्यांच्यामार्फत देहव्यापार करत आहे.

# कल्याण डोंबिवलीतील मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी अभय योजना

## ग्रामीण भागाला योजनेचा लाभ नाही

**कल्याण, दि. १७ : प्रतिनिधी**

कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने मालमत्ता कर आणि पाणीपट्टी थकबाकीदारांसाठी दोन टप्प्यांमध्ये अभय योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेत चालू वर्षाची पाणीपट्टी, कर थकबाकी मालमत्ता करधारकाने पालिकेच्या तिजोरीत विहित वेळेत भरणा केली तर त्या रकमेवरील दंड, व्याज माफ केले जाणार आहे.

पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, मालमत्ता कर उपायुक्त स्वाती देशपांडे यांच्या नियंत्रणाखाली ही योजना राबविण्यात येणार आहे. अभय योजनेप्रमाणे १४ डिसेंबर ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत मालमत्ता करधारकाने संपूर्ण थकबाकीसह चालू वर्षाची कराची आणि पाणीपट्टीच्या मागणीची संपूर्ण रक्कम एकरकमी पालिका तिजोरीत भरणा केल्यास संबंधित करधारकाचा दंड आणि व्याज शंभर टक्के माफ केला जाणार आहे.

दुसऱ्या टप्प्यातील अभय योजनेत, १६ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत संपूर्ण थकबाकीसह चालू वर्षाची कराची व पाणीपट्टीच्या मागणीची संपूर्ण रक्कम महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम ४१ खालील दंड व व्याज, नियम ५० खालील जप्ती अधीपत्र बजावणी शुल्क २५ टक्के एकरकमी पालिकेत भरल्यास ७५ टक्के शास्ती माफ केली जाणार आहे, असे पालिका अधिकाऱ्याने सांगितले.

**ग्रामीण भाग वगळला**

डोंबिवली जवळील २७ गावांचे नियंत्रक असलेल्या ई आणि आय पालिकेच्या प्रभाग हद्दीतील ग्रामपंचायत काळातील मालमत्ताधारकांच्या मालमत्तांची देयके प्रशासनाकडून दुरुस्त करून देण्यात आली आहेत. सदर मालमत्तांना पालिकेने व्याज आकारलेले नाही. त्यामुळे या मिळकतधारकांना अभय योजनेचा लाभ मिळणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सर्व मालमत्ता कर थकबाकीदारांनी अभय योजनेचा लाभ घ्यावा. पालिकेची अनुचित कारवाई टाळण्यासाठी विहित वेळेत कराच्या, पाणीपट्टीच्या थकित रकमा पालिका तिजोरीत भरणा करावयात, असे आवाहन कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

मागील दहा वर्षापासून पालिकेत कर थकबाकीदारांसाठी अभय योजना राबविण्या येते. यापूर्वी मालमत्ता कराचे सुमारे दोन हजाराहून अधिक थकबाकीदार होते. ही संख्या पालिकेने कर थकबाकीदारांविरुध्द राबविलेल्या मोहिमा, अभय योजना यांच्या माध्यमातून कमी केली आहे. ही संख्या आता सुमारे साडे चारशेवर आली आहे.

### शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र राज्याला रौप्य पदक




**सफाळे, दि. १७ : प्रतिनिधी**

नुकत्याच अमरावती, येथे पार पडलेल्या शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेमध्ये पालघर जिल्ह्यामधील दोन खेळाडूंनी रौप्य पदक मिळवून देण्याचा मोठा बहुमान महाराष्ट्र राज्याला मिळवून दिला आहे. हरियाणा विरुद्ध महाराष्ट्राचा संघ खेळत असताना ध्रुव मेरने चार गडी बाद केले तर हिमाचल विरुद्ध ऋणीता पाटीलने सात गाडी बाद केले.

महाराष्ट्राच्या संघामध्ये पालघर जिल्ह्यातील राजगुरू ह.म.पंडित विद्यालयाची विद्यार्थिनी ऋणिता पाटील व चंद्रप्रभा चित्तरंजन श्रॉफ विद्यालयाचा खेळाडू ध्रुव मेर यांची निवड झाली होती. या दोन्ही खेळाडूंनी महाराष्ट्रासाठी उत्तमात उत्तम खेळ करून महाराष्ट्राला रोप्य पदक मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. त्यांच्या या तुफान खेळी बद्दल पालघर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा क्रीडा परिषद गोविंद बोडके यांच्या हस्ते दोन्ही गुणवंत खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यावेळी राजगुरू ह.म पंडित विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मधुमती कुलकर्णी, श्रॉफ विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुचिता पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने, जिल्हा क्रीडा समन्वयक आशिष पाटील, क्रीडा मार्गदर्शक विशाल पाटील, अमृत घाडगे, प्रितेश पाटील, भक्ति अंब्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा क्रीड़ा परिषदअध्यक्ष तथा जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी सांगितले की, पालघर जिल्ह्यातील खेळाडूंची कामगिरी पाहता, पालघर जिल्हा नक्कीच ऑलिंपिक स्तरापर्यंत पोहोचेल याबाबत कोणतीच शंका नाही. पालघर जिल्ह्यातील खेळाडूंना आवश्यक मदत जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येईल.

# कल्याण-भांडुप परिमंडलातील 9 हजार 384 वीज ग्राहकांना 'अभय'

## 15 कोटी 84 लाख रुपयांचा भरणा; 31 डिसेंबरला संपणार मुदत

**कल्याण, दि. १७ : प्रतिनिधी**

थकबाकीमुळे वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित केलेल्या ग्राहकांसाठी महावितरणने आणलेल्या अभय योजनेचा कल्याण व भांडुप परिमंडलातील ९ हजार ३८४ जणांनी लाभ घेतला असून त्यांनी १५ कोटी ८४ लाख रुपयांचा भरणा केला आहे. थकीत रकमेवर विलंब आकार व व्याजमाफीसह मूळ थकबाकीत ५ ते १० टक्क्यांची सवलत या ग्राहकांनी मिळवली आहे. तर यातील साडेपाच हजार जणांच्या मागणीप्रमाणे त्यांची घरे पुन्हा प्रकाशाने उजळण्यासाठी वीजजोडणी देण्यात येत आहे. ३१ डिसेंबरला या योजनेची मुदत संपत असून लाभापासून वंचित दोन्ही परिमंडलातील उर्वरित ग्राहकांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करून संधीचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.अभय योजनेनुसार मार्च-२०२४ अखेर किंवा तत्पूर्वी वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित झालेले लघुदाब व उच्चदाब ग्राहक (सार्वजनिक पाणीपुरवठा व कृषीपंप ग्राहक वगळून) योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. थकबाकीची मुळ रक्कम एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात भरल्यास त्यावरील व्याज आणि विलंब आकार पुर्णतः माफ़ होईल. योजनेतील सहभागी ग्राहकांना एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात मूळ थकबाकी भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे. तर थकबाकी एकरकमी भरणाऱ्या उच्चदाब ग्राहकांना मूळ थकबाकीवर ५ टक्के आणि लघुदाब ग्राहकांना १० टक्के अतिरिक्त सवलत मिळणार आहे. मूळ थकबाकी एकरकमी अथवा ३० टक्के रक्कम भरुन योजनेत सहभागी होता येईल. त्यानंतर मागणीप्रमाणे तत्काळ पुन:र्जोडणी अथवा नवीन वीजजोडणी मिळेल. त्यासाठी पात्र ग्राहकांनी https://wss.mahadiscom.in/wss/wss या पोर्टलवर केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे. कल्याण परिमंडलातील ६ हजार ३९४ ग्राहकांनी अभय योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज केला आहे. यातील ५ हजार ४२७ ग्राहकांनी आत्तापर्यंत ६ कोटी ६४ लाख रुपयांचा भरणा केला असून त्यापैकी ३ हजार ५९६ जणांनी पुन:र्जोडणी अथवा नवीन वीजजोडणीची मागणी केली आहे. तर भांडुप परिमंडलातील ४ हजार ४०८ ग्राहकांनी अभय योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज केला आहे. यातील ३ हजार ६९१ ग्राहकांनी आत्तापर्यंत ९ कोटी २० लाख रुपयांचा भरणा केला असून त्यापैकी १ हजार ९०० जणांनी पुन:र्जोडणी किंवा नवीन वीजजोडणीची मागणी केली आहे.

कल्याण परिमंडल :-

| मंडल कार्यालय | योजनेत सहभागी ग्राहक | थकबाकी भरणा |
|---|---|---|
| कल्याण- एक | ८०२ | ८५ लाख |
| कल्याण- दोन | १,४९४ | २.११ कोटी |
| वसई | २,००७ | २.७१ कोटी |
| पालघर | १,१२४ | ९७ लाख |
| कल्याण परिमंडल | ५,४२७ | ६.६४ कोटी |

भांडुप परिमंडल :-

| मंडल कार्यालय | योजनेत सहभागी ग्राहक | थकबाकी भरणा |
|---|---|---|
| पेण | १,११५ | ३.२८ कोटी |
| ठाणे | ८६१ | १.३० कोटी |
| वाशी | १,९८१ | ४.६२ कोटी |
| भांडुप परिमंडल | ३,९५७ | ९.२० कोटी |

# लायन्स क्लब ऑफ सफाळे तर्फे माकणे येथे रक्तदान शिबिर



**सफाळे, दि. १७ : प्रतिनिधी**

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून आपल्या रक्तदानाने दुसऱ्याचे जीवन वाचत असेल तर ते निश्चितच सर्वश्रेष्ठ दान केलेच पाहिजे असे प्रतिपादन लायन्स क्लबच्या डिस्ट्रिक्ट कॉर्डिनेटर भारती पवार यांनी केले. श्री दत्त जयंतीच्या निमित्ताने लायन्स क्लब ऑफ सफाळे तर्फे जिल्हा परिषद शाळा माकणे येथे शनिवारी (तारीख १४) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन लायन भारती पवार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पवार यांनी सांगितले की, लायन्स क्लब ऑफ सफाळे नेहमी अभिनव उपक्रम राबवत असून यावर्षी क्लबने हिल मॅरेथॉन आयोजित करून संपूर्ण राज्याचे लक्ष वेधले. तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले श्री दत्त जयंती मंदिर समितीचे अध्यक्ष सुरेश तरे यांनी दत्त जयंतीच्या निमित्ताने आयोजित रक्तदान शिबिर व शालेय व खुल्या गटाच्या क्रीडा स्पर्धांमुळे हा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होत असून या उत्सवाचे हे ३६ वर्षे आहे असे सांगितले. रक्तदानाचे महत्त्व प्रत्येक शाळेमध्ये सांगणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन्स क्लब सफाळे अध्यक्ष प्रमोद पाटील होते. तर प्रोजेक्ट कॉर्डिनेटर म्हणून ॲड. नवीन घरत यांनी काम पाहिले. याप्रसंगी माकणे गावचे सरपंच प्रमोद शेलार, शेतकरी शिक्षण संस्थेचे संचालक रवींद्र गावड, ज्येष्ठ कबड्डीपटू सुधीर म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य योगेश पाटील, डॉ. आरती गायकर आणि त्यांचे सहकारी आणि लायन्स क्लब सफाळे सेक्रेटरी सचिन वर्तक, खजिनदार जतीन कदम, उपाध्यक्ष मनोज म्हात्रे आजी-माजी पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते. मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न राजीव गांधी रक्त पेढी मिरारोड यांनी रक्त संकलित केले.

### बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराला महंमद युनूस जबाबदार

#### शरद पवार यांच्या हस्ते दिलेला 'पर्सन ऑफ द इयर' पुरस्कार मागे घ्या!

**मुंबई, दि. १७ : प्रतिनिधी**

बांगलादेशातील शेख हसिना सरकार उलथवून लावल्यानंतर डॉ. महंमद युनूस यांच्या नेतृत्वाखाली सरकार अस्तित्वात आले; मात्र युनूस यांच्या सत्ताकाळात हिंदूंवरील आक्रमणे, हत्या, लुटालुट, महिलांवरील आणि लहान मुलांवरील अत्याचार, बलपूर्वक विस्थापन, मंदिरांचा विध्वंस यांमध्ये भयावह वाढ झाली आहे. बांगलादेशामध्ये प्रतिदिन मानवतेची हत्या असतांना तेथील अल्पसंख्यांक हिंदू समाज तसेच अन्य समुहांना सुरक्षित वातावरण देण्यात डॉ. महंमद युनूस हे पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. त्यामुळे संपूर्ण भारतात हिंदू आंदोलन करून तीव्र संताप व्यक्त करत आहेत. अशा मानवतेची हत्या करणाऱ्या डॉ. महंमद युनूस यांना सकाळ समूहाच्या वतीने वर्ष २००७ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रमुख आणि तत्कालीन केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या हस्ते दिलेला 'पर्सन ऑफ द इयर' पुरस्कार तात्काळ मागे घेण्यात यावा, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे. एरव्ही महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून अल्पसंख्यांकांच्या हितरक्षणाची आग्रही भूमिका मांडली जाते. महाराष्ट्रातील अल्पसंख्यांकांप्रमाणेच बांगलादेशातील अल्पसंख्यांक असलेल्या हिंदु, बौद्ध, ख्रिस्ती आदी समाजाप्रती ती सहानुभूती का दाखवली जात नाही ? बांगलादेशी हिंदू समाजाला भारतातील अल्पसंख्यांकांप्रमाणे सन्मानाने जगण्याचा अधिकार नाही का ? बांगलादेशातील हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध आदी अल्पसंख्यांक समुदायावरील अत्याचारांच्या घटना दिवसेंदिवस वाढत असतांना डॉ. महंमद युनुस यांची मूक बघ्याची भूमिका अनाकलनीय आहे. ही शांतता आणि मानवी हक्कांच्या विरोधी आहे. तरी त्यांना दिलेला पुरस्कार मागे घेण्याविषयी आणि या अत्याचारांविषयी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने भूमिका स्पष्ट करायला हवी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

## जमीनीच्या वादातून मित्राच्या मदतीने केला सख्या भावाचा खून

■ महासागर प्रतिनिधी,

**हिंगोली, दि. १७ :** सेनगाव तालुक्यातील शेगाव खोडके शिवारातील वडिलोपार्जीत जमीन आपल्यालाच मिळावी यासाठी मित्राच्या मदतीने सख्या भावाचा खून करून मृतदेह ओढ्यात खड्डा करुन पुरण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी दोघांवर रविवारी ता. १५ गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेगाव खोडके येथील शिवाजी किसन खोडके (२२) हा गुरुवारी ता. १२ दुपार पासून बेपत्ता झाला होता. त्याच्या कुटुंबियांनी त्याचा शोध घेतला मात्र तो कोठेही सापडला नाही. त्यामुळे त्यांनी याबाबत पोलिसांनाही माहिती दिली होती. मात्र त्याचा भाऊ हरिभाऊ किसन खोडके यानेच त्याचा खून केल्याची चर्चा गावात सुरु झाली होती. दरम्यान, शनिवारी ता.१४ दुपारी त्याचा भाऊ हरिभाऊ हा गोरेगाव पोलिस ठाण्यात आला व त्याने भाऊ शिवाजी याचा मित्राच्या मदतीने खून केल्याची कबुली दिली तसेच मृतदेह ओढ्याजवळ पुरुन टाकल्याचेही पोलिसांना सांगितले. त्यावरून अप्पर पोलिस अधिक्षक अर्चना पाटील, सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद झळके, उपनिरीक्षक नितीन लेनगुळे, जमादार अनिल भारती यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर तेथे पाहणी केली असता खड्डा दिसून आला. त्यानंतर तहसीलदार अशविनकुमार माने यांच्या उपस्थितीत खड्डा उकरला असता त्यात मयत शिवाजी याचा मृतदेह आढळून आला.

या प्रकरणात पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, वडिलोपार्जीत २५ एकर जमीन आपल्याचा मिळावी तसेच शिवाजी हा सतत अपमान करून बोलत असल्याने त्याला कामाच्या निमित्ताने पवन आखाडे याच्या शेतात बोलावून त्याचा खून केल्याची कबुली हरिभाऊ याने दिली. या प्रकरणी नारायण खोडके यांच्या तक्रारीवरून गोरेगाव पोलिसांनी हरिभाऊ खोडके, पवन आखाडे याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे.

## कृषी महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनात 'निशिगंध' चे बहारदार आयोजन



■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. १७:** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना वाव देणाऱ्या ६६ व्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन कृषी महाविद्यालयात १३ ते १५ डिसेंबर दरम्यान करण्यात आले होते. स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे अध्यक्षतेत १३ डिसेंबर रोजी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले होते. या प्रसंगी सुप्रसिद्ध हास्य कवी 'गुलेर' फेम नरेंद्र इंगळे यांची उपस्थिती होती. विविध राज्यातील विद्यार्थ्यांनी मराठीतून गायन भारुड आणि लावणीत सहभाग घेतला. स्नेहसंमेलनाचा बक्षिस वितरण समारंभ १५ डिसेंबर रोजी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र गाडे यांचे अध्यक्षतेत स्व. के. आर. ठाकरे सभागृहात पार पडला. याप्रसंगी अतिथींच्या हस्ते पारितोषिके वितरण संपन्न झाले. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या आयोजनात अधिष्ठाता कृषी डॉ. श्यामसुंदर माने यांच्या मार्गदर्शनात कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र गाडे, प्रा. डॉ. राजेंद्र वाळके, डॉ. वीरेंद्र ठाकूर, डॉ. मनोज मारावार, डॉ. दिलीप धुळे, डॉ. गिरीष जेऊघाले, डॉ. सुधीर दलाल यांच्यासह अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

असे झाले स्नेहसंमेलन : स्नेहसंमेलनादरम्यान संपूर्ण आठवडाभर क्रिकेट व्हॉलीबॉल, बुद्धीबळ, कॅरम, धावणे इत्यादी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. कलाप्रकारात विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, एकांकिका, नाटक, मुकाभिनय, एकपात्री प्रयोग इत्यादी प्रकारांमध्ये सहभाग नोंदवला. आनंद मेला, संगीत रजनी, स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाने स्नेहसंमेलन बहारदार झाले.

## मी कुटे, कुठेही कुटनीती केली नाही : आमदार संजय कुटे



■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. १७ :** छोडो कल किबाते, कल कि बात पुराणी, नये दौर मे लिखेंगे, मिलकर नई कहाणी ! अशी भावना व्यक्त करत आमदार डॉ. संजय कुटे यांनी सोशल मीडियावर आपल्या मत व्यक्त करताना आपण कुटे असलो तरी कुठेही कुटनीती केली नाही. सेवा हा माझा पिंड आहे, कुटनीती मला कधी जमली नाही. राजकारणामध्ये कुटनीती मोठ्या प्रमाणात वापरली जाते. पण माझ्या स्वभावात आणि संस्कारात कुटनीती कुठेही नाही. त्यामुळे कदाचित या प्रवाहात मी कुठेतरी बाजूला राहण्याचा प्रसंग माझ्यावर आला आहे.

आमदार डॉ. संजय कुटे यांना मंत्रीपद न मिळाल्यामुळे कार्यकर्त्यांनी निषेध केला होता. संतप्त भावना सोशल मीडियावर व्यक्त केल्या. नागपूरवरुन काही कार्यकर्ते काल परतले तर काही आज परतले आहे. दरम्यान या निषेध बाबत ते म्हणतात की, माझे जे स्वप्न जळगाव जामोद मतदारसंघाबद्दल आहे ते पूर्ण करणारच आहे. या पाच वर्षातील माझं जे व्हिजन आहे ते मी पूर्ण करणार आहे, त्यामुळे कुणीही नाराज होऊ नये. त्यागामध्ये मी कुठे कमी पडलो असे मला वाटत नाही. ज्या-ज्यावेळी पक्षाने मला त्याग करायचा सांगितले तेव्हा मी चांगल्या मनाने त्याग सुद्धा केलेला आहे. आज सुद्धा पक्षाने मला थांबवले याचे मला जरासुद्धा दुःख नाही. माझ्यामध्ये जेवढी क्षमता आणि शक्ती होती ती पक्षासाठी वापरली आहे. पण तरीसुद्धा मला स्वतःला असे वाटायला लागत की पार्टीच्या ज्या अपेक्षा होत्या पार्टीला जे हवे होते ते मी देऊ शकलो नसेल, कदाचित त्यामध्ये मी कमी पडलो असेल ते मी मान्य करतो. पक्षाने निर्णय का घेतला हे मला समजले नाही मतदार संघातील असो, जिल्ह्यातील असो वा राज्यातील माझा चाहता वर्ग हा आपल्या सर्वांचा आहे. निश्चित त्यांना वाईट वाटले असेल दुःख होत असेल. परंतु त्यांना माझे सांगणे आहे, मी आणि आपण सर्व पुन्हा एकदा जोमाने सेवा कार्य हाती घेणार आहोत. पद आज आहे उद्या नाही पदामुळे सेवा कार्य थांबता कामा नये. पक्षाने हा निर्णय का घेतला असेल हे मी सुद्धा समजू शकलेलो नाही.मीच कुठेतरी यामध्ये कमी पडलो आहे, त्यामुळे कदाचित पक्षाने हा निर्णय घेतला आहे. माझा लहान भाऊ असलेल्या आकाश फुंडकर यांचे मी मनापासून अभिनंदन करतो एक मोठी संधी पक्षाने त्यांना दिली आहे, एक युवा मंत्री म्हणून त्यांचे कार्य राज्याला पहायला मिळणार असल्याचा आनंद आहे.

## आरोपींना फाशी व्हावी; अन्यथा तीव्र आंदोलन

### शमुख खूनप्रकरणी मराठा समाजाची मागणी



■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. १७ :**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी सोमवारी सकल मराठा समाजातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी समाजातर्फे करण्यात आली. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

मराठा आंदोलक संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली. देशमुख यांचे जीपमधून अपहरण झाले होते. जीप बीड पोलिसांनी ताब्यात घेतली. या जीपमध्ये रक्ताचे डाग आढळले होते. सरपंच देशमुख यांनी पवनचक्की प्रकरणात खंडणीला विरोध केला होता. दरम्यान सोमवारी सकल मराठा समाजातर्फे निदर्शने करून निषेध करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. विनायकराव पवार, अशोक पटोकार, राजेश देशमुख, प्रा. संजय देशमुख, गजानन हरणे , विठ्ठल गाढे, देवराव पाटील, अरुण खोटरे राम मुळे, कल्पना बिडवे, योगेश थोरात, संजय सूर्यवंशी, प्रा. प्रशांत जानोळकर, प्रदीप चोरे आदी होते.

सूत्रधारास अटक करा; ॲड. निकम यांना नेमा हत्याकांडातील काही आरोपींना अटक करण्यात आली असली तरी अनेक जण उजळ माथ्याने फिरत आहेत. त्यामुळे या आरोपींसह सूत्रधारास अटक करण्याची मागणी सकल मराठा समाजाकडून करण्यात आली. या सूत्रधाराची कसून चौकशी केल्यास अनेक बाबी समोर येतील. खटल्यात विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली.

# उपोषण, बंद, निषेध आंदोलनाने गाजला जिल्हा

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. १७ :** बुलडाणा बीड जिल्ह्यातील सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते तथा सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ खामगाव येथे सकल मराठा समाजाच्या वतीने तीव्र निदर्शने करून निषेध नोंदवण्यात आला. यासह परभणी येथील घटनेचा निषेध करत मलकापूर पांग्रा, सिंदखेडराजा, किनगावराजासह इतर ठिकाणी कडकडीत बंद पाळण्यात आला. अतिक्रमण हटवणे व इतर मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीन उपोषणाची सुरु करण्यात आले आहेत. प्रतिनिधी मलकापूर पांग्रा परभणी येथे संविधानाच्या प्रतिकृती विटंबनेच्या घटनेच्या निषेधार्थ करण्यात आलेल्या आंदोलनानंतर पोलिसांच्या कोठडीत असलेल्या कार्यकर्त्याचा मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ मलकापूर पांग्रा येथे आज, दि. १६ डिसेंबर रोजी कडकडीत बंद पाळण्यात आला. मलकापूर पांग्रा येथे बंद दरम्यान बस स्थानक परिसरात असलेली सर्व दुकाने बंद ठेवण्यात आली. यावेळी परभणीतील घटनेच्या निषेधार्थ प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. तसेच या संदर्भात सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. या आंदोलनासाठी ग्रामपंचायत सदस्य राजू साळवे, दिलीप काकडे, बाळू पवार, रामेश्वर सोनकांबळे, गजानन चरवे, किशोर साळवे, अक्षय मगर, नवनाथ मगर, अर्जुन मगर, विनेश साळवे, अमोल पैठणे, साजिद पठाण, पवन साळवे, नंदकिशोर साळवे, संदीप साळवे, अक्षय साळवे, प्रदीप मगर, बबन राठोड, अभिमान साळवे, सुनील काकडे, सुनील बनसोडे, भीमराव साळवे, कैलास साळवे आदींनी पुढाकार घेतला.

प्रतिनिधी सिंदखेडराजा परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांचे मृत्यूची एसआयटीमार्फत चौकशी करून आरोपींवर कडक कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी आज, दि. १६ रोजी शहरात बंद पाळण्यात आला. यानंतर तहसील कार्यालयात नायब तहसीलदार नितीन बढे यांना बौद्ध समाज बांधवांच्या वतीने निवेदन देण्यात आले. संविधानाची विटंबना करण्यात आल्याच्या निषेधार्थ परभणी येथील बौद्ध बांधवांनी लोकशाही मार्गाने आंदोलन केले. परंतु, परभणी येथील पोलिसांनी जे आंदोलकांवर खोटे गुन्हे दाखल करून सोमनाथ सूर्यवंशी याचा खून केला आहे. तसेच राज्यात संविधान व दलित सुरक्षित नाहीत, असे या निवेदनात नमूद करण्यात आले. या निवेदनावर सिद्धू जाधव, बालू म्हस्के, महेश सोनुने, किशोर पाडमुख, प्रेमाद म्हस्के आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान, आंदोलनकर्ते शहर बंद करत असताना बस स्थानक चौकात ओबीसी नेते छगन भुजबळ यांचा मंत्रीमंडळात समावेश न केल्यामुळे ड. संदीप मेहेत्रे, राजेंद्र अंभोरे, उमेश खरात यांनी राज्य सरकारचा निषेध नोंदवला.



प्रतिनिधी बुलडाणा परभणी येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची एका विकृत बुद्धीच्या व्यक्तीने तोडफफोड केली. या घटनेच्या निषेधार्थ आज १६ डिसेंबर रोजी शहरातील आंबेडकरी जनतेच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राज्यपालांना निवेदन देण्यात आले. परभणी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे तोडफफोड करणाऱ्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा, त्याची नार्को टेस्ट करून मास्टरमाइंडचा शोध घेण्यात यावा आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. निवेदनावर कुणाल पैठणकर, नीलेश गायकवाड, अमोल खरे, प्रतीक जाधव, विनोद इंगळे, डी.आर.इंगळे, मच्छिंद्र इंगळे, सतीश खोडके, तुषार खरे ,दादासाहेब काटकर, मंगेश इंगळे, मुकेश हिवाळे, आशिष खरात, अनंता मिसाळ, किशोर सुरडकर, आकाश हिवाळे, नीलेश राऊत, उमेश हेलोडे, लखन गाडेकर, धम्मरत्न गवई, मल्हारी गवई, दामोदर बिडवे, प्रशांत जाधव, विजय ससाने, गजानन अंभोरे, गौरव अंभोरे यांच्या सह्या आहेत.

## प्राण्यांपासून पिकांच्या संरक्षणासाठी प्लास्टिक गनचा वापर

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. १७ :** बुलडाणा बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतात हरिण, वराह व इतर वन्य प्राण्यांपासून मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. हरणांसारख्या प्राण्यांकडून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागते. यामुळे शेतकरी वैतागला आहे. यावर उपाय म्हणून प्राण्यांना शेतामधून पळवून लावण्यासाठी प्लास्टिक गनचा वापर बाजारात केला जात आहे. ती अल्प दरात बाजारात उपलब्ध झाल्यामुळे त्याचा शेतकऱ्यांना फायदा होत आहे. वन्य प्राण्यांना पळवून लावण्यासाठी रात्री अप रात्री शेतकऱ्यांना ओरडून पळवून स्वतः त्या ठिकाणी उपस्थित राहून फटाक्याचे आवाज करणे हे उपाय पूर्वी वापरले जायचे.

मात्र, आता ओरडत थांबण्यासाठी माणूस नाही. तर फटाके फोडणे हे परवडत नाही, ती बाब खर्चिक झाली आहे. लाऊड स्पीकरवर आवाज करून प्राण्यांना पळवावे लागते. त्या तुलनेत प्लास्टिक गन अनेक दिवस उपयोगात आणली जाऊ शकते. अशा प्रकारची गन जिल्ह्यातील विविध तालुक्यातील बाजारात विक्री होत असून, शेतकरी ही ते घेऊन शेतात वापरताना दिसत आहे. वन्य प्राण्यांपासून पिकाची नासाडी व नुकसान कमी करण्यासाठी ही गन उपयोगी ठरत आहे. ही गन प्लास्टिक



गनमध्ये खालच्या बाजूने प्रेशर देण्यासाठी एक पाइप दिलेला आहे. या गनमध्ये काही प्रमाणात कार्पेट (बोरक्स रॉक) हे वेल्डिंगला वापरला जाणारा पदार्थ वापरतात.

कार्पेट व थोडेसे पाणी टाकून प्रेशर दिले जाते. बुलडाणा बाजारपेठेमध्ये अगदी दोनशे रुपयांच्या किमतीत वन्य प्राण्यांना पळवण्यासाठी प्लास्टिकच्या पाइपापासून बनवलेले पाइप गन विक्रीसाठी आले आहे.

केवळ २०० रुपयांमध्ये तयार होते प्लास्टिकची गन या पाइप गन आवाजामुळे स्वतःच्या शेतीचेही संरक्षण होते.

त्याचबरोबर आजूबाजूच्या शेजाऱ्यांच्या ही शेताचे वन्य प्राण्यांपासून संरक्षण होते. रात्रीच्या वेळी शेतात सर्वत्र न हिंडता एकाच ठिकाणी बसून ही पाइपगन वापरून आपण शेती पिकाचे संरक्षण करू शकतो.

हे प्लास्टिक गन बाजारात दोनशे रुपयाला उपलब्ध असून यासाठी लागणारे कार्पेट हे वेल्डिंग मटेरियल सुद्धा स्वस्त आहे. प्राणी हाकलण्यासाठी वन विभागाच्या परवानगीची गरज नाही भअनेक शेतकरी फटाके फोडून वन्य प्राण्यांना हाकलण्याचा प्रयत्न करत असतात. फटाक्यांमुळे अनेकवेळा प्राणी जखमी ही होतात. त्या तुलनेत प्लास्टिक गन योग्यच आहे. शिवाय या गनला वन विभागाची परवानगी देखील लागत नाही.

**- अभिजीत ठाकरे, आरएफओ, बुलडाणा**

### बाजारात गनला वाढती मागणी

पाइप गन प्लास्टिकच्या पाइपापासून अतिशय कमी खर्चात तयार होणारे शेती उपयोगी उपकरण आहे. तसेच सुरक्षितपणे दिवसा व रात्री वन्य प्राण्यांपासून संरक्षणासाठी याचा उपयोग केला जातो. त्यामुळे याची मागणी बाजारात वाढत आहे. सर्वत्रच आता शेतकरी या पाइप गनचा वापर करताना दिसत आहेत

**-संगीता पवार, विक्रेती,**

## थंडीचा जोर वाढताच सुका मेव्याचे मार्केट गरम!

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. १७ :** शहरासह जिल्ह्यात एक आठवड्यापासून थंडीचा जोर वाढला असून तापमानाचा पारा १० अंशाच्या खाली आला आहे. यामुळे सुकामेव्याला चांगली मागणी वाढल्याचे चित्र आहे. हिवाळा हा ऋतू आरोग्यवर्धक असल्याने पारंपरिक पद्धतीने या मोसमात पौष्टिक आहार खाण्याकडे कल असतो. थंडीच्या दिवसात शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त असलेल्या पौष्टिक सुकामेव्याचे लाडू तयार करण्याची लगबग घराघरात सुरु झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर सुक्या मेव्याची बाजारपेठ फुलली असून गतवर्षापेक्षा १० टक्क्यांनी मागणी वाढल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

हिवाळ्यात शरीर सुदृढ ठेवण्यासाठी जीममध्ये जाणा?यांची संख्या वाढली आहे. व्यायामाबरोबरच आहारावरही लक्ष केंद्रीत केले जाते. व्यायामासोबत



पोषक असा आहार घेण्यासाठी डिंक, शेंगदाणे,मेथी आदींपासून तयार केलेल्या लाडूंचा वापरही मोठ्या प्रमाणात केला जातो. हे पदार्थ बनवण्यासाठी सुकामेवा वापरला जात असल्याने काजू, बदाम, पिस्ता, खारिक, खोबरे,तूप आदींना मागणी आहे. दिवाळीपासून थंडीला सुरुवात होते. यावर्षी मात्र थंडीला उशिराने सुरुवात झाली आहे. हिवाळ्यात सुकामेव्याचा वापर आरोग्य पोषक मानला जातो. त्यामुळे या ऋतूत सुका मेव्याची खरेदी केली जाते. उर्वरित पान ४ सुकामेवा भाव प्रति किलो अंजीर ८०० ते १२०० रुपये काजू ८०० ते १००० रुपये अक्रोड ८०० ते १२०० रुपये बदाम ७२० ते ८५० रुपये पांढरा डिंक ४०० ते ८०० रुपये खारीक २८० ते ५५० रुपये जर्दाळू ७०० ते १००० रुपये खजूर १०० ते १२० रुपये किसमिस ३०० ते ४५० रुपये काळा मनुका ४०० ते ८०० रुपये खोबरे २०० ते ३०० रुपये बाजारातील सुकामेव्याचे वाढलेले दर हिवाळ्यात मिळते ऊर्जा भहिवाळ्यात शरीराला ऊर्जा देणा?या पौष्टिक लाडूसाठी मेथी, डिंक आणि सुका मेवा, तूप यांचा वापर केला जातो. त्वचा, मेंदू व हाडांच्या बांधणीसाठी व हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहे. डिंक आपल्याला चांगली ऊर्जा तर देतेच. पण आपल्या त्वचेचे व आतड्यांचे देखील आरोग्य चांगले ठेवण्यास यामुळे चांगली मदत करते. तसेच ज्यांना बद्धकोष्ठतेचा त्रास आहे, त्यांचा त्रास कमी होण्यास याची खूप मदत होते.

## विद्यार्थ्यांनी प्रस्तुत केली संसदेची कार्यप्रणाली

### लोकसभेतील कार्यपद्धतीचे सादरीकरण

■ महासागर प्रतिनिधी,

**खामगाव , दि. १७ :** संस्कार ज्ञानपीठ शाळेतील विद्यार्थ्यांनी नुकतेच संसदेची कार्यप्रणाली सादर करत मॉक पार्लमेंट' मध्ये समान नागरी कायद्यावर चर्चा केली. लोकसभेमध्ये चालणा?या कार्यपद्धतीचे सजीव व हुबेहुब प्रस्तुतीकरण विद्यार्थ्यांनी केल्याने विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

संस्कार ज्ञानपीठ च्या इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी 'मॉक पार्लमेंटचे' सादरीकरण सर्व विद्यार्थ्यांसमोर केले. यावेळी लोकसभेतील सत्तारूढ पक्ष तसेच विरोधी पक्षांद्वारे समान नागरी कायदा या बिलावर प्रदीर्घ चर्चा करण्यात आली. प्रारंभी संसदेची कार्यवाही कशी चालेल याचे विस्तृत विश्लेषण मनस्वी महाले व सई उगले यांनी संचलन स्वरुपात केले.

त्यानंतर कायदामंत्री विराज थोटांगे याने समान नागरी कायदा बील पटलावर मांडत लोकसभा अध्यक्ष तनिशा जयस्वाल हिच्या



अनुमतीने चर्चा घडवून आणली. पंतप्रधान अथर्व साकेत सराफ याने बिलावर प्रकाश टाकला. विद्यार्थी विरोधी पक्षनेत्या स्नेहा टिकार हिने या विषयाला विरोध केला. चर्चेदरम्यान विरोधी पक्षातील सदस्य सरकारविरोधात घोषणाही देत असल्याने लोकसभेचे सजीव चित्रण प्रगट केले.

खासदार म्हणून विद्यार्थी हर्ष बोंद्रे, हर्षित चांडक,आरुष वानखडे, सीया चावंडे, दिव्या भाटे, कनक जोशी, निष्का शर्मा यांनी सरकारच्या बाजूने तर अनुष्का टिकार, श्रावणी देवकते, नैतीक गणात्रा, अनया रायने, मेहा चांडक, मधुजा काळे, तपस्या हिंगणकार यांनी विरोधात मत प्रदर्शन केले. लोकसभेचे कामकाज सचिव मैत्री कमानी, स्वरांश जेवे, मिझनुर यांनी पाहिले. लोकसभेत अहवाल सादर करण्याचे काम राष्ट्र पती तन्वी बोदडेला सादर करण्यात आला. हे बिल राज्यसभेनंतर विद्यार्थी राष्ट्रपती तन्वी बोदडेने अभिभाषण देत मताधिक्याने मंजूर केले. पार्लमेंटसाठी नमन माहेश्वरी, क्षितिज थोटे यांच्यासह संदीप हेलोडे, अर्जुन वानखडे, सरिता गांधी, स्वप्ना चव्हाण, शीतल खंडेलवाल, भारती बायस्कर, सोनाली बोबडे, मानसी सुरेका, श्रावणी काळे यांनी परिश्रम तर प्राचार्य प्रशांत धर्माधिकारी यांनी मार्गदर्शन केले.



## अतिक्रमणधारकांना पर्यायी जागा देण्याची महाविकास आघाडीची मागणी

### डॉ.जयश्री शेळके यांच्या वतीने जिल्हाधिका ऱ्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. १७ :** बुलडाणा व मोताळा शहरातील विविध भागात सुरु असलेली अतिक्रमण हटाओ मोहिमेला थांबवून व्यावसायिकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा. यासाठी आज महाविकास आघाडीच्या नेत्या डॉ.जयश्री शेळके यांच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले . पर्यायी जागा उपलब्ध न करता त्यांचे व्यवसाय उठवून व्यावसायिकांच्या पोटाची भाकर हिसकावून घेऊ नका अशी मागणी डॉ.जयश्री शेळके यांनी प्रशासनाकडे केली आहे.

नझूलच्या जमिनीबाबत नगरपालिका कोणत्या आधारावर नोटिसा काढत आहेत, अशी विचारणा करत माजी आमदार सपकाळ यांनी व्यावसायिकांकडे सहानुभूतीने पाहण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

यावेळी नरेश शेळके, तुळशीराम काळे, लखन गाडेकर, दत्ता काकस, अनिल बावस्कर, आशिष खरात, जाकिर कुरेशी, सत्तार कुरेशी, स्मिता वराडे, सपना इंगळे, कीर्ती परिहार, वंदना जवंजाळ, संदीप बोर्डे उपस्थति होते.

## चांडक विद्यालयात भरली चवदार खाद्याची जत्रा



**मलकापूर :** येथील लिलाधर भोजराज चांडक विद्यालयात स्काऊटगाईड विभागाच्या वतीने खरी कमाई उपक्रमांतर्गत चवदार खाद्याची जत्रा भरली होती. कार्यक्रमाचे उद्घाटन नगर सेवा समिती कार्यवाहक दामोदरदास लखानी यांच्या हस्ते करण्यात आले. खाद्य जत्रेचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वता घरी तयार केलेले विविध खाद्यपदार्थ विक्रीसाठी सादर केले होते. पोहे, इडली, खमंग ढोकळा, वडापाव, पाणीपुरी, आलू पोंगे, कचोरी, भेळ, चना मसाला, बालुशाही यांसारख्या चविष्ट पदार्थांनी जत्रेत रंगत आणली. या पदार्थांना उपस्थित शिक्षक, पालक आणि पाहुण्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रत्येकाने विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि कल्पकतेचे कौतुक केले. दरवर्षी विद्यालयात आयोजित होणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना श्रम प्रतिष्ठा, स्वावलंबन, उपक्रमशीलता आणि उद्यम शीलता यांचे महत्त्व पटवून दिले जाते. आर्थिक स्वावलंबनाबरोबरच श्रमाचे खरे मूल्य आणि समाज सेवेचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये विकसित होतो. त्यांच्या कौशल्यपूर्ण संयोजनामुळे विद्यार्थ्यांनी श्रमाचे महत्त्व अनुभवले आणि त्यांच्या आत्मविश्वासाला बळ मिळाले. कार्यक्रमाला शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेने आणि प्रयत्नांनी भरलेली ही खाद्य जत्रा सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली. विद्यालयातील हा उपक्रम भविष्यातही आम्हा विद्यार्थ्यांना जीवन कौशल्ये आत्मसात करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. जयंत राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्काऊटर मंगलसिंग सोळंके, गाईड सीमा सकळकले आणि कांचन सुरळकर यांनी विशेष परिश्रम घेतले. चविष्ट पदार्थांनी आली जत्रेला चांगलीच रंगत विद्यार्थ्यांनी स्वत: घरी तयार केलेले विविध खाद्यपदार्थ विक्रीसाठी सादर केले होते. पोहे, इडली, खमंग ढोकळा, वडापाव, पाणीपुरी, आलू पोंगे, कचोरी, भेळ, चना मसाला, बालुशाही यांसारख्या चविष्ट पदार्थांनी जत्रेला रंगत आणली.

# अल्पसंख्याकांची परवड होता कामा नये!



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

अल्पसंख्याक लोकांना पुढे आणण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी हा दरवर्षी १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्याक हक्क दिन म्हणून देशात साजरा केला जातो. मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, पारशी आणि जैन हे भारतातील अल्पसंख्याकांमध्ये गणले जातात. यानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.


भारतीय राज्यघटनेनुसार देशातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळाले पाहिजेत, मग ती कोणतीही जात, धर्म, भाषा किंवा समुदाय असो. देशाच्या संविधानात अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची तरतूदही आहे. संविधानातील तरतूदीनुसार व कायदेशीरप्रमाणे भारतामध्ये धार्मिक अल्पसंख्याक आणि भाषिक अल्पसंख्याक असे दोन प्रकारचे अल्पसंख्याक समुदाय आहेत.

भारतामध्ये राहणाऱ्या व त्यांची वेगळी भाषा व लिपी असणाऱ्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्याक म्हणून गणण्यात येते तर राज्यामध्ये राज्यभाषेव्यतिरिक्त इतर भाषा मातृभाषा असलेल्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्याक म्हणून गणण्यात येते. महाराष्ट्रामध्ये मराठी व्यतिरिक्त अन्य भाषा मातृभाषा असणाऱ्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्याक गणण्यात येते.

केंद्रीय गृहमंत्रालयाने 1978 मध्ये एक ठराव पारीत केला, ज?यामध्ये अल्पसंख्याक समाजातील लोकांसाठी एक आयोग स्थापन करण्याचे सांगण्यात आले. त्यासोबतच भारतीय संविधानात संरक्षणाचे अनेक कायदे असल्याचेही सांगण्यात आले, असे असूनही अल्पसंख्याकांना असुरक्षित वाटत आहे. एवढेच नाही तर त्यांच्याशी भेदभाव केला जातो, हे संपवण्यासाठी अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्यात आली. यासोबतच 1992 मध्ये राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाने कायदा केला. ज्याअंतर्गत 1993 ची अधिसूचना आली.

ते लोक अल्पसंख्याक समाजात येतात, जे आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या मागासलेले आहेत. याशिवाय ज्यांची लोकसंख्याही कमी आहे. त्यांची भाषा, धर्म, परंपरा सर्वसामान्य समाजातील लोकांपेक्षा वेगळी असावी. मात्र शेजारील देशातील अल्पसंख्याक निर्वासितांना नागरिकत्व देण्याच्या कायद्याला विरोध करत सर्वोच्च न्यायालयाने नवा निर्णय देत अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांची व्याख्या स्पष्ट केली आहे. हा निकाल देताना न्यायालयाने म्हटले की, धर्माला मर्यादा नाही. धर्माकडे राज्याच्या दृष्टीने न पाहता अखिल भारतीय पातळीवर पाहिले पाहिजे.

अल्पसंख्याक हा शब्द प्रामुख्याने राष्ट्रीय कायदेमंडळातील राजकीय पक्षांना संदर्भित केला जात असे, वांशिक, राष्ट्रीय, भाषिक किंवा धार्मिक गटांना नाही. पॅरिस परिषदेचे श्रेय अल्पसंख्याकांच्या हक्कांची संकल्पना मांडण्यात आले आणि त्याला महत्त्व दिले गेले. 1814 मध्ये व्हिएन्नाच्या काँग्रेस मध्ये अल्पसंख्याकांच्या हक्कांचा मुद्दा प्रथम उपस्थित करण्यात आला होता, ज्यामध्ये जर्मन ज्यू आणि विशेषतः पुन्हा एकदा फाळणी झालेल्या ध्रुवांच्या भवितव्यावर चर्चा करण्यात आली होती.



काँग्रेसने आशा व्यक्त केली की प्रशिया, रशिया आणि ऑस्ट्रिया त्यांच्या अल्पसंख्याकांना सहिष्णुता आणि संरक्षण देतील, ज्यांचा शेवटी त्यांनी दुर्लक्ष केले, संघटित भेदभावात गुंतले.

हंगेरीच्या क्रांतिकारी संसदेने जुलै 1849 मध्ये प्रथम अल्पसंख्याक हक्कांची घोषणा करुन ती अंमलात आणली. त्यानंतर 1867 मध्ये ऑस्ट्रियन कायद्यात अल्पसंख्याक हक्क संहिताबद्ध करण्यात आले.

तथापि रशियन सरकारने आपल्या खेड्यांमध्ये ज्यूंविरुद्ध होणारे दुष्ट पोग्रोम सहन केले. या धोरणासाठी रशियावर मोठ्या प्रमाणावर हल्ले झाले. याउलट आफ्रिकन वसाहती स्वतंत्र झाल्यापासून दक्षिण युनायटेड राज्यामधील कृष्णवर्णीय लोकांसारख्या इतर अल्पसंख्यांकांच्या वागणुकीबाबत फार कमी किंवा कोणताही आंतरराष्ट्रीय आक्रोश नव्हता. पहिल्या महायुध्दापूर्वी फक्त तीन युरोपीय देशांनी वांशिक अल्पसंख्याकांचे हक्क घोषित केले आणि अल्पसंख्याक-संरक्षणात्मक कायदे लागू केले.

पहिला हंगेरी (1849 आणि 1868), दुसरा ऑस्ट्रिया (1867) आणि तिसरा बेल्जियम (1898) होता. पूर्वीच्या काळात इतर युरोपीय देशांच्या कायदेशीर प्रणालींनी प्राथमिक शाळांमध्ये, सांस्कृतिक संस्थांमध्ये, सार्वजनिक प्रशासनाच्या कार्यालयांमध्ये आणि कायदेशीर न्यायालयांमध्ये युरोपियन अल्पसंख्याक भाषा वापरण्यास परवानगी दिली नाही.

भाजप नेते अश्वनी कुमार यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. यामध्ये जम्मू-काश्मीर आणि ईशान्येकडील राज्यांसह एकूण 8 राज्यांमध्ये हिंदू समाजाच्या लोकांची लोकसंख्या कमी असल्याचे सांगण्यात आले. यामुळे त्यांना अल्पसंख्याकांच्या श्रेणीत ठेवण्यात आले आहे.

अशा स्थितीत ना त्यांना सरकारी सुविधा मिळू शकल्या, ना त्यांचे हक्क मिळू शकले. याशिवाय असे विचार टाळायचे असतील तर, या प्रकरणांची न्यायालयातही सुनावणी झाली पाहिजे, असे याचिकेत म्हटले आहे.

अल्पसंख्याक हे धर्म, भाषा, राष्ट्रीयत्व किंवा जात यावर आधारित असतात. तेव्हा संयुक्त राष्ट्राने म्हटले की, अल्पसंख्याकांची संस्कृती, धर्म इत्यादींच्या रक्षणासाठी देशांना पावले उचलावी लागतील, जेणेकरून त्यांचे अस्तित्व धोक्यात येऊ नये म्हणून संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने 1992 मध्ये या दिवसासाठी 18 डिसेंबर निवडला होता.

संयुक्त राष्ट्राने उचललेले हे मोठे पाऊल होते. विशेषतः भारताच्या दृष्टिकोनातून, हे लक्षात घेऊन भारतात अल्पसंख्याक आयोगाची निर्मिती करण्यात आली. हा आयोग अल्पसंख्याक लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पावले उचलतो आणि बहुसंख्य लोकांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करतो.

राष्ट्रीय अल्पसंख्याकांच्या संरक्षणाच्या क्षेत्रात युरोपियन युनियनची थेट भूमिका अजूनही खूप मर्यादित आहे. सामान्य आंतरराष्ट्रीय कायदे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या युरोपीय प्रादेशिक प्रणालीवर अवलंबून आहे आणि आवश्यकतेनुसार त्यांचे मानदंड स्वीकारले. पण 1990 च्या दशकात सुरू झालेल्या युरोपियन एकात्मतेचे डी-इकॉनॉमायझेशन ही परिस्थिती बदलत आहे. राष्ट्रीय अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची राजकीय प्रासंगिकता खूप जास्त आहे. अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

●●●●●●

# शून्य हव्यास!



मनोहर गोपालकृष्ण प्रभु पर्रीकर यांची जयंती तीनचार दिवसाआधी होती. ती कुठे, कोणत्या पक्षाकडून, संघटनांकडून, चाहत्यांकडून कुठे, कशी साजरी झाली? ठाऊक नाही.

संरक्षण मंत्री व गोव्याचे मुख्यमंत्री राहिलेल्या मनोहर पर्रीकर यांना स्वतःला निष्ठावान संघ स्वयंसेवक म्हणवून घेण्यात त्यांना गौरव वाटायचा..! आजच्या काळातील राजकारणी असून सुद्धा आणि तीन-चार वेळा मुख्यमंत्री होऊन सुद्धा स्वतःच्या दोन्ही मुलांसाठी हा माणूस साधा एक मतदारसंघ बांधू शकला नाही.

त्याचे कारण फार विचित्र आहे. शून्य हव्यास हे त्याचे कारण...! ना मुलाला किंवा सुनेला आमदार-खासदार पद तर सोडाच पण साधं नगरसेवक पदही देऊ शकलेला नाही हा मनुष्य.

आज भारतातील निम्म्याअधिक गोवऱ्या मसणात गेलेले नेते, बोलता येत नाहीये की नीट चालता येत नाही, पण मुलांसाठी, नातवांसाठी, पुतण्यासाठी, पुतण्याच्या मुलांसाठी मतदारसंघात फिर फिर फिरत आहेत...स्वतःची जागा देऊ करतं असताना पर्रिकरांचा निस्वार्थीपणा गटात न बसणारा शब्द वाटतो.

आजकालचा शेंबडा अपक्ष नगरसेवक सुद्धा स्कॉर्पिओ पेक्षा खालच्या दर्जाच्या गाडीवर बुड टेकवण हा आपल्या स्टेट्सचा अपमान समजतो तिथे पर्रीकरभाऊ मासे घ्यायला फडतूस स्कुटीवर गोवा फिरायचे..
शी...कसं दिसतं ते..!!
म्हणे आयआयटीत शिकला... पण काय उपयोग सत्तेचा उपभोग घेणं जमलं का त्यांना..? रात्री ऑफिसमध्ये काम पूर्ण करे पर्यंत खूप उशीर झाला म्हणून सेक्रेटरीला उद्या जरा उशिरा आलास तरी चालेल असं म्हणून सकाळी ६:३० वाजता बोलावणं आणि त्याच्या आधी स्वतः सकाळी ५:३० वाजता ऑफिसला पोहोचणं हे एकविसाव्या शतकातील मुख्यमंत्र्याला शोभत का...?

आता गोव्यासारख्या ठिकाणी विदेशातून येणाऱ्या शिष्टमंडळाला महागडी दारू पुरवताना येणारा खच सरकारवर नको म्हणून प्रोटोकॉल असताना सुद्धा सरकारी तिजोरीतून न देता स्वतःच्या खिशातून देणं म्हणजे जरा अतीच झालं.


इथे भ्रष्टाचाराच्या आरोपात कोर्टाने पोलीस कोठडी दिली म्हणून लगेच कसंतरी (कसनुसं) होतंय म्हणून लीलावती, जसलोक मध्ये ठिय्या मांडणारे शेकडो नेते आजूबाजूला असताना कॅन्सर होऊनही अगदी शेवटच्या क्षणापर्यंत विधानसभेत येणारे, पुलाच्या कामाची पाहणी करणारे तुम्ही अखंड भारतातील पहिलेच राजकारणी आहात. प्रॉपर्टी, बंगले, बँक-बॅलन्स, साखर कारखाना, सूत गिरणी, दूध डेअरी, पुतळे, स्मारके असे मागे काहीचं ठेवलं नाही. तुमच्या मुलाने किंवा नातवंडांनी आता काय करायचं...??
सवय नव्हती अहो आम्हाला एवढ्या प्रामाणिकपणाची. कारण राजकारणात राहून सुद्धा लालबहादूर शास्त्री होऊ शकतो हे फक्त पुस्तकात वाचलं होतं. तुमच्याबद्दल कळायला लागलं तेंव्हा वाटलं सगळेच बरबटलेले असताना असं एकट्या-दुकट्याच स्वच्छ आणि स्वयंसेवक' म्हणून वागणं किती दिवस टिकणार आहे.
पण तुमची निष्ठा एवढी तगडी होती की साधा हाफ शर्ट आणि चप्पल घालून तुम्ही मॉडर्न गोवा ते सर्जिकल स्ट्राईक सारं काही घडवून आणलं.
पण खरं तर तुमच्यासारखी काही माणसं आपल्या देशात आहेत आणि त्यांच्याच जीवावर हा देश चालतो आहे हे आम्हाला उशीराच कळलं. बहुतेक तुमच्या सारखी माणसं देवाला त्याच्या दरबारात जग चालवण्यासाठी हवी असावीत म्हणूनच कॅन्सरसारखं कारणं देऊन त्याने तुम्हाला बोलावुन घेतलं.
सर.... एक आदर्श म्हणून तुमची कमी नेहमीच जाणवेल आणि म्हणूनच तुमच्या सारखा मूल्यांवरती जगण्याचा प्रयत्नही नक्कीचं करू. साधेपणाने राहून प्रामाणिकपणे आयुष्यात खूप काही करता येतं हे शिकवल्याबद्दल आम्ही आपले आजन्म कृतज्ञ राहू. विनम्र अभिवादन....

---------------

**एक निष्ठावान चाहता**

●●●●●●





# 'सक्सेसफुल' फेल्युअर!

काल परवा एका कार्यक्रमात सचिन विनोदची भेट झाली आणि परत एकदा समाजातील विविध क्षेत्रातील सो कॉल्ड तज्ज्ञांनी आपापले उपदेशाचे डोस पाजळणे सुरू केले..
विनोद कसा स्वतःवर नियंत्रण ठेवू शकला नाही.. पैसे, प्रसिद्धी डोक्यात गेली..व्यसनं केली.. संस्कार वगैरे वगैरे..
जे स्वतःच्या क्षेत्रात स्वतःच्या गावात,शहरातही कधी पहिले आले नसतील ते लोकंही विनोदवर काहीही प्रॉपर माहिती नसलेले स्टेटमेंट्स देतात..
विनोद त्याच्या क्षेत्रात स्वतःच्या शहरातच नाही तर अख्ख्या देशात पहिल्या अकरामध्ये आला होता!
फक्त एक दोन वेळा नाही तर तब्बल एकशे एकवीस वेळा! सतरा टेस्ट आणि एकशे चार वनडे आंतरराष्ट्रीय सामने!!
डोमेस्टिक क्रिकेटचे सामने तर सोडूनच द्या.. इतकं जरी करिअर त्यानं केलं असेल ना तर ते तुमच्या आमच्या हजारो पिढ्यात कुणी केलेलं नाही आणि पुढेही कुणी करेल याची शाश्वती नाही इतकं जे पुंगेपांगे विनोदवर तथ्यहीन टीका करताहेत त्यांनी लक्षात ठेवावं..
मला असं नेहमी वाटतं की विनोदनं त्याचं आत्मचरित्र लिहावंच.. त्याचीही काही स्टोरी असेल.. वन साईड ऑफ द स्टोरी सगळ्यांसमोर आहे.. दुसरी बाजू पण असू शकते ना?
त्याचेही काही प्रॉब्लेम्स राहिले असतील.. बऱ्याच गोष्टी त्यानं हृदयाच्या आतल्या कप्प्यात साठवून ठेवल्या असतील.. त्यानं कमबॅकसाठी अतोनात प्रयत्न केले असतील.. खूप मेहनत घेतलीही असेल.. पण त्यावेळी त्याला योग्य मदत, मार्गदर्शन नसेलही मिळालं..
मग गेला असेल व्यसनांच्या आहारी.. इतकं सोप्पं असतं का हे सगळं पचवणं? तुम्ही नाही का कधी डिप्रेशन मध्ये गेलात? कधी घेऊन/टाकून रडला नाहीत?
जो कधीही आयुष्यात फ्रस्ट्रेट झाला नसेल त्यानंच फक्त विनोदवर टीका करावी इतरांना तो अधिकार नाही!
पण आपण अतिसामान्य,सर्वसामान्य मंडळी तयारच असतो आपापल्या दृष्टीने स्वतःचं फ्रस्ट्रेशन सोशल मीडियावर काढायला.. जे जे कुणी हा लेख वाचताय त्यांनी स्वतःला एक प्रश्न विचारून बघावा.. तुमच्या आयुष्यात प्रत्येक वेळी जेंव्हा जेंव्हा तुम्ही अडचणीत होता तेंव्हा किती लोकांनी तुम्हाला मदत केलीय? कित्येक गोष्टी गुणवत्ता असूनही तुमच्या हातून गेल्या असतील.. हो की नाही?
विनोद सोबत तसंच काही झालं असल्याची शक्यता नाकारता येत नाही..
इंजुरीतून बाहेर येऊन परत आंतरराष्ट्रीय लेव्हलला खेळणं हे ज्यांनी कधी बॅट हातात धरली नाही त्यांना कळणार पण नाही! शिवाय त्यावेळी गांगुलीला जगमोहन दालमियांचं जबरदस्त बॅकअप होतं..युवराज सिंग, राहुल द्रविड, विविएस लक्ष्मणसारखे दिग्गज खेळाडू वेटींग मध्ये होते.. विनोदचं कमबॅक व्यवस्थित का होऊ शकलं नाही ह्याचं खरं उत्तर फक्त विनोद कांबळीच देऊ शकतो.. आपण घरी बसून वाटेल ती कारणं देऊन त्या खेळाडूला बदनाम करणं आतातरी थांबवायला हवं..
महाभारतात कुंतीपुत्र कर्णाचीही काही स्टोरी होती.. जो पर्यंत आपण कर्णाची साईड एकूण घेत नाही तोपर्यंत आपल्याला अर्जुनच सर्वश्रेष्ठ योद्धा वाटत असतो, इतकं लक्ष्यात असू द्या..
यश अपयश हे जीवनाचा भाग आहे.. हे सगळेच लोकं व्यवस्थित हाताळू शकतात असं नाही पण म्हणून ज्यानं स्वतःच्या मेहनतीने, जिद्दीने, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून देशाचं, स्वतःच्या कुटुंबाचं नाव इतकं मोठ्ठं केलं त्या जिगरबाज खेळाडूला त्याच्या पडत्या वेळेला असं हीनवनं योग्य नाही..
मी विनोदसारख्या व्यक्तींच्या आयुष्याला फेल्युअर म्हणूच शकत नाही तर मी त्याला म्हणेल सक्सेसफुल फेल्युअर!

-----------------

**डॉ. संदीप दुर्गा नानाभाऊ नागरे**
**एम.डी. (कायचिकित्सा, मुंबई)**
**सिनिअर कन्सल्टंट फिजिशियन व डायबेटीस रिवर्सल एक्सपर्ट**
**देऊळगाव राजा.**
**9922282866**

■ ■ ■

# संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश व्हावा...

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिना निमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले. मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये.

वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा. दौंड मधील 'आम्ही भारताचे लोक' ही सामाजिक संघटना वर्षभर म्हणजे वर्षातील ३६५ दिवस संविधानाचा जागर करते. संविधानाच्या एका कलमा वर दररोज विस्तृत चर्चा केली जाते. संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम ही संघटना करते. आम्ही भारताचे लोक संघटनांसारख्या वर्षभर संविधानाचा जागर करणाऱ्या संघटना अतिशय कमी आहेत म्हणूनच नागरिकांमध्ये संविधानाबाबत अद्यापही म्हणावी तशी जागृती होऊ शकली नाही.

संविधान लागू होऊन आज ७५ वर्ष उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे.

नाही म्हणायला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पदवीचे शिक्षण घेणा?या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांकाचा,( क्रेडिट कोर्स) शिकवला जात आहे मात्र हा कोर्स घेणा?या विद्यार्थ्यांची संख्या त्यामानाने खूप कमी आहे म्हणूनच संविधान हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा.

आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्च शिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र हा विषय शिकवला जातो तो पण त्रोटक स्वरूपात शिकवला जातो त्यात संविधानाची माहिती नसते.

स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कार्य - अधिकार, निवडणूक, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, लोकप्रतिनिधींनिंची जबाबदारी, अधिकार अशा स्वरूपाचीच माहिती नागरिक शास्त्रात पाहायला मिळते त्यामुळे संविधानाबाबत उच्च शिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे.

भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. संविधान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील.

------------

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे. ९९२२५४६२९५**

●●●●●●

## अधिवेशन आणि वाहतुकीची कोंडी

**वाचक लिहितात**

महाराष्ट्र विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन दरवर्षी नागपूर येथे आयोजित केले जाते. या अधिवेशनात विदर्भाचे, राज्याचे प्रश्न मार्गी लागावेत, त्यांच्या त्यांच्या मतदारसंघातील समस्यांचे निराकरण व्हावे म्हणून राज्यभरातून आमदार येथे येतात.

अधिवेशनामुळे किती प्रश्न सुटतात? राज्यातील जनतेचे कसे भले होते? हा विषय वेगळा ठेवला तरी संपूर्ण अधिवेशन काळात नागपूरकरांची मात्र डोकेदुखी वाढते. प्रचंड वैताग आणणाऱ्या वाहतूक कोंडीला येथील सर्वसामान्य नागरिकांना सामोरे जावे लागते. मंत्री येणार, आमदार येणार, मोर्चे निघणार म्हणून अनेक भागातील रस्ते एकतर बंद केले जातात किंवा वाहतूक वळवली जाते. अनेक भागात तासन्तास वाहने अडकून पडतात. रूग्णालयात जाणाऱ्यांनाही या वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागतो.

■ **अनिकेत पवार, नागपूर.**



# पॅरासिटामॉल अतिवापर ठरू शकतो धोकादायक

तुम्ही छोट्या मोठ्या दुखण्यासाठी पॅरासिटामॉलचा वापर करता का? असं असेल तर हे तुमच्यासाठी घातक ठरू शकतं. पॅरासिटामॉल घेतल्याने शरीराच्या अनेक भागांवर वाईट परिणाम होऊ शकतो, असे एका अभ्यासातून समोर आले आहे.

पॅरासिटामॉलचा वापर आजकाल सर्रास झाला आहे. डोकेदुखी, ताप किंवा सौम्य वेदनांसाठी डॉक्टरांचा सल्ला न घेता पॅरासिटामॉलचा वापर केला जातो. पॅरासिटामॉलचा वृद्धांच्या मूत्रपिंड आणि हृदयावर वाईट परिणाम होऊ शकतो, असे नुकत्याच झालेल्या एका अभ्यासातून समोर आले आहे.

पॅरासिटामॉल हे अंगदुखी आणि ताप कमी करण्यासाठी औषध आहे. यामुळे मेंदूतील रसायनांचा प्रभाव कमी होतो ज्यामुळे वेदना आणि ताप येतो. हे सहसा सौम्य ते सौम्य वेदना, ताप, मायग्रेन आणि संधिवातमध्ये दिले जाते. मात्र, ते मर्यादित प्रमाणात घ्यावे. ओव्हरडोजसाठी किंवा दीर्घकाळ हे औषध घेतल्यास शरीराच्या अनेक महत्वाच्या अवयवांचे नुकसान होऊ शकते.

**पचनसंस्था, मूत्रपिंडावर परिणाम**

ब्रिटनमधील नॉटिंघम विद्यापीठातील संशोधकांनी आपल्या अभ्यासात असे सिद्ध केले आहे की, पॅरासिटामॉलच्या जास्त किंवा दीर्घकालीन वापरामुळे पचनसंस्था आणि मूत्रपिंडावर वाईट परिणाम होऊ शकतो. पॅरासिटामॉलचे सेवन विशेषतः वृद्धांसाठी धोकादायक ठरू शकते.

पॅरासिटामॉल हे जास्त काळ घेतल्याने पोटात अल्सर होण्याची शक्यता वाढते. हे पोटाच्या पडद्याचे नुकसान करू शकते, ज्यामुळे पाचन समस्या उद्भवू शकतात. याशिवाय हे औषध मूत्रपिंडावरही परिणाम करते. मूत्रपिंड शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते, परंतु पॅरासिटामॉलच्या सतत वापरामुळे मूत्रपिंडावरील दबाव वाढू शकतो. पॅरासिटामॉलचा परिणाम हृदयावरही होतो, असेही अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.

■ ■ ■

# फळे, भाज्यांचे सलाद एकत्र खाणे आरोग्यासाठी फायदेशीर

रोजच्या जेवणामध्ये भाज्या आणि फळांचा समावेश करण्याचा सल्ला अनेकदा आहार तज्ञ देतात. फळे आणि भाज्या योग्य प्रमाणात खाल्ल्याने त्याचे शरीराला अनेक फायदे होतात.

ज्यांना भाज्या आवडत नाही त्यांच्यासाठी सलाद हा एक उत्तम पर्याय आहे. सलाद खाणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. काहींना फ्रुट सलाद आवडते तर अनेकांना भाज्यांचे सलाद आवडते. पण काहीजण फळ आणि भाज्यांचे सलाद एकत्र खातात.



या दोन्ही गोष्टींमध्ये मोठ्याप्रमाणात जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर, पोटॅशियम, जस्त आणि लोहा सह अनेक पोषक घटक आढळतात. फळे आणि भाज्यांचे सलाद एकत्र खाने हा एक आरोग्यदायी पर्याय आहे. फळे आणि भाज्यांचे सलाद एकत्र खाल्ले तर यामुळे जास्त जीवनसत्वे, खनिजे आणि फायबर मिळतातच पण त्यासोबतच त्यामध्ये कॅलरीजही कमी असतात.

फळे आणि भाज्या दोन्ही आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे पण त्या खाण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. भाज्या आणि फळांचे सलाद एकत्र खाल्याने आरोग्यावर चांगले परिणाम होतात.

**योग्य संयोजन**

डॉक्टर पालीवाल सांगतात की जर तुम्ही भाज्या आणि फळांचा एकत्रित सलाद खात असाल तर तुम्ही सफरचंद, गाजर आणि शलगम एकत्रित खाऊ शकतात.

यामध्ये तुम्हाला भरपूर फायबर आणि व्हिटॅमिन ए मिळेल.

ज्यांना मधुमेह आणि किडनीचा आजार आहे त्या रुग्णांसाठी हे अतिशय फायदेशीर ठरेल. फळे आणि भाज्यांचे सलाद बनवण्यापूर्वी ते एकदा स्वच्छ धुऊन घ्या.

तज्ञांच्या म्हणण्यानुसार भाज्या आणि फळे एकत्रित खाण्यापूर्वी काळजी घेणे आवश्यक आहे. काही वेळा त्या आरोग्यास हानी पोहोचू शकतात. काही भाज्या आणि फळांमध्ये असे घटक असतात जे पचनाशी संबंधित समस्या निर्माण करू शकतात. एवढेच नाही तर काही फळे आणि भाज्या एकत्रित सलादच्या रूपात खाल्ल्याने ॲलर्जी होऊ शकते. त्यामुळे ते योग्य प्रमाणातच खाण्याचा सल्ला तज्ञांनी दिला आहे.

## अशोकायन

### कॅन्सरला आवतन

**आरोग्यासाठी**
**रहावे सतर्क**
**कागदी कपातील**
**चहाने होईल अनर्थ .. !**

**कागदी कपात**
**चहा घेणं**
**म्हंजी कॅन्सरला**
**आवतन देणं . . !**

**काचेच्या पेल्यात**
**जो देईल चहा**
**त्याच हॉटेलचं**
**तोंड तुम्ही पहा ..!!**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# प्रधानमंत्री आवास:घरकुलाकरिता ४५ हजार लाभार्थ्यांची नोंदणी

## केवळ ७३ कुटुंबांचे स्वप्न पूर्ण



■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. १७ : केंद्राची महत्वाकांशी योजना असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेत जिल्ह्यात तब्बल ५० हजार घरे बांधण्याचे उद्दीष्ट आहे. असे असताना गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या निवडणुका, त्याची आचार संहिता यामध्ये घरकुलाच्या लाभार्थ्यांना निधीच मिळाला नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे गेल्या वर्षभरात केवळ ७३ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरीत लाभार्थी मात्र घरकुलाच्या पुढील हप्त्याची वाट पाहताना दिसत आहेत.

देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकांच्या डोक्यावर त्यांच्या हक्काचे छप्पर असावे, प्रत्येकाला त्याच्या स्वत:च्या घरामध्ये राहता यावे या उद्देशातून केंद्र शासनाच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली होती. या योजनेच्या माध्यमातून जिल्ह्याला ५० हजार ९८५ घरे बांधण्याचे उद्दीष्ट देण्यात आले होते. त्यानुसार या योजनेतून हक्काचे घर नसलेल्या जिल्ह्याभरातील तब्बल ५५ हजार ८७० लाभार्थ्यांची नोंदणी आतापर्यंत करण्यात आली आहे. त्यानंतर शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या उदिष्ठ नुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने एकुण ४५ हजार ५४९ लाभार्थ्यांची घरकुलाकरिता नोंदणी केली. त्यानंतर शासनाच्या वतीने प्रथम ३१ हजार ४०६ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पहिला हप्या थेट टाकण्यात आला होता. पहिला हप्ता मिळाल्यानंतर या घरकुल लाभार्थ्यांनी त्यांच्या घरकुलाचे प्रत्यक्षात बांधकाम सुरु केले. त्यासाठी कित्येक लाभार्थ्यांनी त्यांचे राहते घर पाडले. त्यानंतर काम सुरू करुन जो त्यापर्यंतचे बांधकाम झाल्यानंतर शासनाकडून मिळणाऱ्या दुसऱ्या ह त्याची प्रतिक्षा लाभार्थ्यांना होती. मात्र शासनाच्या वतीने केवळ ७४९ लाभार्थ्यांच्या खात्यातच दुसरा हप्ता जमा झाला. त्यामुळे अनेकांचा हिरमोड झाला.

तालुकानिहाय पहिला हप्ता मिळालेले लाभार्थी आर्णी १८६६, बाभूळगाव १२९३, दारव्हा २००३, दिग्रस १८६३, घाटंजी २१०२, कळंब १३९६, केळापूर १८२९, महागाव २७१७, मारेगाव ९५०, नेर ११८२, पुसद ४३१९, राळेगाव १७६३, उमरखेड ३४५६, वणी १४२९, यवतमाळ २१०३, झरीजामणी ११३५, एकूण ३१४०६

ऐन थंडीत लाभार्थ्यांची होतेय गैरसोय; बांधकामे अर्धवट प्रधानमंत्री आवास योजनेतून ४५ हजार ५४९ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आले आहे. यातून ३१ हजार ४०६ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत झाला आहे.

मात्र, गेल्या दोन महिन्यापासून शासनाने दमडीही उपलब्ध करून दिली नाही. परिणामी, हजारो लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम पूर्णत: ठप्प पडले आहे. राहते घर पाडून अर्धवट बांधकाम केल्याने या नागिकांवर आता ऐन हिवाळ्याच्या दिवसात उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे.

तातडीने निधी उपलब्ध करून दिलासा द्यावा बांधकामाची गती वाढवण्याचा प्रयत्न लाभार्थ्यांकडून झाला. परंतु पैसा नसल्यामुळे अनेक लाभार्थ्यांना जैसे थे याच परिस्थितीत राहण्याची वेळ आली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे चौथा हप्ता केवळ ५ लाभार्थ्यांना मिळाला असून, पाचवा हप्ता एकाही लाभार्थ्यांना देण्यात आलेला नाही. या प्रकारामुळे वर्षभरात केवळ ७३ लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे. सध्याच्या स्थितीत ५० हजार ९१२ लाभार्थ्यांचे घर अपूर्ण आहे.

# ट्रकच्या धडकेत मजुराचा मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी,
मारेगाव, दि. १७ : दत्त जयंतीनिमीत्त मंदीरासमोर भरलेल्या यात्रेत रिवर्स येणाऱ्या भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेत एका मजुराचा मृत्यू झाला, तर एक मजूर जखमी झाला. ही घटना पांढरकवडा तालुक्यातील किन्ही केळापूर येथे रविवारी दि. १५ डिसेंबरला दुपारच्या सुमारास घडली. जुगल पुंडलीक राठोड (वय २७) वर्ष असे मृतकाचे तर गेमसींग हरिदास राठोड (वय ४५) वर्ष दोघेही रा. नाईक नगर हेटी, आर्णी असे जखमीचे नाव आहे. या प्रकरणी पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, आर्णी तालुक्यातील नाईक नगर हेटी येथील गेमसींग राठोड, जुगल राठोड यांच्यासह तीन ते चार मजूर किन्ही केळापूर येथे दत्त जयंती निमीत्त मंदीरासमोर भरलेल्या यात्रेत गेले होते. यावेळी अचानक ट्रक क्रमांक (एमएच-२६-१४८७) हा रिवर्समध्ये भरधाव वेगाने येत गेमसींग राठोड आणि जुगल राठोड या दोघांना धडक दिली.

# माळी समाजाचा बहुराज्यस्तरीय मेळावा




■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १७ : महात्मा फ़ुले बहुउद्देशीय संस्थेद्वारा आयोजित ९ वा बहुराज्यस्तरीय माळी समाज उपवर युवक युवती परिचय महामेळावा तथा विवाह बंधन पुस्तिका, दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा गजानन नगरी, रहाटगाव रिंग रोड येथे उत्साहात पार पडला. महात्मा जोतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचाराने प्रेरित होऊन महात्मा फुले बहुउद्देशीय संस्था गत ८ वर्षांपासून वाटचाल करत आहे. संस्थेच्या संचालक मंडळाच्या सहकार्याने प्रगतीचा आलेख उंचावला गेला आहे. यापुढेही समाजाने सहकार्य करण्याचे आवाहन महात्मा फुले संस्थेचे संस्थापक प्रभाकर घाटोळ यांनी केले. सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर घाटोळ होते.

स्वागताध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रवीण ढवळे तर सोहळ्याचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते कृष्णराव गोरडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी खासदार नवनीत राणा, महात्मा फ़ुले अर्बन बँकेचे अध्यक्ष दिलीप लोखंडे, उपाध्यक्ष प्रमोद कोरडे, माजी अध्यक्ष राजेंद्र आंडे, डॉ. नीलकंठ यावलकर, पुरुषोत्तम कळमकर, आश्रयदाते दीपक लोखंडे, नीलिमा लोखंडे, विजयश्री गणोरकर, कार्याध्यक्ष प्रकाश लोखंडे, संजय गणोरकर, सुदेश भेले, नंदू लेकुरवाळे, गणेश मानकर, नीलेश श्रीखंडे, मोहन लोखंडे, वीरेंद्र लंगडे, रामदास राऊत, सामाजिक नेते वासुदेव चौधरी आदी उपस्थित होते.

**संस्थेच्या संचालक**

**मंडळाच्या सहकार्याने प्रगतीचा आलेख उंचावला गेला आहे.**

संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. रूपेश फ़ऱसाटे यांनी संस्थेचा अहवाल सादर करत या सामाजिक कार्यात समाजाचा सहभाग महत्वाचा घटक असून पारदर्शकता हा संस्थेचा मुख्य उद्देश असल्याचे मत व्यक्त केले.

डॉ. राधेश्याम बहादुरे, रमेश बहादुरे व नंदकिशोर बहादुरे यांच्यासह समाजबांधवांनी वसतीगृहाच्या बांधकामाला आर्थिक मदत केली. सोहळ्याचे प्रास्ताविक संजय गणोरकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण पेटकर यांनी केले, तर आभार देविदास उमप यांनी मानले. मेळाव्याला दिवाकर फ़ऱकाडे, केशव झाडे, डॉ.अनिल कळमकर, अनिल वर्हेकर, प्रा. बाबाराव ठाकरे, संतोष मालधुरे, पंजाब फ़ऱकाडे, विनोद बकाले, संजय वाघूळे, प्रा. जयकुमार सोनटक्के, केशव फसाटे, अशोक पाचघरे, प्रकाश कुरळकर, अशोक पवार आदी उपस्थित होते.

शेकडो युवक-युवतींनीदिला मेळाव्यात परिचय विवाह-बंध पुस्तकात मोठ्या प्रमाणात युवक-युवतींचा समावेश असून, शेकडोच्या संख्येने उपवर युवक-युवतींनी आपली उपस्थित राहून परिचय दिला.

# जनसंघर्ष अर्बन निधी लिमिटेड बँक


## तब्बल १९० ठेविदारांनी नोंदवल्या तक्रारी अपहाराची रक्कम पोहोचली ४५ कोटींवर



■ महासागर प्रतिनिधी,
दिग्रस, दि. १७ : जनसंघर्ष अर्बन निधी लिमिटेड बँकेच्या विरुद्ध आतापर्यंत तब्बल १९० ठेविदारांनी दिग्रस पोलिसात तक्रारी नोंदवल्या आहेत. त्यामुळे या बँकेने नागरिकांना गंडवलेली रक्कत आतापर्यंत ४५ कोटी रुपयांवर गेली आहे. जनसंघर्ष अर्बन बँक लिमिटेडच्या संचालकांनी गंडविल्याचे समोर आले असतानाच आता बँकेच्या एका संचालकाने नवीन शक्कल लढवीत आपल्या नावाची जमीन बक्षीस पत्राद्वारे मुलीच्या नावाने केल्याची बाब उघडकीस आली आहे. जनसंघर्ष अर्बन निधी बँक दिग्रस, दारव्हा, नेर, आर्णी व पुसद या पाच शाखेच्या ठेवीदार व कर्मचाऱ्यांनी दिग्रस पोलिसात जनसंघर्ष म्युच्युअल बेनिफिक्रट निधी अर्बन, शाखा दिग्रसचे संचालक प्रणित मोरे, संचालक देवानंद मोरे, सभासद प्रीतम मोरे, सभासद जयश्री मोरे चारही रा. संभाजीनगर दिग्रस यासह संचालक साहिल जयस्वाल, सभासद अनिल जयस्वाल, सभासद पुष्पा जयस्वाल हे तिघे रा. राधाकृष्ण नगरी दिग्रस यांच्या विरुद्ध पोलिसात तक्रार दिली आहे.

# पारा ८.१ अंश सेल्सिअसवर ३ वर्षातील सर्वात कमी तापमान

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १७ : अमरावती शहरातील समर्थ हायस्कूल ते रवीनगरातील चौकाकडे जाणारा निर्मनुष्य रस्ता. एरव्ही या रस्त्यावर रात्री १२ वाजेपर्यंत मोठी वर्दळ असते. ठेवणीतले कोटही निघाले अलमारी बाहेर-अमरावती शहरात दिवसेंदिवस पारा खाली घसरत असून, सोमवारी सकाळी ७ वाजता जल विज्ञान प्रकल्प विभागाने घेतलेल्या नोंदीनुसार तापमान ८.१ अंश सेल्सियस मोजण्यात आले. हे तीन वर्षात यंदाच्या हिवाळ्यातील सर्वात कमी तापमान आहे. थंड व बोचरे वारे तसेच हिमालयात सुरू असलेल्या बफ़र्फ वृष्टीमुळे सध्या शहरासह जिल्ह्यात थंडी कडाडली असून, पुढील तीन ते चार दिवस थंडीचा जोर कायम राहील. त्याचप्रमाणे वातावरणही कोरडे राहणार आहे. याआधी २० डिसेंबर २०२१ रोजी ७.६ अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली होती. यंदाही तापमान आणखी कमी होण्याची शक्यता नाकारता येणार



नाही, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. तापमान घटल्यामुळे दुप्पट गरम कपडे घालण्याची वेळ शहरवासीयांवर आली आहे. डोके, हात, पाय असे संपूर्ण शरीर झाकल्यानंतर केवळ चेहराच तेवढा उघडा ठेवावा लागत आहे. काही तर चेहराही दुप्पटा, मफ़्लरने झाकून घेत आहेत. दुपारी घरात थंडी जाणवत असल्यामुळे उन्हात उभे राहून ऊब मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. गेले काही दिवस सर्वत्र असाच प्रकार दृष्टीस पडत असून, रात्रीच्या समारंभातही लवकर हजेरी लावून घरी परतण्यावर नागरिकांचा जोर आहे.

# मनपाच्या अभ्यासिकेतील ६ विद्यार्थी शासकीय नोकरीत

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १७: अमरावती महापालिकेद्वारे संचालित स्पर्धा परीक्षा ग्रंथालय अभ्यासिका केंद्र, संत गाडगे बाबा कॅम्प परिसर, गोपाल नगर, साईनगर शहरातील विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ ठरत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. मनपाच्या या नाविण्यपूर्ण अभ्यासिकामुळे अंकुश कंटाळे, मयुरी गादरे, मयुरी गणवीर, प्रफ़ुल्ल रंगारी यांची कनिष्ठ लिपिक, जिल्हा न्यायालय अमरावती, रेणुका भोजने यांची कनिष्ठ लिपिक जिल्हा न्यायालय ठाणे, राजपाल लोखंडे यांची नागपूर कारागृह पोलिस या पदावर नियुक्ती झाली आहे. या विद्यार्थ्यांनी सरळ-सेवा भरती अंतर्गत घेण्यात आलेल्या पद भरतीत यश प्राप्त केले आहे. मनपा उपायुक्त (सा.) नरेंद्र वानखडे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू केला आहे. महिला व बाल विकास अधिकारी तथा शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांच्या पुढाकारात



काही वर्षांपूर्वी स्पर्धा परीक्षा क्षेत्रात कारकीर्द घडवण्यास इच्छुक शहरातील गरीब, होतकरू विद्यार्थ्यांसाठी मनपाने स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेची निर्मिती केली. हा राज्यातील नाविण्यपूर्ण उपक्रम ठरला आहे. तेव्हापासून एकूण २०० वर विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेऊन शासकीय सेवेत विविध पदावर रुजू झाले आहेत. अभ्यासाकरिता सर्व सोयी सुविधा उपलब्ध केल्या भमनपाच्या अभ्यासिकेत अभ्यासाकरिता सर्व सोयी उपलब्ध आहेत. त्यामुळे येथे कोणत्याही अडचणीशिवाय अभ्यास करता येतो. पिण्याचे पाणी, डक्टिंग, पुस्तके, शांत वातावरणामुळे मला अभ्यास करून यश मिळवता आले. ही माझी अंतिम संधी होती.

# परभणी घटनेच्या निषेधार्थ पुसद बंद



■ महासागर प्रतिनिधी,
पुसद , दि. १७ : परभणी घटनेच्या निषेधार्थ दि.१६ डिसेंबरला सकाळपासूनच पुसद शंभर टक्के बंद ठेवून घटनेतील पीडितांना न्याय मिळवून द्यावा व दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. संविधानाची विटंबना करणाऱ्या संविधानद्रोही आरोपीसह याचा मास्टरमाइंड असलेल्यांवर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करण्यासाठी सर्व संविधान प्रेमींनी महाराष्ट्र बंदमध्ये पुसद कडकडीत बंद ठेवून जाहीर निषेध नोंदवला. शासकीय सेवा, बँका पतसंस्था व अत्यावश्यक सेवा वगळता पुसद बंदला शंभर टक्के प्रतिसाद मिळाला होता.

संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधानाबद्दल आदर वाटावा, आदर्श घ्यावा यासाठी परभणी येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर संविधानाची प्रत ठेवण्यात आली होती. ठेवण्यात आलेल्या संविधानाच्या प्रतीची विटंबना करण्याची घटना परभणी येथे घडवण्यात आली. या घटनेचा निषेध म्हणून संविधान प्रेमींनी एक आंदोलन उभारले होते. त्या आंदोलनाच्या घटनेनंतर पोलिसांनी संविधान प्रेमींवर केलेल्या अमानुष मारहाणीने शहीद सोमनाथ सूर्यवंशी हा आंबेडकरी तरुण संविधानाच्या रक्षणार्थ पोलिस कोठडीत शहीद झाला.

या घटनेच्या निषेधार्थ सर्व आंबेडकरी व संविधानप्रेमी जनतेच्यावतीने महाराष्ट्र बंद पुकारला होता. त्यामध्ये पुसद बंद ठेवून निषेध मोर्चा काढून पुसद कडकडीत बंद ठेवण्यात आले होते. या निवेदनावर भिम टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष किशोर कांबळे, बुद्धरत्न भालेराव, भारत कांबळे, अर्जुन भगत, आदिवासी समाज भूषण मारोती भस्मे, संजय वाढवे, रिपाई आठवले गटाचे लक्ष्मण कांबळे, राहुल पाईकराव, प्रमोद धुळे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष आशिष काळबांडे, विशाल डाके यांच्यासह अनेक संविधान प्रेमींच्या महिला पुरुष युवक युवतींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# चौदा वर्षात दहा लाख तपासण्या; आढळले २६३ रुग्ण

बुलडाणा : जिल्ह्यात गेल्या चौदा वर्षात एकूण दहा लाख ४० हजार ४१३ सिकलसेल तपासण्या झाल्या असून त्यामध्ये १,६९७ वाहक व २६३ सिकलसेलग्रस्त रुग्ण आढळून आले आहेत. सर्व रुग्णांना मोफ़त औषधोपचार व रक्तपुरवठा, समुपदेशन करण्यात येते. या आजाराबाबत जिल्ह्यातील अनेक आरोग्य संस्थामध्ये आजार जनजागृती सप्ताहाला सुरुवात करण्यात आली आहे. सिकलसेल आजार हा आनुवंशिक असून आई-वडिलांपासून अपत्यांना होतो. सिकलसेल हा रक्तपेशी संबंधित आजार आहे. सामान्य रक्तपेशी या वर्तुळाकार व लवचिक असतात तर सिकलसेल रक्तपेशी या विळ्याच्या आकाराच्या व ताठर असतात. सशक्त आरबीसी रक्त वाहिन्यातून सरळ निघून जातात. परंतु, सिकल रक्तपेशी रक्तवाहिन्याला चिकटून राहतात व लवकरच अडथळा निर्माण होऊन त्या भागातील रक्तपुरवठा खंडित होतो, त्याला सिकलसेल आजार म्हटले जाते. यामुळे असह्य वेदना होतात. अशी इजा वारंवार झाल्यामुळे अवयवाला जबरदस्त इजा होऊन तो अवयव निकामी होतो. प्लीहामध्ये नष्ट झालेल्या रक्तपेशी जमा होतात, सिकल रक्तपेशी अडकवून प्लीहेवर जबरदस्त सूज येते व त्याची कार्यक्षमता कमी होते. आजाराविरुध्दची रोग प्रतिकारक क्षमता कमी होते. सिकलसेल रुग्णांना हाडे, फ़ुफ़ुस्स, यकृत, प्लीहा, मेंदू प्रामुख्याने बळी पडून आजारांची गंभीरता वाढून मृत्यू होऊ शकतो. वाहक व रुग्ण हे सिकलसेल आजाराचे दोन प्रकार असून या आजाराला प्रतिबंध करायचा असेल तर वाहक-रुग्ण, वाहक-वाहक, रुग्ण-रुग्णांनी आपापसात विवाह करुन नये. कारण, अपत्य हे सिकलसेल आजाराचे वाहक किंवा रुग्ण होण्याची शक्यता असते. सिकलसेल हा आनुवंशिक आजार आहे. सिकलसेल आजाराचा संपूर्ण उपचार नाही. परंतु नियंत्रण शक्य आहे. सिकलसेल रुग्णास नियमित आणि समतोल आहार आवश्यक आहे.

योग्य औषधोपचाराने सिकलसेल रुग्णांचे आयुष्य वाढण्यास मदत होते. सिकलसेल रुग्णांना मिळते बस सवलत सिकलसेल रुग्णांना संजय गांधी निराधार योजनेंतर्गत आर्थिक लाभ मिळतो.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SHAURYA VIJAYKUMAR SHARMA.** NOW MY NEW NAME IS **SHOURYA VIJAY SHARMA.**
ADD : PLOT NO 53, YOGENDRA NIWAS MANISH NAGAR NAGPUR- 440015

MY OLD NAME WAS **SHIWAM SHARMA.** NOW MY NEW NAME IS **SHIVAM VIJAY SHARMA.**
ADD : PLOT NO 53, YOGENDRA NIWAS MANISH NAGAR NAGPUR- 440015

MY OLD NAME WAS **ROSHANA BHIMRAO MOON.** NOW MY NEW NAME IS **ROSHANI ATISH UMARE.**
ADD : D-41, WARD NO.3, BUTIBORI ROAD, SECTOR D, CIDCO COLONY, NAGPUR - 441122

MY OLD NAME WAS **DIPANSHU BHATIA.** NOW MY NEW NAME IS **DIPANSHU GOPAL BHATIA.**
ADD : PLOT NO.40,NEAR CONTAINER DEPOT SUNDARVAN LAYOUT,NARENDRA NAGAR, NAGPUR - 440015

MY OLD NAME WAS **SHAHEEN BANO.** NOW MY NEW NAME IS **SHAHEEN MATEEN.**
ADD : BUNGLOW NO C6 NANIK ASTA VINAYAK PARADIES KORADI ROAD, BOKHARA NAGPUR 441111

MY OLD NAME WAS **SANTOSH SINGH SAINI.** NOW MY NEW NAME IS **SANTOKH SINGH.**
ADD : S/O PRITAM SINGH, TEHSIL, GARHSHANKAR, DENOWAL KALAN, HOSHIARPUR, PUNJAB 144527

MY OLD NAME WAS **BALBIR KAUR SAINI.** NOW MY NEW NAME IS **BALVIR KAUR.**
ADD : S/O PRITAM SINGH, TEHSIL, GARHSHANKAR, DENOWAL KALAN, HOSHIARPUR, PUNJAB 144527

MY OLD NAME WAS **RAMPRAKASH CHOWDHRY.** NOW MY NEW NAME IS **RAMPRAKASH CHOUDHARY.**
ADD : PLOT NO. 210, NARI ROAD, KARWADE KIRANA STORE, BHAKTISAGAR NAGAR NAGPUR 440026

MY OLD NAME WAS **GURMEET KAUR CHOWDHRY.** NOW MY NEW NAME IS **GURMEET KAUR CHOUDHARY.**
ADD : PLOT NO. 210, NARI ROAD, KARWADE KIRANA STORE, BHAKTISAGAR NAGAR NAGPUR 440026


# तुरीच्या शेंगांचे भाव पोहोचले शंभरावर

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १७ : तुरीच्या शेंगा निघाल्या की, जिल्ह्यात सोले-वांग्याची भाजी हा बेत ठरलेलाच आहे. सर्वप्रथम सोले वांगे केल्यानंतरच मग इतर पदार्थ तुरीच्या ओल्या दाण्यांपासून तयार केले जातात. परंतु, डिसेंबर महिन्याचा दुसरा आठवडा सुरू असला तरी चिल्लर बाजारात तुरीच्या शेंगा ९० ते १०० रु. किलो दराने मिळत असल्याने गृहिणींनी तुरीच्या शेंगा खरेदी करण्याचा मोह आवरला आहे. अजूनही बाजारात हव्या त्या प्रमाणात उत्तम दर्जाच्या तुरीच्या शेंगांची आवक होत नसल्याने सध्या तुरीचे भाव तेजीत असल्याची माहिती विक्रेत्यांद्वारे देण्यात आली. ग्रामीण भागात तसेच ज्यांच्या घरी शेतात तुरीची लागवड केली आहे, त्यांच्याकडे दररोज तुरीच्या दाण्यापासून विविध पदार्थ तयार केले जात आहेत. परंतु, शहरात तसेच ज्यांच्याकडे तुरीच्या शेंगा सहज उपलब्ध नाहीत, अशांना मात्र, १०० रु. किलो हा भाव बघून त्या खरेदी करायच्या की नाही, असा विचार करावा लागत आहे. कोणताही खाद्य पदार्थ बनवण्यासाठी किमान १ किलो तुरीच्या शेंगा हव्यात. कारण, त्यात काही किड लागलेले दाणे असतात.शेंगांची आवक कमी भसध्या तुरीच्या शेंगांची आवक बाजारात कमी आहे. त्यामुळे भाव उतरले नाहीत. अनेक ठिकाणी तुरीची तोड व्हायची असल्याने भाव ८० ते १०० रु. किलो आहेत. डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत भाव कमी होऊ शकतात.


**नगर परिषद, वाडी जिल्हा नागपूर**
**जाहीर ई-निविदा सूचना**
**(तिसरी वेळ)**

न.प.वा./अग्नि.विभाग/जा. क्र./१५०३/२०२४ दि.१७/१२/२०२४

**जाहीर ई-निविदा सूचना सन २०२४-२५**

नगर परिषद मार्फत पंजीकृत कंत्राटदार/अभिकर्ता कडून अग्निशमन कामाकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना, निविदा नोटीस, प्रसिद्धी सूचना शुद्धीपत्रे इत्यादी आपणास दि. १७/१२/२०२४, वेळ संध्याकाळी ०५.३० वाजता पासून महाराष्ट्र शासनाचे http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास व भरण्यास मिळेल. सदर निविदा प्रक्रिया ई-निविदा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत.

(संदीप बोरकर)
मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी



**कार्यालय**
**नगर पंचायत कांद्री (कन्हान)**
तहसील-पारशिवनी,जिल्हा-नागपूर ४४१४०१
Email:nagrpanchayatkandri@gmail.com

क्रमांक/कलि-न.पं./कांद्री(कन्हान)/कावि-३६७१/२०२४ दिनांक : १७/१२/२०२४

**निविदा सूचना – २०२४-२५**

मुख्याधिकारी नगरपंचायत कांद्री (कन्हान) मार्फत खालील क्र. १ कामाचे दोन लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक निविदाधारक यांना कोरे निविदा फॉर्म दि. १७/१२/२०२४ स. १०.०० वाजे पासून नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येईल. तरी इच्छुकांनी आपले कोटेशन / निविदा नगरपंचायत कार्यालयात दि. २३/१२/२०२४ सा. ०५.०० वाजे पर्यंत सिलबंद लिफाफे सादर करावे.

| अ.क्र. | कामाचे विवरण | कोरे निविदा पत्राची किंमत | अनामत रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमाचे अनुषंगाने नगर पंचायत कांद्री( कन्हान) येथे साहित्य खरेदी करणे. | रु. २००/- | रु. ५००/- | कार्यादेश पासून १ महिने |

प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. २३/१२/२०२४ रोजी सा. ०५.३० वाजता उघडण्यात येईल.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगरपंचायत कांद्री(कन्हान)


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# महायुती सुसाट, आरोपी मोकाट

## सभागृहाच्या पायऱ्यांवर मविआची घोषणाबाजी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा व परभणी येथील संविधानाच्या प्रतीच्या विटंबनेच्या घटनेचा महाविकास आघाडीच्या वतीने निषेध करण्यात आला. विधिमंडळ अधिवेशनेच्या दुसऱ्या दिवशी विधिमंडळ सभागृहाच्या पायऱ्यांवर महाविकास आघाडीच्या आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी ॲड. अभिषेक वंजारी, भाष्कर जाधव, भाई जगताप, नितीन राऊत यांच्यासह आघाडीचे आमदार उपस्थित होते. महायुती सुसाट, आरोपी मोकाट व अटक करा, अटक करा बीडच्या गुन्हेगारांना अटक करा अशा जोरदार घोषणा यावेळी देण्यात आल्या. राज्य सरकारच्या दडपशाहीमुळे संविधानाच्या विटंबनाविरोधात लढाई लढत असलेल्या दलित समाजातील सोमनाथ सूर्यवंशी या तरुणांचा मृत्यू झाला असून शासनाने केलेली ही हत्या असल्याची, गंभीर टीका अंबादास दानवे यांनी केली.




## नाराजांचे बार मंत्रिपदापेक्षा जोरात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
राज्यात ईव्हीएमच्या जोरावर बहुमताने सत्तेत आलेल्या महायुतीत मंत्रिमंडळाच्या विस्तारापेक्षा वजाबाकीची चर्चा अधिक आहे. मंत्रिमंडळातून वगळले त्या नाराजांचे बार जोरात वाजत आहेत, असा खोचक टोला शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी लगावला.

माजी मंत्री छगन भुजबळ यांच्या नाराजीवर ठाकरेंनी सरकारची दैना झाल्याचे टीकास्त्र सोडले. नागपूरमध्ये सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाला ठाकरे यांनी हजेरी लावली. पक्ष कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन सरकारवर हल्लाबोल केला.

मागील अडीच वर्षे घटनाबाह्य सरकार पाहिले. आता ईव्हीएममुळे ते सत्तेत आले आहेत. लोकांना हा निकाल मान्य नाही. ठिकठिकाणी त्यामुळे आवाज उठवला जातो आहे. सत्ताधाऱ्यांमध्ये ही विजयाचा आनंद दिसत नाही. नवीन सरकारमधील काही नवीन मंत्र्यांच्या विरोधात केंद्रीय तपास यंत्रणांच्या धाडी पडल्या, भष्ट्राचाराच्या विविध गुन्ह्यांचे ढीगभर पुरावे सादर केले, अशांचा परिचय मुख्यमंत्र्यांना करून द्यावा लागत आहे, असा टोला लगावला.

## भुजबळ राष्ट्रवादी सोडणार?

### प्रश्न मंत्रिपदाचा नव्हे तर अवहेलनेचा...

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :



राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री छगन भुजबळ राज्य मंत्रिमंडळात संधी न मिळाल्यामुळे चांगलेच नाराज झालेत.

त्यांनी यासंबंधी आपल्याला मंत्रिपद नाकारणाऱ्याचा शोध घ्यावा लागेल असे नमूद करत हा मंत्रिपदाचा नव्हे तर माझ्या अवहेलनेचा प्रश्न असल्याचे ठणकावून सांगितले. त्यामुळे ते अजित पवारांची साथ सोडण्याचा निर्णय घेणार का? असा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चिला जात आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारात छगन भुजबळ यांना संधी मिळाली नाही. त्यामुळे ते चांगलेच नाराज झालेत. त्यांनी पत्रकारांशी बोलताना 'जहाँ नहीं चैना, वहाँ नही रहना' असे विधान करत राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देण्याचे संकेत दिले होते. त्यानंतर मंगळवारी त्यांनी समता परिषदेच्या कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर पुन्हा एकदा तसे विचार व्यक्त केले.

ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले, माझी माझ्या सहकाऱ्यांसोबत बैठक झाली. त्यात त्यांनी आपले दुःख व उद्विग्नता व्यक्त केली. मी सुद्धा त्यांना मागील ५-६ महिन्यांपासून म्हणजे लोकसभा निवडणुकीपासून जे काही घडले त्याची माहिती दिली. आता आम्ही मतदारसंघात जाऊन तेथील जनतेशी संवाद साधू. त्यानंतर कार्यकर्ते, ओबीसी व समता परिषदेच्या लोकांचा विचार जाणून घेऊ. पण सर्वांच्या मनात राग आहे, निराशा आहे. मी सर्वांना असंस्कृतपणे काही बोलू नये अशी विनंती केली आहे.

पत्रकारांनी यावेळी भुजबळांना तुम्हाला मंत्रिपद नेमके कुणी नाकारले? असा थेट प्रश्न केला. त्यावर भुजबळांनी चटकन 'शोधावे लागेल ना?' असे प्रत्युत्तर दिले. मंत्रिपद कुणी नाकारले हे शोधण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे आणि कुणीही नाकारले तरी शेवटी पक्ष प्रमुखाचा निर्णय महत्त्वाचा असतो.

भाजपचा निर्णय देवेंद्र फडणवीस घेतात. शिवसेनेचा निर्णय एकनाथ शिंदे घेतात. आणि बाकीचे काही असले तरी आमच्या पक्षाचे प्रमुख अजित पवार आहेत. ते त्यांचा निर्णय घेत असतात. प्रत्येकालाच मंत्रिपद हवे असते. पण यासंबंधी प्रश्न मंत्रिपदाचा नाही तर ज्या प्रकारे अवहेलना करण्यात आली त्याचा आहे. यासंबंधी मी उद्या तुम्हाला आणखी काही सांगेन, असे भुजबळ म्हणाले.

### भुजबळ आमच्यासोबत आले तर स्वागतच

छगन भुजबळ सारख्या व्यक्ती आमच्या सोबत काम करायला तयार असेल तर आम्ही त्याचा स्वागत करू. आता भुजबळांनी विचार करायला हवा की त्यांना कोणासोबत आणि कसे राहायचे आहे, असे म्हणत काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी त्यांना काँग्रेस प्रवेशाची ऑफर दिली आहे.

राऊत पुढे बोलताना म्हणाले की, परभणीची घटना सुनियोजित कट होती आणि पोलिस कस्टडीमध्ये ज्या सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू झाला ती हत्याच होती. पोलिस त्यास जबाबदार आहेत, असा आरोप राऊतांनी केला आहे.

## भाजप युती सरकारला जनतेच्या भावनांशी काही देणेघेणे नाही..

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
ईव्हीएम मधून निवडून आलेले भाजपा युती सरकार लोकशाही व्यवस्थेचा खून करण्याचे काम करत आहे. परभणीत पोलिसांनी कोंबिंग ऑपिरशन करुन दलित बांधवांवर अत्याचार केले.तरं बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांची अमानुष पद्धतीने हत्या करण्यात आली. या दोन्ही प्रकरणी सरकारच्या भूमिकेवर तोफ डागत भाजपा युती सरकारला लोकांच्या भावनांशी काही देणेघेणे नाही, असा थेट आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मंगळवारी येथे पत्रकारांशी बोलताना केला.

### पटोलेंचा आरोप



### अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची तयारी

निवडणुकीतील अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारत आपल्या पदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली आहे. रमेश चेन्निथला लवकरच बैठक बोलावून पराभवाचे विश्लेषण करतील, असे पटोले म्हणाले.

पटोले म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत वापरलेल्या ईव्हीएम विधानसभेला वापरल्या नाहीत,त्यासाठी गुजरातमधून ईव्हीएम मागवण्यात आल्या. त्याच ईव्हीएमचा दुरुपयोग केला गेला. ईव्हीएम मशीन बनवण्याच्या कंपनीत भाजपाचे लोक संचालक मंडळावर आहेत. तर दुसरीकडे निवडणूक आयोगाला असलेले संवैधानिक अधिकाराचा वापरही ते करू शकत नाहीत. कारण सर्व कारभार भाजपाच्या इशाऱ्यावर सुरु असून यातून भाजपाची मानसिकता स्पष्ट होत असल्याची टीका नाना पटोले यांनी यावेळी केली.

## संतोष देशमुख खूनाचा कराड हाच मास्टमाईंड?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
बीड मधील खुन प्रकरणात आमदार संदीप क्षीरसागर यांनी औचीत्याचा मुद्दा उपस्थित केला. यात क्षीरसागर यांनी वाल्मीक कराड यांचा उल्लेख केला. या प्रकरणात मोबाईलचे रेकॉर्ड तपास करण्याचे आवाहन देखील त्यांनी केले. इतकेच नाही तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद घ्यावे, तसेच येथील गुन्हेगारीकडे लक्ष देण्याची मागणी देखील क्षीरसागर यांनी केली.

परभणी प्रकरणात चर्चा आजच घेण्याची मागणी नाना पटोले यांनी केली आहे. मात्र, अध्यक्षांनी उद्या नियम 101 अंतर्गत चर्चा होणार असल्याचे जाहीर केले. मात्र, विरोधकांच्या वतीने आजच चर्चा घेण्याची मागणी केली जात आहे. या संदर्भात सभागृहात गोंधळ घालण्याचा प्रयत्न विरोधकांच्या वतीने केला जात आहे.

परभणीतील व्यक्तीचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीत झाला आहे. तर बीडमध्ये सत्ताधारी लोकांच्या माध्यमातूनच सरपंचांचा खून झाला असल्याचा आरोप विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी केला आहे.

## छगन भुजबळ राज्यपाल होतील..

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :



छगन भुजबळ हे जर नाराज असतील तर त्यांनी सरकारपासून नाराज राहण्याचे काही कारण नसल्याचे भाजप नेते आशिष देशमुख यांनी म्हटले आहे.

महायुतीतील प्रत्येक घटक पक्षांनी त्यांचा मानसन्मान कायमच केला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या पक्षाने त्यांच्या बाबत मोठा विचार केला असेल, असे देखील आशिष देशमुख यांनी म्हटले आहे. भुजबळांचे मोठे योगदान असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस त्यांचे नक्कीच पुनर्वसन करेल, असा विश्वास देशमुख यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे नाराज असून नागपूर येथील अधिवेशन सोडून ते नाशिककडे रवाना झाले आहेत. त्यातच त्यांनी माध्यमांशी बोलताना देखील थेट नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, मतदारसंघातील कार्यकर्त्यांशी बोलूनच पुढचा निर्णय घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मला देण्यात आलेल्या वागणुकीमुळे मी दुःखी असल्याचेही त्यांनी म्हटले होते. मात्र, आता त्यांना राज्यपाल पदाचा विचार केला जाऊ शकतो, असे भाजप नेते आशिष देशमुख यांनी म्हटले आहे.

सुधीर मुनगंटीवार यांच्यासारख्या नेत्याची सरकारमध्ये गरज आहे. त्याचप्रमाणे पक्षांमध्ये त्यांची उपयोगिता असेल, तर त्याचे स्वागत असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे. आमच्या सर्वांसाठी ते सर्वात ज्येष्ठ नेते आहेत. आमचे वरिष्ठ नेते त्यांचा पक्षात उपयोग करतील, असे देवेंद्र फडणवीस यांच्या बोलण्यावरून आम्हाला वाटत असल्याचे देखील ते म्हणाले. त्यांची नाराजी लवकरच दूर होईल, असा देखील विश्वास त्यांनी व्यक्त केला.

: सामान्यातील असामान्य :

## हरपली दृष्टी ... पण रंगानी रेखाटतो अनोखी सृष्टी



लोकमानस

काही अभागी लोक असेही असतात कि, निसर्गाने त्यांच्या पदरात दृष्टीचे दान पाडलेले नसते. परंतु तरीही मोठ्या जिद्दीने आणि आत्मविश्वासाने अशी दृष्टिहीन मंडळी स्वतःतील एका अनोख्या कलाकाराची ओळख जगाला करून देत सर्वांनाच थक्क करतात.

असाच महाराष्ट्रातील इचलकरंजी सारख्या जिल्ह्यामध्ये राहणारा एक दृष्टिहीन कलावंत म्हणजे प्रेम आवळे. प्रेम जन्मतःच रंगांधळा होता, परंतु रंगानी त्याला नवे जीवन दिलेले आहे. खरं तर प्रेमच्या कुटुंबाला कोणतीही कलात्मक पार्श्वभूमी नाही.त्याचे वडील एका कंपनीत वोचमन आहेत, आणि आई साधी गृहिणी. प्रेम छोटा होता तेंव्हा स्वयंपाक घरातून कोळसे घेऊन यायचा आणि बाहेरच्या भिंतीवर चित्र रेखाटायचा प्रयत्न करायचा. त्याच्यातील एका चित्रकाराची त्याच्या आई वडिलांना तेंव्हाच जाणीव झाली होती.

प्रेम मधील याच कलाकाराला त्याच्या आईने ओळखले आणि त्याला आणखी चित्र काढण्यासाठी प्रोत्साहित केले. प्रेम कडे चित्रकलेचे शाश्त्रशुद्ध प्रशिक्षण काही नव्हते. परंतु तरीही केवळ हौस आणि आवड म्हणून स्थानिक स्तरावरील स्पर्धांमध्ये प्रेम भाग घेऊ लागला आणि यातूनच त्याला नव्या चित्रांसाठी ऑर्डर मिळू लागल्या.

याच बक्षिसांच्या रकमेतून प्रेम चित्रकलेचे आणखी साहित्य खरेदी करू लागला. त्यानंतर कोळशापासून त्याची आवड तैल रंगाकडे वळली.गम्मत म्हणजे तैलचित्र देखील रेखाटून समोरच्याला थक्क करणाऱ्या प्रेमने अनेक स्पर्धांमध्ये आणि शिबिरांमध्ये भाग घेत नवीन अनुभव मिळवले. आणि त्यानंतर प्रतिष्ठित अशा फ्लोरेन्स अकादमी ऑफ आर्ट, इटलीच्या समर स्कॉलरशिप आर्ट कॉन्टेस्टसाठी अर्ज केला.

या स्पर्धेत जगभरातून केवळ तीनच कलाकारांची निवड होते,आणि प्रेम या स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकावर निवडला गेला. या स्पर्धेमुळे फ्लोरेन्स इटली कॅम्पसमध्ये एका महिनाय्च्या 'प्रगत पोर्ट्रेट 'कार्यशाळेत त्याला सहभागी होता आले. या स्पर्धेत प्रेम जिंकला त्याचे श्रेय तो आपले मित्र अमित पारीख, अश्विनी भाकू सर आणि राजू डबीर सर याना देतो.

फ्लोरेंसनच्या याच शिबिरात प्रेमला तैल रंगांची चित्रकला शिकता आली. फ्लोरेन्स अकादमी जगभरातील अनेक अकादमी पेक्षा खूप जुनी असल्यामुळे प्रेमला इथे चित्रकलेबद्दल खूप काही शिकायला मिळाले. अलीकडेच प्रेमाने महाराष्ट्र सरकारने आयोजित केलेल्या ६० व्या राज्य कला प्रदर्शनात चित्रकलेसाठीचे 'द हार्ड वर्कर 'हे अवार्ड देखील जिंकलेले आहे. केवळ २३ वर्षांचा प्रेम आवळे सारखा रंगांधळा कलाकार आकर्षक आणि सुंदर चित्र रेखाटून रसिकांना आश्चर्याचा धक्का देतो. ■ ■

: माझं मत :

## ईव्हीएम मशीन बाबत साशंकता

**जया मारकुटे (तालुका अध्यक्ष रा. कॉ)**

हो. इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन बाबत शंभर टक्के साशंकता वाटते. कारण कितीही झालं तरी ते यंत्र आहे आणि मानवाचलीत आहे. त्यामुळेच या यंत्रामध्ये फेरफार करता येणं सहज शक्य आहे. यंदाच्या विधानसभेच्या निवडणुकांमध्ये याच मशीनमध्ये फेरफार केल्याचा आणि निवडणुका जिंकल्याचा विरोधकांचा दावा त्यामुळेच खरा आहे.

**विजय गुंड (कार्यकर्ता)**

अमेरिका, जपान, चीन, ऑस्ट्रेलिया या सारख्या अत्यंत प्रगत देशांनी जर अशा प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन नाकारून कागदावर मतदान करण्याचा निर्णय घेतलेला आहे,तर मग आपल्याकडेच अशा ईव्हीएम मशीनद्वारे मतदानाचा अट्टाहास का? हा देखील प्रश्नच आहे. जर देशात लोकशाही पद्धतीने मतदान घ्यायचे असेल तर बॅलेट पेपरवरच मतदान असायला हवे.

**माधव भागवत (शिक्षक)**

बदलत्या काळानुसार जर सगळ्याच क्षेत्रात यंत्राला पर्याय नसेल तर मतदान प्रक्रिया देखील यंत्राधारीत म्हणजे ईव्हीएम वर असली तर बिघडलं कुठे? मला वाटत विरोधी पक्षांनी ईव्हीएम मशीन बाबत केलेल्या तक्रारीला काहीही अर्थ नाही. तुमचा पराजय झाला म्हणजे ईव्हीएम ला दोष द्यायचा आणि जिंकलात कि काहीही बोलायचे नाही हे चूक आहे.

**रमेश पतंगे (पोलीस)**

मला वाटत जर ईव्हीएम मशीन बद्दल विरोधकांच्या मनात साशंकता असेल तर एक तर बॅलेट पेपर वर मतदान प्रक्रिया असावी किंवा मग आपल्या एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात प्रत्येक मतदाराला घरी बसून टीव्ही शो मध्ये दाखवतात त्याप्रमाणे व्हॉट्स अप वर मतदानाची प्रक्रिया सुरु करावी म्हणजे निकाल पारदर्शी असेल. ■ ■



## टोयोटा किर्लोस्कर मोटरची गुवाहाटीत युज्ड कार आउटलेट सुविधा

टोयोटा किर्लोस्कर मोटरने गुवाहाटी येथे ईशान्य भारतात आपले पहिले कंपनी मालकीचे टोयोटा युज्ड कार आउटलेट लॉंच करून ग्राहक-प्रथम तत्त्वज्ञानाप्रती आपली बांधिलकी बळकट केली आहे.

टोयोटा यू-ट्रस्ट ब्रँड अंतर्गत भारतातील असे हे तिसरे आउटलेट आहे. पहिले दोन आउटलेट अनुक्रमे बंगळुरू आणि दिल्ली येथे आहेत. हा उपक्रम ग्राहकांना उच्च-गुणवत्तेच्या, सुरक्षित वापरलेल्या कार उपलब्ध करून देण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे, ज्यामध्ये खरेदी आणि विक्री प्रक्रियेदरम्यान सुविधा, पारदर्शकता आणि मनःशांती यावर जोर देण्यात आला आहे. नवीन सुविधा अंदाजे 4,000 चौरस फूट पसरली आहे आणि 15+ प्रमाणित टोयोटा वाहने प्रदर्शित करू शकते

प्रमाणित प्री-मालक टोयोटा वाहने शोधणाऱ्या ग्राहकांसाठी एक व्यापक व्यासपीठ म्हणून काम करतात. टोयोटाच्या जागतिक मानकांचे पालन करून प्रत्येक वाहनाची 203-बिंदूंची कठोर तपासणी केली जाते.

टोयोटा-प्रशिक्षित तंत्रज्ञांनी चालवलेली ही प्रक्रिया उच्च दर्जाची, सुरक्षितता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करते. याव्यतिरिक्त, ग्राहकांना संपूर्ण मनःशांती प्रदान करण्यासाठी तपासणीमध्ये सेवा इतिहास पडताळणीसारख्या बारीकसारीक दस्तऐवज तपासण्यांचा समावेश होतो. TUCO चे वैशिष्ट्य म्हणजे टोयोटाची स्वाक्षरी असलेली 'MARU MARU' प्रक्रिया, जी सर्वोच्च तंतोतंत साफसफाई दर्शवते. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मंत्री करा, अन्यथा...


■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
जुन्नर विधानसभा मतदारसंघातील अपक्ष आमदार शरद सोनवणे यांनी मंगळवारी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे आपल्याला मंत्रिमंडळात स्थान देण्याची मागणी केली. मला मंत्री केले नाही तर मला मतदारसंघात जाणे मुश्किल होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

आज विधानसभेत औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. बहुतांश आमदारांनी आपापल्या मतदारसंघातील सार्वजनिक हिताचे मुद्दे मांडणे पसंत केले असताना शरद सोनवणे यांनी मात्र आपल्याला मंत्री करण्याची मागणी जाहीरपणे करून आमदारांना आश्चर्याचा धक्का दिला.

मी जुन्नर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडून आलो आहे. विधानसभा निवडणूक निकालानंतर मी महायुतीला पाठिंबा जाहीर केला. मी छत्रपती शिवरायांची जन्मभूमी असलेल्या किल्ले शिवनेरीमधून येतो. शिवनेरी हा किल्ला माझ्या मतदारसंघात आहे. आपण सगळेच छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार करतो. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला जाहीर सभेच्या व्यासपीठावर आणले. मात्र, आतापर्यंत या शिवजन्मभूमीला महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात स्थान मिळू शकलेले नाही, अशी खंत सोनवणे यांनी व्यक्त केली.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीला म्हणजे १९ फेब्रुवारीला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शिवनेरीवर येतात आणि तिथे महाराष्ट्र हितासाठी नतमस्तक होतात. मला मंत्रिमंडळात स्थान मिळेल, असा शब्द मी मतदारसंघातील जनतेला दिला आहे. मला मंत्रिमंडळात घ्या असे सांगायला कमीपणा वाटतो. मात्र, मी स्वतःसाठी काही मागत नाही. शिवजन्मभूमीचा आदर म्हणून मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री माझ्या विनंतीचा गांभीर्यपूर्वक विचार करतील, अशी अपेक्षा व्यक्त करत शरद सोनवणे यांनी मंत्रिपदाची मागणी रेटून धरली.

## करदात्याप्रती पारदर्शीपणे काम करा



राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या प्रशिक्षण सत्रात राज्यपालांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
करदात्यांकडून कररूपात मिळणारा पैसा हा त्यांच्यासाठीच आवश्यक पायाभूत सोयीसुविधा निर्मितीसाठी वापरात येतो. हा संदेश विविध माध्यमातून त्यांच्यापर्यंत सकारात्मक पद्धतीने पोहोचविण्याची गरज आहे. आयकर अधिकाऱ्यांनीही करदात्यांप्रती सहृदयता जपत सक्षम व पारदर्शिपणे काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीत भारतीय राजस्व सेवेच्या ७८ व्या तुकडीच्या प्रशिक्षण सत्राच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन बोलत होते. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे सदस्य हरिंदर बीर सिंग गिल, प्रधान महानिदेशक (प्रशिक्षण) संजय बहादुर, राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीचे महानिदेशक (प्रशिक्षण) पी. सेलवा गणेश, अपर महानिदेशक (प्रशासन) मुनीष कुमार, अपर महानिदेशक शिदारामप्पा कपटनवार, अप्पर महानिर्देशक आकाश देवांगन, अपर महानिदेशक अंकुर आलिया, प्रशिक्षणार्थी आयकर अधिकारी व त्यांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले, उत्कृष्ट प्रशासक म्हणून घडविणारे हे प्रशिक्षण या तुकडीला परिपूर्ण करणार आहे. हे प्रशिक्षण अधिकाऱ्यांच्या कारकिदीर्चा महत्वाचा टप्पा असून त्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यात राष्ट्रीय कर अकादमी महत्वाची भूमिका पार पाडेल.

करदात्यांसोबत योग्य व्यवहार करुन करसंकलन करणे हे अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल. आपले कर्तव्य बजावताना आदर्श परिमाणांसोबत तडजोड न करता नैतिकता व सदाचाराचे पालन करुन या पदाला योग्य न्याय द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीने आपली गौरवशाली परंपरेची जोपासना करुन अधिकाधिक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले आहे. यावर्षीची ७८ वी तुकडी प्रशिक्षित होत आहे हे अभिमानास्पद असल्याचे राज्यपाल म्हणाले. तत्पूर्वी, अकादमीचे अंकुर आलीया यांनी ७८ व्या तुकडीतील प्रशिक्षणार्थींविषयीची माहिती दिली. कार्यक्रमापूर्वी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी ही केंद्र शासनाच्या भारतीय महसूल सेवा अधिकाऱ्यांसाठी (आयकर) सर्वोच्च प्रशिक्षण संस्था आहे.

## समृद्धीवर वाहनाचे टायर फुटले; एकाचा मृत्यू

### तिघे जखमी : शेगाव दर्शनाची मनोकामना अधुरी

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १७ :
नाशिक येथून शेगाव येथे दर्शनासाठी जाणाऱ्या परिवाराची दर्शनाची मनोकामना अधुरीच राहिली. त्यांच्या भरवेगातील चारचाकी वाहनाचे टायर फुटल्याने झालेल्या भीषण अपघातात एका कुटुंबातील एकाचा मृत्यू झाला तर तिघेजण जखमी झाले.

समृद्धी द्रुतगती महामार्गावर हा विचित्र अपघात झाला. नागपूर कॉरिडॉर वरील चॅनल क्रमांक २९१.६ नजीक ही दुर्घटना घडली. समृद्धी महामार्ग वरून नाशिक येथील खुळे पारिवार मारुती सुजूकी अल्टो (एम एच १५ ई एक्स ५१७४ क्रमाकाच्या ) वाहनाने शेगाव येथे दर्शनाला जात होते.

नागपूर कॅरिडोर चॅनेल नंबर २९१.६ या ठिकाणी वाहनाच्या उजव्या बाजूचे मागील टायर फुटल्याने भरधाव वेगाने जाणारे वाहन हे रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या बॅरिकेटला धडकले.

यामध्ये वाहन चालक महेश खुळे (राहणार नाशिक) हे गंभीर तर त्यांच्याच परिवारातील सोबतचे ३ सदस्य जखमी झाले. यामध्ये शकुंतला खुळे (वय ६०), दीपाली खुळे वय ३८) आणि धनश्री खुळे (वय १८) यांचा समावेश आहे. अपघाताची माहिती समृद्धी मार्गाच्या गस्तीवर असलेले सह पोलीस निरीक्षक संदीप इंगळे, मेजर खोडे, योगेश शेळके यांना मिळताच त्यांनी घटना स्थळ गाठले. त्यांनी तातडीने बचाव चमू व सुसज्ज रुग्णवाहिका पाचारण केली.




गंभीर जखमी महेश खुळे आणि इतर तिघा जखमींना उपचारासाठी मेहकर (जि. बुलढाणा) येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, महेश खुळे यांचा उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. इतर जखमींची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय आणि पोलीस सूत्रांनी सांगितले.

महासागर

# नागपूर वृत्तसागर

■ बुधवार, दि. १८ डिसेंबर २०२४ ■

## महाराष्ट्रात समान नागरी कायदा लागू करा



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** भारतीय संविधानातील अनुच्छेद ४४ मध्ये नागरिकांच्या समान अधिकारांबाबत भाष्य करण्यात आले आहे. या तरतुदीचा आधार घेत देशात समान नागरी कायदा लागू केला जाईल, असे भाजपाकडून सांगितले जाते. याच धर्तीवर आता भाजपाचे आमदार अतुल भातखळकर यांनी तुर्तास राज्यात समान नागरी कायदा लागू करावा, त्यासाठी सरकारने एक समिती स्थापन करावी अशी मागणी केली. राज्यपालांच्या अभिभाषणावर विधानसभेमध्ये चर्चा सुरू असताना भातखळकर बोलत होते.

२०१४ सालच्या लोकसभा निवडणुकीदरम्यान देशपातळीवर समान नागरी कायदा लागू केला जाईल, असे आश्वासन दिले होते. यावरच तरतुदीचा आधार घेत देशात समान नागरी कायदा लागू केला जाईल, असे भाजपाकडून सांगितले जाते. त्यानंतर आता आमदार अतुल भातखळकर यांनी पुन्हा एकदा समान नागरी कायदा या विषयाला हात घातला आहे. देशात हा कायदा लागू होण्यापूर्वी राज्यात लागू करावा आणि यासाठी समिती तयार करावी अशी मागणी केली.

एका समाजाचे लोक मशिदीवर विनापरवाना भोंगे लावून अजान करतात. अनाधिकृतपणे लावलेले भोंगे तात्काळ हटवण्याची मागणीही त्यांनी केली.

# जय जय राम कृष्ण हरीच्या नामात रंगले भक्त



### खासदार सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत 'जागर भक्तीचा' चौथा दिवस



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :** बोला पुंडलिक वरदा हरी विठ्ठल.. असे म्हणत जय जय राम कृष्ण हरीच्या गजरात आज हजारो भक्तांनी टाळकरी, वारकरी मंडळांच्या सोबत हरिपाठात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

खासदार सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत 'जागर भक्तीचा' या कार्यक्रमाच्या चौथ्या दिवशी ईश्वर देशमुख महाविद्यालयाच्या परिसरात आज सकाळच्या सत्रात हरीपाठ पठणाचे आयोजन करण्यात आले.

लहान मोठे सर्वजण पारंपरिक वेशभूषा, तुळशी वृंदावन, टाळ यांच्यासह टाळकरी, वारकरी मंडळांच्या मार्गदर्शनात जय जय राम कृष्ण हरीच्या नामत रंगून गेल्याचे विहंगम दृश्य याठिकाणी पाहायला मिळाले. तत्पूर्वी कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी कांचन गडकरी, आळंदीचे ह.भ.प राम महाराज जिंतूरकर, नागपूरचे ह.भ.प प्रमोद महाराज ठाकरे, ह.भ.प संदीप महाराज कोहळे आणि कोलबा स्वामी देवस्थानचे ह.भ.प विकास भिशीकर महाराज, विश्वनाथ कुंभलकर यांनी दीपप्रज्वलन केले आणि विठ्ठलाची पूजा करून कार्यक्रमाची विधिवत सुरवात केली.

यावेळी किरण रोकडे, महिला अध्यक्ष, पतंजली पीठाच्या योगासन शिक्षिका उर्मिला जुवारकर, पतंजलि नागपूरच्या माधुरी ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. जय जय राम कृष्ण हरी, गजर हरिनामाचा, विठू माझा लाडका, ज्ञानबा तुकाराम .. अश्या विविध भजनांवर वारकऱ्यांसह उपस्थित लहान मोठ्या सर्वांनी ताल धरला. यावेळी टाळकरी, वारी मधल्या हरिनाम भजनांवर कश्या प्रकारे चालले जाते, कुठले खेळ खेळले जातात याची प्रात्यक्षिके करून सर्वांना सहभागी करून घेत होते.

काही महिलांनी यावेळी विठ्ठल रुक्मिणीची वेशभूषा केली होती. याशिवाय वारीची खरी गंमत अत्यंत उत्साहाने अनुभवता यावी म्हणून योगाभ्यास घेण्यात आला. शरीर आणि मन शुद्ध करणाऱ्या योग हरिनाम यांचा संयुक्त अनुभव उपस्थितांनी घेतला. संचालन रेणुका देशकर यांनी केले.

परमार्थाचे ऐश्वर्य देण्याची ताकद असलेल्या श्रीकृष्ण परमेश्वर योगेश्वर देवाधिदेव अशा सावळ्या पांडुरंगाच्या दर्शनाची ओढ अवघ्या वारकरी संप्रदायाला लागलेली असते. टाळ मृदंग ढोलकीच्या तालात पंढरपूरला निघालेली वारी मिठाई विठाई माझी कृष्णाई च्या नादात भक्तांना दिव्य अनुभूती देते. या वारीची दिव्य अनुभूती प्रत्यक्षपणे दोन हजार कलावंतांनी अभंग वारीमध्ये रसिक प्रेक्षकांना घडवून दिली.

निमित्त होते विश्व वारकरी सेवा संस्थेतर्फे २००० वारकऱ्यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात सादर केलेल्या 'अभंगवारी' या नाट्य, नृत्य व संगीतमय आविष्काराचे.

याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, संस्कार भारतीच्या प्रमुख कांचन गडकरी, हभप विठ्ठल महाराज नामदास, संजय पाचपोर, श्रीरामपंत जोशी, प्रमोद ठाकरे, प्रशांत धमार्पुरीकर, सचिन पवार, ज्ञानेश्वर रक्षक, संभाजी पाटील निलंगेकर, उद्योगपती अतुल गोयल, आयुर्वेद विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिश्रा, उद्योगपती नितीन खारा, आ. प्रवीण दटके, आ. मोहन मते, राम झिंझुरकर आळंदे, अनिल अहिरे, आ. अडसड, आ. समीर कुणावर आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



रामकृष्ण हरी हा वारकरी संप्रदायाचा बिजमंत्र व पांडुरंगाच्या ध्यानाचे वर्णन करून, महाराष्ट्राच्या समृध्द सांस्कृतिक संस्कृतीचे अविभाज्य घटक असलेल्या 'अभंगवारी ' चा प्रारंभ झाला, तेव्हा मंचावर तीर्थक्षेत्र पंढरपूर अवतरल्याची अनुभूती रसिकांना आली. १००० टाळकरी, ५० मृदंगवादक, ५० तबलावादक, २५० गायक, ५०० नाट्य कलाकार, घोडे, पालख्या, भालदार, चोपदार, पताकाधारी असलेला हा संपूर्ण भारतातील वारीचा पहिला भव्य कार्यक्रम होता. संचालन रेणुका देशकर आणि विश्व वारकरी संस्थेचे संदीप कोहळे यांनी केले.

मान्यवरांचे स्वागत खासदार प्रा. अनिल सोले, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सारंग गडकरी, डॉ. दीपक खिरवडकर, गुड्डु त्रिवेदी, आशिष वांदिले, नितीन तेलगोटे, मनिषा काशीकर, पिंटू कायरकर, बाळासाहेब कुलकर्णी यांनी केले.

## ठाकरेंनी आत्मचिंतन करावे...



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :** नवीन आमदारांना प्रशिक्षण देणे काही वावगे नाही पण शिवसेनेची संख्या कमी झाल्यामुळे या प्रशिक्षण कार्यशाळेत उद्धव ठाकरे यांनी आत्मचिंतनही करावे, असा सल्ला मंत्री उदय सामंत यांनी उद्धव ठाकरेंना दिला.

शिवसेना शिंदे गटाचे नेते तानाजी सावंत, नरेंद्र भोंडेकर हे मंत्रिपद न मिळाल्यामुळे नाराज आहेत, तानाजी सावंत यांनी डीपीवरून शिंदेंचाही फोटो काढला आहे, यासंदर्भात सामंत यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, शिंदे साहेब हे बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा घेऊन चालत आहे. मंत्रिपद मिळाले नाही म्हणून काही काळ नाराजी असेल पण आम्ही बारा मंत्री त्यांना मंत्रिपदासारखेच सन्मान देऊ त्यांची किरकोळ नाराजी दूर करू.

शिंदेंना गृहमंत्रिपद मिळावे यासाठी शिवसेना आग्रही असल्याच्या संदर्भात प्रश्न विचारला असता सामंत म्हणाले की आग्रह धरणे दावा करणे हा आमच्या अधिकार आहे. प्रत्येक कार्यकर्त्याला आपल्या नेत्याला मोठे पद मिळावे अशी इच्छा असते.

## राज्यपालांनी शपथविधीची अधिसूचनाच काढली नाही

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी मंगळवारी विधानसभेत राज्यपालांनी विद्यमान महायुती सरकारच्या शपथविधीची अधिसूचनाच काढली नसल्याचा धक्कादायक दावा केला. ?

यांच्या या दाव्यानंतर सत्ताधारी पक्षाने त्यांच्यावर जोरदार पलटवार करत ते वैफल्यग्रस्त झाल्याचा आरोप केला. यामुळे सभागृहाचे कामकाज चांगलेच तापले होते. दरम्यान, राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात 60 वेळा माझे सकार असा उल्लेख केला. हे तुमचे सरकार कसे झाले? याचा विचार करा, असेही जाधव यावेळी म्हणाले. भास्कर जाधव यांच्या या आरोपानंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच भाजपा आमदारांनी तीव्र आक्षेप घेतला.




# बिंझवार व इंझवार जमाती एकच

## आदिवासी बिंझवार समाज समितीने काढला मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. १७ डिसेंबर :**
आदिवासी बिंझवार व इंझवार जमाती एकच आहेत. याबद्दल राज्य शासनातर्फे ठराव केंद्राकडे पाठविण्यास विलंब होत आहे. त्यामुळे बिंझवार व इंझवार जमाती आदिवासींच्या हक्कापासून वंचित आहेत. त्यांना न्याय देण्याच्या मागणी घेऊन आदिवासी बिंझवार (इंझवार) समाज समितीतर्फे विधीमंडळावर मोर्चा काढण्यात आला.

भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांत मुळ आदिवासी बिंझवार (इंझवार) जमाती मोठ्या संख्येने आहेत. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २४ फेब्रुवारी २०१८ रोजी दिलेल्या बिंझवारी (इंझवार) संदर्भातील कागदपत्रे आदिवासी संशोधन संस्था महाराष्ट्र शासन पुणे आणि महाराष्ट्र शासन मुंबई यांना चार आठवड्यांची वेळ मागून प्रस्ताव केंद्र शासनाला ६ महिन्यांच्या आत पाठवून निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले आहेत. परंतु, सहा वर्षे लोटूनही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे बिंझवारी (इंझवार) जमातीला जात प्रमाणपत्र मिळत नाही. दोन्ही जमाती हक्कापासून वंचित आहेत. यासह विद्यार्थ्यांना अनुसूचित जमातींचे प्रमाणपत्र घेताना अडचणींचा सामनाही करावा लागतो. त्यामुळे महाराष्ट्र राज्याने अनुसूचित जमातीच्या यादीत बिंझवार जमातीची तत्सम जमात म्हणून इंझवार जमातीचा प्रस्ताव केंद्र शासनास शिफारशीसह पाठविण्याचे आदेश संबंधितांना द्यावे, या मागणीसाठी समितीचे सचिव अविनाश नेवारे यांच्या नेतृत्वात यशवंत स्टेडियम येथून मोर्चा काढण्यात आला. मोर्चाला टेकडी मार्गावर अडविल्यानंतर सभेत रुपांतर झाले. यावेळी मोर्चात सहभागी शेकडो आदिवासींनी न्याय मागण्यांसाठी घोषणा दिल्या. त्यानंतर अविनाश नेवारे, बाबुराव सोनवाने, हिरामण सोनवाने, राजुश्री सोनवाने व रामचंद्र मेश्राम यांच्या शिष्टमंडळाने आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांना मागण्यांचे निवेदन दिले. दोन्ही सर्व्हेचा अभ्यास करून लवकरच अहवाल पाठविणार असे ठोस आश्वासन आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी शिष्टमंडळाला दिले.

### समाजाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्या

**निषाद पार्टीचा विधिमंडळावर मोर्चा**

समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण राज्यात जिल्हानिहाय वसतिगृह बांधावे तसेच विद्यार्थ्यांना प्रत्येक शैक्षणिक क्षेत्रात शिष्यवृत्ती देण्यात यावी आणि युवा वर्गाकरिता रोजगार संधी उपलब्ध करुन द्यावी या मुख्य मागण्यांसह निषाद पार्टीतर्फे विधिमंडळावर मोर्चा काढण्यात आला. विदर्भ अध्यक्ष राहुल गौर आणि कैलाश केवदे यांच्या नेतृत्वात चाचा नेहरू बाल भवन येथून लोखंडीपूल मार्गे हा मोर्चा टेकडी मार्गावर पोहोचला. मोर्चाचे रुपांतर सभेत झाल्यानंतर मान्यवरांनी मोर्चेकऱ्यांना मार्गदर्शन केले. भोई, कहार, केवट, ढिवर व तत्सम जाती-जामातीचे आरक्षण वाढविण्यात यावे किंवा १९६१ च्या अगोदर ज्या जात प्रवर्गात समाज संमिलित होता त्यामध्ये पुन:संमिलित करण्यात यावे, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी लावून धरली होती. मागण्या पूर्ण करण्यासाठी घोषणाही दिल्या. राहुल गौर यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने नामदार अतुल सावे यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले. शिष्टमंडळात कैलास केवदे, किशोर करतार, मनोज बावणे, राजूअन्ना मामुलवार व यादव पांडलिकवार यांचा समावेश होता.

## क्राईम कॉर्नर

### जुगार अड्ड्यावर धाड, ६ अटकेत

**नागपूर,दि. १७ डिसेंबर :** वाडी पोलिसांनी गोपनिय माहितीवरून ठाण्यांतर्गत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून ६ जुगाऱ्यांना रंगेहात अटक केली. त्यांच्याकडून जुगारावर लावलेल्या पैशांसह एकूण ४९,६३१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. प्रदीप गंगाधर रंगारी (५०), प्रशांत रामकृष्ण जावडकर (५२) दोन्ही रा. राठी लेआऊट-वाडी,अक्षय रोशन रामटेके (२४) रा. सिद्धार्थ सोसायटी-आठवा मैल, शांतनू राजेंद्र मोवाडे (२५) रा. महादेवनगर, लाव्हा-वाडी,दिनेश अनिरुद्ध चव्हाण (३३) रा. हरीओम सोसायटी, दत्तवाडी आणि संदीप रमेश मनोहरे (४२) रा. आठवा मैल अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

आठवा मैल परिसरात आठवडी बाजारामागे ताडपत्रीच्या झोपडीत जुगार चालत असल्याची माहिती वाडी पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास पोलिसांनी सापळा रचून तेथे धाड टाकली. या दरम्यान वरील आरोपी तेथे जुगार खेळताना रंगेहात सापडले. पोलिसांनी त्यांच्याकडून डावावर लावलेले ७,२२१ रुपये, ४ मोबाईल फोन, आकड्याच्या नोंदी असलेल्या चिठ्ठ्या व इतर साहित्य असा एकूण ४९,६३१ रुपयांचा माल जप्त केला. महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदवून सर्व आरोपींना अटक करण्यात आली.

### ट्रेलरच्या धडकेत तरुण ठार

**नागपूर,दि. १७ डिसेंबर :** भरधाव ट्रेलरच्या धडकेत गंभीर जखमी होऊन एका तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. मृताची अद्याप ओळख पटलेली नाही. वय अंदाजे २२ वर्षे असल्याचा अंदाज आहे.

गत शनिवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास एक तरुण जबलपूर-हैदराबाद आऊटर रिंगरोडवर सनी ढाब्यासमोरून पायदळ जात होता. या दरम्यान एका ट्रेलरच्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून तरुणाला जबर धडक दिली आणि पळून गेला. स्थानिक नागरिकांनी तरुणाला उपचारार्थ मेयो रुग्णालयात भरती केले होते. सोमवारी रात्री उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यू झाला. पोलिसांनी ढाबा संचालक सागर ठाकरेच्या तक्रारीवरून ट्रेलर चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. मृताची ओळख पटविण्याचा प्रयत्न सुरू आहे. मृताच्या उजव्या हातावर अर्पित नाव गोंदलेले आहे. मृताबाबत कोणाला माहिती असल्यास पारडी पोलिसांशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### २.२० लाखांच्या मालावर डल्ला

**नागपूर,दि. १७ डिसेंबर :** कुटुंब लग्नाला गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत रोकड आणि दागिन्यांसह एकूण २ लाख २० हजार ५०० रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना कळमना पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी शमशेर खान गुलशेर खान (५५) रा. समालोचन सोसायटी, पार्वतीनगर वांजरा वस्तीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

रविवारी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास शमशेर खान कुटुंबासह घराला कुलूप लावून लग्नानिमित्त नातेवाईकाकडे गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील रोख १ लाख आणि सोन्याचांदीचे दागिने असा एकूण २,२०,५०० रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. रात्री १२.३० च्या सुमारास शमशेर घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### कारच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**नागपूर,दि. १७ डिसेंबर :** घरून फिरायला निघालेल्या महिलेला भरधाव कारच्या चालकाने जबर धडक दिली आणि फरार झाला. यात गंभीर जखमी महिलेचा उपचार मिळण्यापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना एमआयडीसी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. निर्मला गेंदलाल फुन्ने (५६) रा. पंचशीलनगर, इसासनी असे मृत महिलेचे नाव आहे.

सोमवारी सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास निर्मला घरून फिरायला निघाल्या होत्या. हिंगणा मार्गाने जात असताना तकीयावाले बाबा दर्गाजवळ भरधाव असलेल्या कारच्या चालकाने त्यांना जबर धडक दिली. यात निर्मला गंभीर जखमी झाल्या. आसपासचे नागरिक मदतीला धावले. या दरम्यान आरोपी कार चालक तेथून पसार झाला. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. एमआयडीसी पोलिस घटनास्थळी पोहोचले. निर्मला यांना उपचारार्थ हिंगणाच्या लता मंगेशकर रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी निर्मला यांचा मुलगा संजूच्या तक्रारीवरून अज्ञात कार चालकावर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासून त्याचा शोध घेतला जात आहे.

### नायलॉन मांजा विक्रेत्यांची धरपकड

**५ जणांना अटक, १६१ चकरी जप्त**

**नागपूर,दि. १७ डिसेंबर :** पोलिस विभागाकडून प्रतिबंधित नायलॉन मांजाविरुद्ध सातत्याने कारवाई सुरू आहे. वेगवेगळ्या कारवाईमध्ये पोलिसांनी पुन्हा ५ जणांना अटक करून १६१ चकरी नायलॉन मांजा जप्त केला. पहिल्या कारवाईत कोतवाली पोलिसांनी गोपनिय माहितीवरून केळीबाग रोडवर एमएच-४९/एआर-२० क्रमांकाचा तीन आसनी ऑटो अडविला. झडतीमध्ये एका पोत्यात नायलॉन मांजाच्या ४८ चकरी मिळाल्या. पोलिसांनी ऑटोचालक जमील इजराईल महाजन (३२) रा. वानाडोंगरी याला अटक केली. त्याच्याकडून मांजा आणि ऑटोसह १.२६ लाखाचा माल जप्त केला. दुसरी कारवाई नाईक रोडवर करण्यात आली. पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर दोन तरुणांना एमएच-४०/सीपी-२७२५ क्रमांकाच्या मोटारसायकलने संशयास्पदरित्या जाताना पकडले. त्यांच्याजवळ असलेल्या पोत्याची झडती घेतली असता ४५ चकरी नायलॉन मांजा मिळाला. पोलिसांनी मोटारसायकल आणि मांजा असा १.५५ लाख रुपयांचा माल जप्त करून दोन्ही आरोपींना अटक केली. लकी मंगेश वाडीभस्मे (१९) रा. कुही आणि हितेश हिरालाल गिरडकर (२२) रा. वकीलपेठ अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

तिसरी कारवाई गणेशपेठ पोलिसांनी केली. मध्यवर्ती बस स्थानकाजवळील हॉटेल ब्रीज ईनसमोर एका तरुणाला संशयास्पदरित्या मोटारसायकलने जाताना पकडले. त्याच्याजवळील पोत्याची झडती घेतली असता ४८ चकरी नायलॉन मांजा मिळाला. ऋषिकेश इंद्रेश गौर (१८) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून मांजा, दुचाकी आणि फोनसह ८३,४०० रुपयांचा माल जप्त केला. चौकशीत त्याने हिंगोली येथील आयूषमान जगदीश राव (२८) याच्या मदतीने मांजा खरेदी केल्याची माहिती दिली.

चौथी कारवाई वाठोडा पोलिसांनी केली. गोपनिय माहितीच्या आधारावर एका पतंग विक्रेत्यावर धाड टाकण्यात आली. कीर्तीधर सोसायटीत राहणारा शुभम प्रेमकुमार बुरडे (२१) हा घरूनच नायलॉन मांजाची विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी त्याच्या घरी धाड टाकली. झडतीमध्ये २० चकरी प्रतिबंधित नायलॉन मांजा मिळाला. सर्व आरोपींवर पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### गुंडास शस्त्रासह अटक

**नागपूर,दि. १७ डिसेंबर :** अंबाझरी पोलिसांनी ठाण्यांतर्गत गस्तीदरम्यान एका संशयित तरुणाला पाठलाग करून पकडले. झडतीमध्ये त्याच्याजवळ चाकू मिळाला. पोलिसांनी चाकू जप्त करून तरुणाला अटक केली. जेम्स उर्फ टकली पॅण्टिंग सिंग (२६) रा. तेलंगखेडी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. जेम्सविरुद्ध प्रतिबंधक कारवाई सुरू असून त्याने त्याचे उल्लंघन केल्याची बाब चौकशीत पुढे आली आहे. रात्री ११.३० वाजताच्या सुमारास अंबाझरी पोलिसांचे एक पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते.

# मनपातील विविध संवर्गातील पदोन्नतीस मुख्यमंत्र्यांनी दिली मान्यता

## हिवाळी अधिवेशनात नागपूरसाठी प्रशासकीय दृष्टया महत्वाचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. १७ डिसेंबर :**
राज्याची उपराजधानी नागपूर शहरात सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये नागपूर शहरासाठी प्रशासकीय दृष्टया महत्वाचा निर्णय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. नागपूर महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी राज्य शासनाला प्रस्ताव दिला होता. या प्रस्तावाला हिरवी झेंडी दाखवित मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मनपातील ४५ पदांच्या पदोन्नतीला मान्यता दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयाचे नागपूर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वागत करीत आनंद व्यक्त केला आहे.

राज्य सरकारद्वारे मनपातील पदोन्नतीला मान्यता प्रदान करण्यात आल्यामुळे आता सहायक आयुक्त / वार्ड अधिकारी श्री. गणेश राठोड यांना उपायुक्त पदी तर एकूण नऊ उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता म्हणून तर ३४ कनिष्ठ अभियंता यांना उपअभियंता म्हणून आणि मुख्याध्यापक (माध्यमिक) श्रीमती साधना सयाम यांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक) म्हणून पदोन्नती मिळाली आहे.

नगर विकास विभागाच्या १० मे २०२३च्या शासन निर्णयान्वये नागपूर महानगरपालिकेच्या १७९८१ पदांच्या एकत्रित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती तपासणी समिती गठीत करण्यात आली. या पदोन्नती तपासणी समितीच्या २४ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित बैठकीमध्ये समितीने पात्र अधिकाऱ्यांस सदर पदांवर पदोन्नती देण्यास शिफारस केली. त्याअनुषंगाने पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या पात्र अधिकाऱ्यांना प्रशासकीय ठरावानुसार उपायुक्त या पदावर तसेच कार्यकारी अभियंता (स्थापत्य), कार्यकारी अभियंता (यांत्रिकी), उपअभियंता (स्थापत्य), शिक्षणधिकारी (माध्यामिक) या पदांवर पदोन्नती देण्यास राज्य शासनाकडे शिफारस करण्यात आली व या पदांवर संबंधित पात्र अधिकाऱ्यांना तात्पुरती पदोन्नती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी विषयाकडे लक्ष देऊन पदोन्नतीस मान्यता देण्याबाबत निर्देश दिले. त्यानुसार नगर विकास विभागाच्या सह सचिव विद्या हम्पय्या यांनी आदेश जारी केले आहेत.

# मोर्चेकऱ्यांच्या मदतीला सरसावले पोलिस

## पोलिस वाहनातून पोहोचविले मोर्चास्थळी

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. १७ डिसेंबर :**
हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी तीन मोर्चांनी विधिमंडळावर धडक दिली. या तिन्ही मोर्चांमध्ये आंबेडकरवादी संघर्ष पार्टीचा मोर्चा विशेष ठरला. या मोर्चात बोटावर मोजण्या इतपत कार्यकर्ते होते. त्यातही वृद्धांचा अधिक समावेश होता ज्यांना धड चालताही येत नव्हते. अशात पोलिस त्यांच्या मदतीला सरसावले. चक्क पोलिस वाहनातून त्यांना मोर्चास्थळी म्हणजे टेकडी मार्गावर पोहोचविण्यात आले. पोलिसांची संवेदनशीलता पाहून सर्वांनी त्यांचे कौतूक केले. मोर्चेकऱ्यांनीही त्यांना धन्यवाद करीत आभार व्यक्त केले.

आंबेडकरवादी संघर्ष पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष आय. एल. नंदागवळी आणि राष्ट्रीय उपाध्यक्षा सूर्यकिरण नंदागवळी यांच्या नेतृत्वात मंगळवार १७ डिसेंबर रोजी यशवंत स्टेडीयम येथून मोर्चा काढण्यात आला. प्रत्येक हिवाळी अधिवेशनादरम्यान नंदागवळी यांचा मोर्चा असतो. यंदा मोर्चा काढण्यासाठी कमी कालावधी मिळाल्याने कदाचित त्यांच्या मोर्चात बोटावर मोजण्याइतपत कार्यकर्ते होते. भंडारा आणि यवतमाळहून आलेले हे मोर्चेकरी सकाळीच नागपूरला पोहोचले. यशवंत स्टेडियम येथून त्यांचा मोर्चा टेकडी मार्गासाठी निघाला. सर्वांच्या हातात निळे झेंडे होते. मोर्चात बहुतांश कार्यकर्ते वृद्ध होते. कार्यकर्त्यांची संख्या कमी आणि त्यातही वृद्धांची संख्या अधिक हे लक्षात घेता पोलिस त्यांच्या मदतीला सरसावले. चक्क पोलिस वाहनात बसवून त्यांना मोर्चास्थळी आणले. पोलिस वाहनातून कार्यकर्ते उतरल्यानंतर त्यांच्यात जोश संचारला. गगणभेदी घोषणा देत त्यांनी टेकडी परिसर दणाणून सोडला. आय.एल. नंदागवळी यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाला विधानभवनात नेण्यात आले. संबंधित विभागाच्या सचिवांशी भेट घेवून त्यांनी मागण्यांचे निवेदन दिले. शिष्टमंडळात प्रतिभा वानखेडे, शोभा कांबळे, मेश्राम यांचा समावेश होता.

### साने गुरुजी जयंती २४ डिसेंबरला साजरी करणार

नागपूर १७: मनपा जेष्ठ नागरिक कक्षात पुज्य साने गुरूजी यांची १२५ वी जयंती सिनियर सिटीझन कौन्सील ऑफ नागपूर डिस्ट्रीक्ट व्दारे साजरी करण्यात येत असुन मुख्य अति मा. म्हणून श्रीमंती आंचल गोयल, अति आयुक्त श्री. अजय चारठाणकर, उपायुक्त मनपा व डॉ. रंजना लाडे उपायुक्त पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मनोहर खर्चे राहतील असे मनपा ज्येठ नागरिक कक्ष व संस्थेचे सचिव सुरेश रेवतकर यांनी कळविले असून सर्व जेष्ठ नागरिक मंडळाचा पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नितिन कराडे यांना बौध्द समाज रत्न पुरस्काराने सन्मानित

■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक ,दि. १७ डिसेंबर :**
दि.१५ डिसेंबर ला कामठी येथे आयोजित करण्यात आलेल्या आनंद बहुउद्देशिय समाज विकास संस्था व आनंद मॅरिज ब्युरो द्वारा श्री. नितीन कराडे यांना बौद्ध समाज रत्न पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.

बौद्ध समाजात आतापर्यंत केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल संस्था कडुण बौद्ध समाज रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी संस्थाचे राष्ट्रीय संस्थापक तथा अध्यक्ष रविंद्र तांडेकर, आनंद मैरिज ब्युरो तथा संस्था चे कामठी शहर अध्यक्ष आकाश जगणित,


राष्ट्रीय सचिव बालचंद चौधरी यांचे हस्ते नितीन कराडे यांना पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आला.

# विद्यार्थ्यांना दिले जात आहे सुरक्षा व सुरक्षितता प्रशिक्षण



■ महासागर प्रतिनिधी
**काटोल,दि. १७ डिसेंबर :**
सुरक्षा आणि सुरक्षितत प्रशिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद महाराष्ट्र शासन अंतर्गत स्किल ट्री कॉन्सलटन्ट लिमिटेड कंपनी मार्फत सुधारित शिक्षणासाठी शाळांचे बळकटिकरण करण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील तालुका स्तरावरील गटशिक्षणाधिकारी यांच्या समक्ष त्यांच्या एखत्यारितील केंद्र प्रमुख व सर्व मुख्याध्यापक यांचे हे प्रशिक्षण घेणे सुरु झाले असून प्रथम कामठी, काटोल आणि मौदा या तालुक्यात घेण्यात आले असून.

तर उर्वरित तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांच्या संमतीने प्रशिक्षण घेणे सुनियोजित आहे. या प्रशिक्षणात येणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना सुरक्षा आणि सुरक्षितात या बाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे तसेंच आपल्या शाळेत सुरक्षेचे काय बदल करण्यात यावे याबत प्रशिक्षित केले जाते. त्याच प्रमाणे शाळेतील मुला व मुलींची सुरक्षेसाठी काय उपाययोजना करण्यात येतील या बाबतही प्रशिक्षित देण्यात येत आहे, सदर प्रशिक्षण तालुक्यातील केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक यांनी घेऊन त्यांनी त्यांच्या शाळेतील शिक्षक व विध्यार्थी यांना देण्यात येत आहे.

त्या प्रमाणे आपली शाळा सुरक्षित ठेवणे आहे. हे प्रशिक्षण स्किल ट्री कॉन्सलटन्ट लिमिटेड कंपनीचे नागपूर जिल्ह्यातील जिल्हा समन्वयक अभिमन्यू पवार, मनोज कुकडे, सतीश गद्रे, नीलिमा आंभोरे, अर्चना बोडके, रोशनी पवार , प्रियांका कोचे, मंगला मोटांकर, अमित वालदे, अनिकेत भालावी, आर्यन बोडके व त्यांची टीम परिश्रम घेत आहे.

# अजनी स्थानकावर येणाऱ्या व जाणाऱ्या गाड्यांचा पुन:प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. १७ डिसेंबर :**
मध्य रेल्वे, नागपूर विभागाला ही घोषणा करताना आनंद होत आहे की अजनी रेल्वे स्थानकावरील मोठ्या सुधारणा कामाचे यशस्वीपणे समापन झाले आहे. हे काम १२ सप्टेंबर २०२४ पासून प्लॅटफॉर्म क्रमांक २ आणि ३ साठी ९० दिवसांच्या ब्लॉकअंतर्गत केले गेले होते. हे प्लॅटफॉर्म आता वाहतूक आणि गाड्यांच्या थांब्यांसाठी पूर्णपणे योग्य झाले आहेत.

या कामाच्या पूर्ततेमुळे १२ सप्टेंबर २०२४ पासून तात्पुरते बंद केलेल्या अप गाड्यांच्या थांब्यांचा पुन:प्रारंभ तात्काळ करण्यात आला आहे.

**खालील अप गाड्या आता सुधारित वेळापत्रकानुसार अजनी स्थानकावर थांबतील:** गाडी क्र. ०१३७४ (नागपूर -वर्धा मेमू) अजनी येथे ०८:०८-०८:०९ वाजता थांबेल, रविवार वगळता दररोज चालेल. गाडी क्र. ११०४० (गोंदिया -कोल्हापूर एक्सप्रेस) अजनी येथे १०:५४-१०:५५ वाजता थांबेल, दररोज चालेल. गाडी क्र. १८०३० (शालिमार -लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस) अजनी येथे १३:४४-१३:४५ वाजता थांबेल, दररोज चालेल. गाडी क्र. ११४०३ (नागपूर -कोल्हापूर एक्सप्रेस) अजनी येथे १५:२३-१५:२४ वाजता थांबेल, मंगळवार आणि शनिवार चालेल. गाडी क्र. १२१०६ (गोंदिया -छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस) अजनी येथे १७:०९-१७:१० वाजता थांबेल, दररोज चालेल. गाडी क्र. १२११४ (नागपूर -पुणे एक्सप्रेस) अजनी येथे १८:०८-१८:०९ वाजता थांबेल, मंगळवार, शुक्रवार आणि रविवार चालेल. गाडी क्र. १२१३६ (नागपूर -पुणे एक्सप्रेस) अजनी येथे १८:०८-१८:०९ वाजता थांबेल, सोमवार, बुधवार आणि शनिवार चालेल. गाडी क्र. १२१४० (नागपूर -छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस) अजनी येथे २१:२३-२१:२४ वाजता थांबेल, दररोज चालेल.

**तसेच, खालील गाड्या आता अजनी स्थानकावरून ठरलेल्या वेळेनुसार सुटतील:** गाडी क्र. १२१२० (अजनी -अमरावती एक्सप्रेस) अजनी स्थानकावरून १८:३० वाजता सुटेल, दररोज चालेल. गाडी क्र. २२१२४ (अजनी -पुणे एक्सप्रेस) अजनी स्थानकावरून १९:५० वाजता सुटेल, मंगळवारी चालेल. गाडी क्र. २२१४० (अजनी - पुणे एक्सप्रेस) अजनी स्थानकावरून १९:५० वाजता सुटेल, रविवारी चालेल.

**तसेच, खालील गाड्या आता अजनी स्थानकावर ठरलेल्या वेळेनुसार समाप्त होतील:** गाडी क्र. १२११९ (अमरावती -अजनी एक्सप्रेस) अजनी येथे ०८:१५ वाजता पोहोचेल. गाडी क्र. २२१२३ (पुणे -अजनी एक्सप्रेस) अजनी येथे ०४:५० वाजता पोहोचेल. गाडी क्र. २२१३९ (पुणे -अजनी एक्सप्रेस) अजनी येथे १२:५० वाजता पोहोचेल.

हे बदल प्रवाशांच्या सोयीसाठी आणि अजनी स्थानकावरील गाड्यांच्या सुगम व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरतील.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ५९ प्रकरणांची नोंद



■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. १७ डिसेंबर :** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. मंगळवार (१७) रोजी शोध पथकाने ५९ प्रकरणांची नोंद करून ४४,७००/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/-दंड) या अंतर्गत १२ प्रकरणांची नोंद करून ४,८००/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/-दंड) या अंतर्गत ४ प्रकरणांची नोंद करून १,६००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ११ प्रकरणांची नोंद करून १७,५००/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी जनावरे बांधणे या अंतर्गत ३ प्रकरणांची नोंद करून ४,००० रुपयांची वसुली करण्यात आली.

# मनपा व स्मार्ट सिटीच्या प्रकल्पांची प्रधान सचिवांनी केली पाहणी




■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. १७ डिसेंबर :**
महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ के. एच. गोविंदराज यांनी मंगळवारी (ता.१७) नागपूर महानगरपालिका आणि नागपूर स्मार्ट सिटीच्या विविध विकास प्रकल्पांची पाहणी केली. त्यांनी नागपूर स्मार्ट सिटीतर्फे नागपूर पोलीसांसाठी तयार करण्यात आलेल्या कमांड कंट्रोल सेंटरची सुद्धा पाहणी केली. याप्रसंगी नागपूर पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल सूद गोयल, पोलीस उपायुक्त श्री. लोहित मतानी, डॉ. अश्विनी पाटील आणि मनपाचे अतिरिक्त आयुक्त श्री अजय चारठाणकर प्रामुख्याने उपस्थित होते.

सर्वप्रथम डॉ . गोविंद राज यांनी मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीमधील सहाव्या माळ्यावर स्थित श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी सिटी ऑपरेशन सेंटरची पाहणी केली. मनपा आणि नागपूर स्मार्ट सिटीतर्फे त्यांना सिटी ऑपरेशन सेंटरमधून घनकचरा व्यवस्थापन, आपली बस, इंटिग्रेटेड ट्रॅफिक मॅनेजमेन्ट सिस्टिम आणि नागरी समस्यांच्या संबंधात येणाऱ्या तक्रारींबद्दल करण्यात येत असलेल्या व्यवस्थापनाची माहिती दिली. नागपूर सेफ अँड स्मार्ट सिटी प्रोजेक्ट अंतर्गत करण्यात येत असलेल्या विविध कामांची माहिती देताना नागपूर स्मार्ट सिटी ई गव्हर्नन्स विभागाचे महाव्यस्थापक डॉ. शील घुले यांनी सांगितले की, नागपूर शहरात ३६०० सीसीटीव्ही कॅमरे लावण्यात आले आहेत. सध्या काही कॅमरे विविध विकास प्रकल्प सुरु असल्यामुळे बंद आहेत. स्मार्ट सिटीतर्फे स्मार्ट पार्किंग, वायफायची सुविधा करण्यात आली आहे. अधिवेशन काळात गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी या कॅमेऱ्यांची मदत होते. तसेच महामेट्रो, मॉल्स आणि इतर बाजारपेठेतील ४००० कॅमरे सुद्धा यासोबत संलग्न करण्यात आले आहेत. नागपूर शहरात ३५० नवीन ठिकाणी २००० कॅमरे लावण्याची मागणी होत आहे, असेही डॉ. शील घुले यांनी सांगितले.

इंटिग्रेटेड ट्रॅफिक मॅनेजमेन्ट सिस्टिम बद्दल माहिती देताना अतिरिक्त आयुक्त श्री. अजय चारठाणकर यांनी सांगितले की केल्ट्रॉन कंपनी या प्रणालीचे काम करीत आहे. पुढील वर्षी हा प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पाच्या सहाय्याने नागपूरची वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यात मोठी मदत होईल.

# सुषमा अंधारेंना जीवे मारण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांना नागपूर विमानतळावर जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. याबाबत सुषमा अंधारे यांनी स्वतः फेसबुक पोस्टच्या माध्यमातून माहिती दिली आहे.

या फेसबुक पोस्टमध्ये सुषमा अंधारे यांनी अनेक धक्कादायक दावे करत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या प्रकरणात लक्ष घालण्याचे आवाहन केले आहे. त्याचबरोबर राज्यात दहशत आणि दबावतंत्राचे गलिच्छ राजकारण सुरू असल्याचेही अंधारे यांनी म्हटले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सध्या नागपूरमध्ये विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. अशा परिस्थितीत ही घटना घडल्यामुळे याबाबत उलट सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत.

ही संपूर्ण घटना सांगताना शिवसेना (उद्धव ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या, परभणी प्रकरणातील दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी यासाठी सभागृहात आणि सभागृहाबाहेर संघर्ष सुरू आहे. अशातच आत्ता ३ वाजून ३६ मिनिटांनी (पहाटे) नागपूर



विमानतळावर बाहेर पडण्यासाठी असलेल्या फाटकाजवळ विचित्र घटना घडली.

मी आणि माझी ७ वर्षांची लेक समता सैनिक दलाच्या स्मिता कांबळे यांच्याबरोबर होते. साधारण ६ फूट उंचीचा गोल आकाराचा गंध लावलेला, अर्धे टक्कल असणारा माणूस बोलण्याचा प्रयत्न करत होता. नेहमीप्रमाणे कुणीतरी ओळखीचा असावा म्हणून वर बघितले तर तो जीवे मारण्याच्या धमक्या देत होता. गेटवरील सुरक्षारक्षक थोडे पुढे सरसावले, तसा तो जय श्रीरामच्या घोषणा देत भरधाव गाडीने निघून गेला.

**त्यावर माझा फारसा विश्वास नाही...**
यावेळी अंधारे यांनी #टीप असे लिहित म्हटले की, शासनाने मला सुरक्षा पुरवावी असे अजिबात वाटत नाही. कारण त्यावर माझा फारसा विश्वास नाही. बाकी आपली मर्जी.

सुषमा अंधारे यांनी आपल्या फेसबुक पोस्टमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आवाहन करत या प्रकरणाचा तपास करावे असे म्हटले आहे. त्या म्हणाल्या, देवेंद्रजी, आपण आपल्या यंत्रणेकडून या ठिकाणचे सर्व सीसीटीव्ही तपासून वस्तुस्थिती पाहावी. हा घटनाक्रम इथे लिहू नये असे खूप वेळा वाटले. मात्र, दहशत आणि दबावतंत्राचे हे गलिच्छ राजकरण मुख्यमंत्री म्हणून आपल्यापर्यंत पोहचवणे ही नागरिक म्हणून माझी जबाबदारी आहे असे वाटले.

# आमदार म्हणतात.... अंघोळ करायची कशी?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
हिवाळी अधिवेशनासाठी राज्यभरातील आमदार रविवारपासूनच शहरात आले आहेत. त्यातही अर्ध्याअधिक आमदारांनी निवासासाठी हॉटेलकडे धाव घेतली असली तरीही अजूनही काही आमदार निवासासाठी आमदार निवासात आहेत. मात्र, या आमदार निवासालाच असुविधेचा विळखा बसल्याने आम्ही राहायचे कुठे असा प्रश्न आमदारांनी सभागृहात उपस्थित केला.

## गरम पाण्याचे गिझर बंद

आमदार अमोल मिटकरी यांनी आमदार निवासाला बसलेल्या असुविधेचा पाढाच सभागृहात वाचला. वीज खंडित झाल्याने गरम पाण्याचे गिझर बंद आहे. कडाक्याच्या थंडीत थंड पाण्याने आंघोळ करायची का? असा प्रश्न मिटकरी यांनी उपस्थित केला.

त्यावर अनिल परब यांनीही गेल्या तीन दिवसांपासून आमदार निवासातील गरम पाण्याचे गिझर बंद असल्याचे सांगितले. त्यावर नीलम गोऱ्हे यांनी याबाबत याआधीही अनेक तक्रारी आल्या आणि यावर आधीच चर्चा झाली आहे, त्यामुळे उगाच प्रसिद्धी नको, असे सांगितले.







■ नागपूर : हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी शिवसेना प्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विधीमंडळ परिसरात हजेरी लावली. विधानपरिषद सदस्य आमदार चित्रा वाघ यांनी हसतमुखाने प्रसार माध्यमांशी संवाद साधला. मंत्री पंकजा मुंडे या पक्षाच्या सहकारी महिला आमदारांसोबत सभागृहात दाखल झाल्याचे दिसून आले.

# झाडाच्या फांद्या तोडण्यास परवानगीची गरज नाही

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
झाडाच्या फांद्या तोडण्यास परवानगीची गरज नाही, मात्र विनापरवानगी झाडे तोडल्यास पन्नास हजार रुपये दंडाची तरतूद असलेले विधेयक राज्य सरकारतर्फे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी विधानसभेत सादर केले.

पाटील यांनी आणखीही काही विधेयके विधानसभेत मांडली असून त्यावर सविस्तर चर्चा घेण्यात येणार आहे. शेतजमिनीचे नियमभंग करुन तुकडे केले असल्यास ते नियमित करण्यासाठी पंचवीसऐवजी पाच टक्के दंडआकारणी करण्याबाबतचे विधेयकही मांडण्यात आले.

परवानगीखेरीज झाडे तोडण्यास प्रतिबंध असून फांद्या तोडल्या, तरी दंड आकारणी करण्यात येत होती. त्यामुळे यासंदर्भात विधेयकात व्याख्या स्पष्ट करण्यात आल्याचे पाटील यांनी सभागृहात सांगितले. राज्यात दहा गुंठे बागायती व वीस गुंठेपेक्षा कमी

## विधानसभेत विविध विधेयके सादर

जिरायती जमिनीचे तुकडे करण्यास बंदी आहे. तरीही ते करण्यात आले असून ते नियमित करण्यासाठी रेडीरेकनर दराच्या पंचवीस टक्के दंडआकारणीची सध्याची तरतूद आहे. ती पाच टक्के इतकी कमी करण्याचा प्रस्ताव असून त्याचा हजारो नागरिकांना लाभ होणार आहे.

प्राचीन स्मारके, गडकिल्ले, ऐतिहासिक स्थळे यांचे नुकसान, विद्रुपीकरण केल्यास शिक्षेमध्ये वाढ करण्यात येणार आहे. आता दोन वर्षे तुरुंगवास व एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

यासाठी संबंधित कायद्यामध्ये दुरुस्ती करणारे विधेयक विधानसभेत सादर करण्यात आले. प्रभादेवी येथील सुप्रसिद्ध सिद्धीविनायक ट्रस्टवरील विश्वस्तांचा कार्यकाळ तीन वर्षांवरून पाच वर्षे करण्याचा आणि सदस्यांची संख्या नऊवरुन पंधरा करण्याचा प्रस्ताव असलेले विधेयकही विधानसभेत मांडण्यात आले.

# महायुतीचे आमदार गुरुवारीआरएसएस स्थळी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
हिवाळी अधिवेशनादरम्यान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून दरवर्षी भाजपच्या आमदारांसाठी संघपरिचय वर्गाचे आयोजन केले जाते. यावेळी भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षाचे सर्व आमदार हे रेशीमबागेतील स्मृति मंदिर स्थळी जाऊन पहिले सरसंघचालक डॉ. हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी यांच्या स्मृती स्थळाचे दर्शन घेतात.

राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष फुटल्यावर महायुतीचे सरकार स्थापन झाले होते. त्यानंतर २०२३ मध्ये नागपुरात झालेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान संघाकडून परिचय वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या आमदारांनी संघ दरबारी जाणे टाळले होते.

## अजित पवारांच्या भूमिकेकडे लक्ष

यावर्षी संघाने १९ डिसेंबरला सकाळी ८ वाजता महायुतीच्या सर्व आमदारांना निमंत्रण दिले आहे. त्यामुळे अजित पवार यावेळी रेशीम बागला जाणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

याआधीही नागपुरात जाऊनही अजितदादांनी दोनदा भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कार्यालयात जाणं टाळले होते. पण आता ते महायुतीत चांगलेच रुळले आहेत. तसेच त्यांचे ४१ आमदार निवडून येण्यात भाजपसह संघाचंही योगदान असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात दबक्या आवाजात सुरू आहे.

त्यामुळे अजितदादा आपल्या भूमिकेवर ठाम राहणार की संघाचे निमंत्रण स्वीकारणार याकडे लक्ष लागलेलं आहे.

आमची शाहू, फुले आणि आंबेडकर ही विचारधारा आम्ही सोडणार नाही म्हणत महायुतीत दाखल होऊनही अजित पवार आणि त्यांचे आमदार सरकारमध्ये सुरुवातीला थोडे फटकूनच वागत होते. त्यात फडणवीसांनीदेखील अजितदादांशी आमची असलेली युती नैसर्गिक नसून राजकीय असल्याचे म्हणत महायुतीतले राष्ट्रवादी काँग्रेसचे अवघडलेपण अधोरेखित केले होते.

मात्र, आता मंत्रिमंडळ विस्तार आणि हिवाळी अधिवेशनासाठी दाखल झालेल्या महायुतीच्या आमदारांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भेटीचे निमंत्रण पाठवले आहे.

पण आता यात अजितदादा आणि त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस संघाच्या कार्यालयात जाणार की संघाचं निमंत्रण धुडकावणार याकडं सर्वांचेचं लक्ष लागलेले आहे.

# विधीमंडळावर धडकले अनेक मोर्चे







■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी विधीमंडळावर विविध संघटनांच्यावतिने मोर्चेकऱ्यांनी मंगळवारी धडक दिली.

नागपूर येथे विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनास सोमवार १६ डिसेंबरपासून सुरूवात झाली असून, यावर्षी हे अधिवेशन केवळ एक आठवड्याचे असणार आहे. दरवर्षी हिवाळी अधिवेशनादरम्यान, अनेक संघटनांकडून त्यांचया प्रलंबित मागण्यांच्या समर्थनार्थ विधीमंडळावर मोर्चे काढण्यात येतात. मंगळवारी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आंबेडकरी संघटनांच्यावतिने मागण्यांच्या पूर्ततेसाठी विधीमंडळावर धडक देण्यात आली.

भोई, कहार, केवट, ढिवर आदि समाजाच्या संघटनांकडून निषाद पार्टीच्या बॅनरखाली त्यांच्या मागण्यांच्या समर्थनार्थ मोर्चा काढण्यात आला. आदिवासी संघटनांनी देखील मंगळवारी मोर्चा काढला.

दरम्यान, विविध ठिकाणाहून विधीमंडळाच्या दिशेने निघालेले मोर्चे पोलिसांनी टेकडी रोडवर अडवले. येथे संबंधित संघटनांच्या नेत्यांची भाषणे झाली.

मोर्चकऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या मार्फत त्यांचे निवेदन शासनाकडे पाठविले. या मोर्चामुळे टेकडी रोड, झिरो माईल आणि अन्य मार्गावर वाहतुकीची मोठी कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. मोर्चात सहभागी होण्यासाठी राज्यभरातून नागरिक आले होते.



## उपोषण मंडप रिकामे

हिवाळी अधिवेशनादरम्यान एकीकडे संघटनांच्यावतिने विधीमंडळावर मोर्च काढले जातात तर दुसरीकडे काही संघटना आणि नागरिक व्यक्तीगत स्तरावर उपोषणाला बसतात. उपोषण करण्यासाठी धंतोली येथील यशवंत स्टेडियममध्ये पेंडाल टाकून व्यवस्था केली जाते. यावर्षी देखील येथे अनेक पेंडाल उभारण्यात आले असले तरी मोजकेच उपोषणकर्ते दिसून येत आहेत. अनेक पेंडाल पूर्णतः रिकामे आहेत. सद्यःस्थितीत मध्य भारतात थंडीची लाट असून, नागपूर येथेही पारा घसरला आहे. तापमान ९ अंशावर आल्याने मोर्चेकरी आणि उपोषणकर्त्यांमध्ये उत्साह नसल्याचे जाणवले. तथापि, कडाक्याच्या थंडीतही काही उपोषणकर्ते त्यांच्या मागण्यांसाठी मंडपात तळ ठोकून आहेत.